१२७०
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र.

...ान नाटक

नं २९३ सन १९००

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(…णे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
क्र. नांव — रूढिविनाशक नाटक
ले — द. ज. मराठे.
वि. — नाटक

२९३

सं.क्र.

रूढिविनाशक नाटक

नाटक

संगीत

# रूढिविनाशन नाटक.

हें पुस्तक

## दत्तात्रय जनार्दन मराठे

यांनीं रचिलें.

अनुक्रम
विभाग
क्र
नों. दि.

आवृत्ति पहिली.

पुणें येथें "ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

[ या पुस्तकासंबंधीं प्रयोगासुद्धां सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत. ]

सन १९००.

किंमत एक रुपया.

कै. वा. **चिंतामण नारायण आपटे** बी. ए.

यांच्या

अकालिक निधनानें विफल झालेली

त्यांची आत्यंतिक

**देशहितेच्छा व समाजहितबुद्धि,**

मनांत आणून त्यांचें

# स्मारक

म्हणून हें **पुस्तक** त्यांचें वियोगदुःख

अनुभवणाऱ्या प्रेमबद्ध मेहुण्यानें

**अर्पण** केलें आहे.

# प्रस्तावना.

**रुढिविनाशन** नाटक लिहिण्याचा प्रधान हेतु लोकस्थितीच्या सद्यःस्वरूपाच्या एका भागाचें यथामति चित्र रेखाटणें हा होय. हल्लींच्या सुशिक्षित वर्गास, किंवा विचार करण्याजोग्या गोष्टींचा मनःपूर्वक विचार करण्याची बुद्धि आहे अशा मनुष्यमात्रास भासमान होणारीं सध्याच्या सामाजिक स्थितींतील कांहीं व्यंगें त्यांच्या दुष्परिणामासह विशेष रीतीनें दाखवून त्यांचें निर्मूलन करण्याची प्रवृत्ति रूढिग्रस्त अंतःकरणांत उत्पन्न करविणें हेंही या नाटकाचें प्रयोजनच आहे. हें साधण्यास रूढीचे बंध वाजवीपेक्षां फाजील घट्ट बसले आहेत त्यांचा विचारानें व धैर्यानें उच्छेद करणें हाच काय तो एक उपाय ग्रंथकारास दिसतो; व या दृष्टीनेंच ह्या नाटकाचें कथानक जुळविलें आहे. समाजाची सद्यःस्थिति नाटकाचा विषय होण्यास किमपि अयोग्य नाहीं असें ग्रंथकारास वाटतें.

वरील नाटकांत **नायिकेच्या** व **उपनायिकेच्या** पात्रांस विशेष महत्व आहे हे वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. वैधव्यांत मग्न झालेल्या अबलांच्या आयुष्यक्रमाचा प्रकार वरील दोन **नायिकांच्या** प्रकाराखेरीज वेगळा असणें क्वचित् संभवतें. तथापि **नायिकेनें** अनुसरलेला मार्ग तिच्या स्थितींतल्या असंख्य अबलांनीं अनुसरणें सर्वथा अनुकरणीय आहे असें ग्रंथकारास वाटत आहे. संन्यासाचें असिधाराव्रत आचरणें बहुतेक अशक्य; तेव्हां जें शक्य व बऱ्याच दृष्टीनें इष्ट, तें समाजापुढें मांडलें आहे. **उपनायिकेनें** जो मार्ग स्वीकारला आहे तो सर्वथैव त्याज्य

आहे हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. परंतु तो मार्ग अनुसरण्याकडे प्रवृत्ति होणाऱ्या स्त्रियांची संख्या जितकी अल्प असावी तितकी अल्प नाहीं असें वाटण्याजोगीं उदाहरणें कानावर येऊं लागलीं आहेत. याचें कारण अर्थातच दुसऱ्या मार्गाचें म्हणजे संन्यासव्रताचें अत्यंत खडतरत्व होय. तें या काळीं तितक्या निर्धारानें पाळणें पुष्कळ व्यक्तींनां अशक्य होतें. अर्थातच प्रमाद घडतात; तसे न घडण्यास उत्तम उपाय म्हणजे आमचे **नायिकेनें** स्वीकारलेला मार्गच होय. तेव्हां तिनें घालून दिलेला कित्ता तिच्या समदुःखी सजातीयांनीं गिरविणें हेंच श्रेयस्कर आहे अशी समजूत आमच्या रूढिग्रस्त समाजाची या नाटकाच्या वाचनानें अथवा प्रयोगानें झाली तर हें नाटक लिहिल्याचें चीज झालें असें ग्रंथकारास वाटेल.

सद्यःस्थितीचें चित्र वठविण्याचा बाणा मिरविणाऱ्यानें **आचार्यां**सारख्या विभूतीचें प्रस्तुतकालीं अस्तित्व मानणें म्हणजे वस्तुस्थितीचें आपलें अज्ञान प्रकट करण्यासारखेंच होय असा आरोप ग्रंथकारावर येणें साहजिक आहे; परंतु समाजांतील व्यंगाचें दिग्दर्शन व निर्मूलनोपाय या दोन्ही गोष्टी नाटककर्त्याच्या मनांत घोळत असल्यामुळें **आचार्यांची** भूमिका मुद्दाम योजिली आहे.

इतर पात्रांविषयीं विशेष कांहीं लिहिण्याची आवश्यकता नाहीं. जो सद्यःस्थितीकडे लक्ष देईल त्यास **माधव** व **मनोरमा** यांच्याप्रमाणें भाऊभावजया आजच्या तरुण मंडळींत किती तरी दिसतील ! **वसंता**च्या प्रगल्भ विचारासारखे विचार डोक्यांत घोळूं लागून त्यांस आचाराचें स्वरूप देण्याकडे ज्यांची प्रवृत्ति होत आहे असे तरुण हल्लींच्या समाजांत वाटतात तितके विरळ नाहींत. **अकडराव**

**फक्कडराव** आपलीं रंगलेली व निलाजरीं तोंडें घेऊन वीतवीत कांठाच्या चौघडीवाल्या व मोहोरेच्या आंगठीचा हात उडविणाऱ्या कित्येक **गांवकांकू**च्या पाठोपाठ हिंडतांना गल्ल्याकुचांतून व देवळारावळांतून दिसत नाहींत असें कोण म्हणेल? **लटपटभट** हा प्राणी आतां पहिल्याइतका मुबलक सांपडत नसेल, पण त्याची जात अजून अगदीं नष्ट झाली नसल्यामुळें त्याचें चित्र दाखविणें अगदीं जरूर आहे.

शेवटीं लिहावयाचें इतकेंच कीं, भरतवाक्य व ईशप्रार्थना या दोन पद्यांत प्रदर्शित केलेली इच्छा अंशतः तरी सफल होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

पुणें, ता० २८ माहे जून सन १९००. } **ग्रंथकर्ता.**

अनुक्रम
विभाग
दि.

# आभारप्रदर्शन.

या नाटकास संगीत स्वरूप येण्याचें सर्व श्रेय नाटकशास्त्रविशारद रा० सा० **शंकर मोरो रानडे**, बी. ए. यांजकडे आहे. पद्यरचनेच्या कामीं यांनीं आपल्या अमोल्य खासगी वेळेचा व्यय करून जे परिश्रम घेतले व जी कळकळ दाखविली त्यांबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. तसेंच प्रो० **भास्कर रामचंद्र आर्ते**, एम. ए., व रा० रा० **हरि नारायण आपटे** यांनीं वेळोवेळीं ज्या योग्य सूचना केल्या त्यांबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. रा० रा० **विनायक नारायण आपटे** यांनींही या कामीं अनेक प्रकारें सहाय केलें असल्यामुळें त्यांचेही माझेवर बहुत उपकार झाले आहेत. सरदार **खंडेराव चिंतामण मेहेंदळे**, बी. ए., रा० रा० **चंद्रशेखर शिवराम गोरे**, रा० रा० **भास्कर पांडुरंग काळे** वगैरे ज्या सद्गृहस्थांच्या हातून **रूढिविनाशनाची** थोडीबहुत सेवा झाली आहे, त्या सर्वांचा मी फार आभारी आहें. **ज्ञानप्रकाशचे** म्यानेजर रा० रा० **नारायण नृसिंह साठे** यांनीं मोठ्या दक्षतेनें हें पुस्तक अल्प अवकाशांत छापून काढिलें, त्याबद्दल त्यांचेही आभार मानणें अवश्य आहे.

पुणें, ता० २८ माहे
जून सन १९००.

**द० ज० मराठे.**

# नाटकांतील पात्रें

## पुरुष.

वसंत. (नायक.)..................एक सुशिक्षित जहागीरदार.
आचार्य.........................वसंताचा कुलोपाध्याय.
तात्यासाहेब. ..................एक खानदानी गृहस्थ.
माधव. ........................तात्यासाहेबांचा पुत्र.
कुमार. ........................माधवाचा पुत्र.
अणासाहेब.(वृद्ध नवरदेव.)..एक वृद्ध धनिक.
लटपटभट.( लग्नदलाल.)....एक लोभी भिक्षुक.
फक्कडराव. ............... } दोन रंगेल गृहस्थ.
अक्कडराव. ............... }
विश्वास .......................वसंताचा हुजऱ्या.

## स्त्रिया.

सगुणाबाई.....................तात्यासाहेबांचें कुटुंब.
सुभद्रा ( नायिका. )........तात्या साहेबांची कन्या.
मनोरमा.......................माधवाची पत्नी.
आवडी.........................लटपभटाची कन्या व अप्पासाहेबांचें द्वितीय कुटुंब.
गांवकाकू......................एक कुंटीण.

भटभिक्षुक, सुवासिनी, नोकरचाकर, नापित वगैरे.

मराठी ... अनुक्रम १७२६९ विभाग ना: क्रमांक ७०७० नों. ता.

# संगीत रूढिविनाशन नाटक.

## अंक १ ला.

---

### नान्दी.

पद्य—राग-यमनकल्याण, ताल-धुमाळी.

भुवनसूत्रकलना, सशिवकरपदाब्जीं अर्पूं स्वमना ॥ ध्रु० ॥ करुनि चित्ररचना, पदार्थ-मात्रीं स्थापिसि नाना धर्मांना ॥ प्रमादशून्य-भावना, सदैव वागत, चैतन्य दिसे अचेतनीं सत्य रीति नाना ॥ दिधलें मनुजांसी, सदया त्वां ज्या बुद्धीसी ॥ ती त्या धर्मांसी वळवो, निज हितकार्यासी ॥ सामर्थ्य सदा तुजसी मागों, टाळूं देवा दुष्परिणतिंना ॥ १ ॥

( नांदीनंतर पारिपार्श्वक जातात. )

**सूत्रधार**—ईशस्तवनानं प्रसन्नमुख दिसणाऱ्या प्रेमळ प्रेक्षकजनाचं मनोरंजन कसं बरं करावं? हो! माझ्या सुशील भार्येचं मत घ्यावं हें बरं! [ पडद्याकडे पाहून ] अरे वा! हिची तर तयारीच आहे. [ नटी प्रवेश करिते तीस ] प्रिये, उपदेशपर आणि मनोरंजक अशा एका सामाजिक नवकृतीचा ह्या रसिक जनाला प्रयोग करून दाखवावा असं मनांत आणलं आहे.

**नटी**—पण मी म्हणते या उठाठेवीवाचून आपलं

काय अडलं आहे ? आतां बाई हा नाटकाचा नाद पुरे नाहीं का झाला ? संसारकृत्याकडे लक्षच का द्यायचं नाहीं ? त्या लटपटभटजींना सांगून मी हे विणे, भेपळे चटसारे नाहींसे करून टाकतें ! त्यानं जुळवून आणलेलं स्थळ आपल्या नाहींच का मनाला येत ? पोरीचं बाई लग्न तरी केव्हां करायचं ?

**सूत्रधार**—पण एवढी घाई का म्हणून ?

**नटी**—म्हणजे ! अगोदरच पोर उफाड्याची ! मी नाहीं ग बाई तिला घोडीसारखी वाढूं देणार ! खरोखर, लहानपणीं जोडपं कसं गोजिरवाणं दिसतं !

पद्य—चाल—घरीं कोण बघे०

**बहु गोड दिसे मनोहारी ॥ किति तरि ॥**
**अरसिक न शके जाणूं लेश खुमारी ॥ध्रु०॥**
**विष्णूलक्ष्मी मूर्तिमंत कीं अवतरली गमति**
**हीं सुखकारी ॥ १ ॥ पूर्वजन्मिच्या पुण्यें.**
**मनुजां दिसुं शकति हे चिमणे भुज चारी ॥२॥**

**सूत्रधार**—या बायकांपुढें कांहीं इलाज चालत नाहीं ! प्रिये खरोखर,

**दिंडी.**

**प्रबळ नांवाचे आम्हि पुरुष जाती ॥**
**खरी सत्ता सदनिंची तुम्हां हातीं ॥**
**तुम्ही स्वेच्छेनें अम्हां वांकवीतां ॥**
**वचनशूर न जाणतो धैर्यवार्ता ॥ १ ॥**

**नटी**—पुरे ! पुरे ! तुमचीं तीं सभेंतलीं वचनं सभेंतच राहूं द्या ! वाडवडील जसं करीत आले तसंच आपल्याला केलं पाहिजे !

**सूत्र०**—काय करावं ! निरुपाय आहे बुवा ! पण प्रिये, मी सांगतों इकडे जरा लक्ष दे !

पद्य—चाल—यास्मात् सदनिं०

**देश काल वर्तमान लोक नेणती ॥ रूढ मार्ग हाचि एक धर्म मानिती ॥ रूढीची घातुकता न मनिं आणिती ॥ दैवावरि अकृतयत्न-भार ठेविती ॥.**

**नटी**—नशिबीं असलेलं कांहीं टळत नाहीं ! एवढं मला पक्कं ठाऊक आहे ! पण तुमची ती सुधारणा नको ग बाई माझ्या घरांत. पोरीचं लग्न येत्या माघांत झालंच पाहिजे!

**सूत्र०**—नीट विचार कर वरं ! खरं म्हणशील तर त्या लटपटभटाचा मला कांहीं विश्वास येत नाहीं ! अग ! हे मध्यस्थ लोक आत्मलाभासाठीं हव्या तशा गप्पा मारतात ! खोटींनाटीं टिपणं जुळवितात, काय हवं तें करतात ! लटपटभट हा बोलून चालून लग्न–दलाल ! अति नीच ! तेव्हां—

[ पडद्यांत **लटपटभट**—अरे मूर्खा ! माझी निंदा करतोस ! थांब आलों. ]

**सूत्र०**—[ ऐकलेसें करून ] हं ! लटपटभटानं आपलं बोलणं ऐकलं वाटतं ! ठीक ! स्वारी इकडेच येत आहे ! या नीचाच्या तोंडीं कोणीं लागावं ? आपण आपल्या कामाला जावं तें बरं. [ जातात. ]

[ ही प्रस्तावना झाली. ]

---

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—रस्ता.

**लटपटभट**—[ प्रवेश करून ] माझी निंदा करणारा हा कोण ! [ कोणी दिसत नाहींसें पाहून ] जाऊं दे !

असेल कोणी ! काय म्हणाला ? हो ! लग्न—दलाल ! आ- होतच ! दलाल नाहींत कोण ? आणखी ही दलाली काय वाईट ? हं ! दोन हाताचे चार हात करण्याचं पुण्यच तसं आहे ! मी म्हणतों, या दलालींत कांहीं पापांश असलाच तर तो ह्या पुण्यांशामध्यें निघून जात असेल ! एवंच बरोबरीच ! अहो, आमचे मुख्य धंदे दोन ! भि- क्षुकी आणखी ही दलाली ! पहिलींत गडबड आणखी दुसरींत लटपट ! हो ! त्याशिवाय चालतं कसं ? निंद- कांना वडबड करायला काय होतं ! पैसा कसा मिळवावा हें कुठें समजतं आहे ? त्यांना पैशाची किंमतच कळत नाहीं ! ह्या जगांत पैशाशिवाय दुसरं दैवतच नाहीं. अहाहा!

पद्य—चाल-पैसा असे हा.

**पैशा! तुझा मी पदाब्जविलीन दास । तुझ्या- मुळें या जगास, भुले मन खास, जडे हव्यास, तुझा मी पदाब्जविलीन दास ॥ ध्रु० ॥ तूंचि असशी मम देव एकला । चिंतुनि तुजला मी इतरांला । हाणितों लत्तेला । पुरवि सतत मनिंचि आस, छन् छन् तव रव निववु जि- वास ॥ १ ॥ गायनविषयीं पोकळ नादीं, मी नच अगदीं, परि तव पादीं आनंदें लो- ळतसें, धरुनि तुझ्याचि नादासि खास, उत- रुनि खचित मि जाइन भवास ॥ २ ॥**

बरं, तात्यासाहेबांच्या सुभद्रेचं लग्न त्या बाबासाहेब जहागीरदारांच्या मुलाबरोबर कशीही लटपट करून लावून तर द्यायचंच ! त्या जोशीबुवाला थोडंसं मधाचं बोट लाव- लंच आहे. फार तर त्याच्या तोंडावर थोडंसं टाकून देऊं, बाकी हुं ! ह्याह्याकडचं म्हणून म्हणा किंवा इकडेही

कांहीं लटपट करून म्हणा एकंदरींत पांचशांची थैली भरलीच पाहिजे. अशीं एक दोन घाउकं मिळून वर्षाच्या काठीं हजाराची रांजणी भरली नाहीं तर हा धंदा पाहिजे कशाला? पण या मोडकळीस आलेल्या श्रीमंतांच्या बायका कशा मूर्ख असतात! वेळ पडली तर घरदार गहाण टाकतील, पण आपली पोरगी जहागीरदाराच्या इथें देतील. किती का खर्च होईना! घराचं तळपट का जाईना! पण आपला हेका सोडणार नाहींत! पण अशा त्या आहेत म्हणून तर आमच्या सारख्यांचं चालतं आहे! आम्हाला काय! कोणाचा बारावान् बारसं सारखंच! देवापाशीं मागणं हेंच कीं, आम्हाला मारूं नकोस! बाकी कालरा, वगैरे खटलीं आपलीं बेताबातानं चालू राहिलींच पाहिजेत! असं झालं तरच आमचा चाबा चालू! चला [ पाहून ] आँ! हें कोण! बयेचा फेरा आला वाटतं! असो, आपल्या पथ्यावरच आहे. पण आतां जरा बेतानंच वागलं पाहिजे. [ शंकरनामाचा जयघोष करितो. ]

**गांवकाकू**—[ प्रवेश करून, स्वगत ] किती पण भाविकपणाचा डौल! अगोबाई! [ प्रकाश ] कां भटजी! बराच सवदा उरकलात म्हणायचा!

**लटपट०**—कोण काकू! यावं! यावं!

**गांवकाकू**—आंत बाहेर बरंच दिसतं आहे. तात्यासाहेबांच्या कुटुंबांना बऱ्याच थापा मारीत आहां. स्थळ पाहायच्या निमित्तानं आजपर्यंत वाटखर्ची वगैरे मिळून बरेच पैसे उकळीत आहांत. खानदानीचं घराणं! साधीभोळी बायको! तुम्हाला आपलं बरंच घबाड सांपडलं आहे म्हणायचं! पण—लटपटभटजी, माझ्याशीं नाहीं हो तुमची

लटपट चालायची! बरीच जास्त रकम उपटण्याच्या तुम्ही बेतांत आहांत, पण माझ्याशीं गांठ आहे हें लक्षांत ठेवा.

**लटपट०**—[ थट्टेनें ] आपण सुद्धां जहागीरदारांच्या कुटुंबांना बऱ्याच तऱ्हेनं झुलवीत आहां! मला सगळं समजलं आहे! हे बघा, या कामीं जोशीबुवा एजंट आणखी तुम्ही एजंटीणबाईसाहेब! आमचं काय! तुमच्या पोटांतले आम्ही.

**गांवकाकू**—कां भटो! फारशी जीभ वळवळते आहे? माझा तडाखा अजून तुला ठाऊक नाहीं वाटतं?

**लटपटभट**—कां! अगदीं मनापासून रागावलां वाटतं! हें पहा, दोन पैसे मिळविण्याची माझी हीच वेळ आहे. त्यांतून तात्यासाहेबांच्या कुटुंबाकडून तुमचीहि संभावना व्हायचीच आहे. मग, तुमचा आमच्यावर रोष कां असावा?

**गांवकाकू**—तसलं कांहीं चालायचं नाहीं, साफ सांगतें. तुझा कावा मी पुरा ओळखला आहे. सगळीच रकम तुला मी कधींच पचूं द्यायची नाहीं. निम्मीशिम्मी मला देशील, तर जुळेल; नाहीं तर बिब्बा पडलाच समज!

**लटपटभट**—[ स्वगत ] काय बघा फुटाण्यासारखी उडते आहे! केवळ कृत्या आहे वरं कृत्या! बोलते आहे असं करायला कधीं चुकायची नाहीं. [ विचार करून ] आणखी का न करावं? तिची तरी हीच वेळ आहे. जाऊं दे! एवढे तरी मिळतील असं कोणाला वाटलं होतं! तिलाही कांहीं दिलंच पाहिजे. नाहीं तर सर्वच ओमूफस् व्हायचं!

**गांवकाकू**—कां! विचार कसला चालला आहे? एखादी लोणकढी थाप मारायची आहे वाटतं? कबूल आहेस कीं नाहीं बोल? नाहीं तर ही चाललें पहा. [ जावयास निघते ].

**लटपटभट**—[ तिला अडवून ] अहो, पण जरा— एवढंचना ? कबूल ! त्यांत काय मोठंसं ? [ स्वगत ] एवढ्यानंच काय झालं आहे ? या ना त्या कोणत्याही वाटेनं डल्ला मारल्याशिवाय हा भट राहणार थोडाच !

**गांवकाकू**—हां ! असें बेतावर या !

**लटपटभट**—पण हें पहा, तिकडे असा वार भरून द्या कीं यँव !

**गांवकाकू**—त्याची नको काळजी. नवरेमुलाच्या आईचं आणखी माझं चांगलंच सूत आहे. काम झालं नाहीं, तर माझं नांवच बदलून ठेवा. अशी युक्ति लढिवतें कीं हां हां म्हणतां काम फत्ते ! चला—पण अगोदर सगुणाबाई एकट्या बसल्या असतील अशी संधि पाहून त्यांची गांठ घेतली पाहिजे. चला.

**लटपट०**—चला, आलोंच ! [ ती जाते ] कसंही करून सुभद्रेचं लग्न जुळिवलं म्हणजे मिळविली ! हो ! नवरा मरो वा नवरी मरो आपली तुंबडी भरली म्हणजे झालं ! पैसा पाहिजे, दुसरी गोष्ट नाहीं ! पैसा !—महाराज— पैसा ! [ पुन्हा 'पैशा तुझा' हें पूर्वोक्त पद म्हणून जातो.]

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—मनोरमेचें शयनमंदिर.

**माधव**—प्रापंचिक व्यथा कितीही प्रबळ असो ! मन कितीही अस्वस्थ असो ! अंतःकरणापासून पतीवर प्रेम करणारी, सुशील, सुशिक्षित, अशी जर गृहिणी असेल तर मानसिक पीडेची काय मात्रा चालणार आहे ? माझ्या प्रियेच्या ह्या शयनमंदिरांत प्रवेश केला पुरे कीं, मी

आपलीं सर्व दुःखं अगदीं विसरून जातो! [पाहून] हें स्थळ किती तरी रमणीय आहे! इथली टापटीप तर फारच विलक्षण! हा सर्व शिक्षणाचा परिणाम! [ मनोरमा दिसत नाहीं असें पाहून ] पण हें काय! तीन वाजले! मी इतक्या उशिरां आलों तरी हिचा ठिकाण नाहीं. लग्नाची तयारी करायची म्हणून काय इतकीं जाग्रणं करावीं? छे! एवढा उशीर? माझ्या नेत्रांस आनंद देणारी ती सौंदर्यवल्ली इथें कुठें दिसत नाहीं हें काय? काय चमत्कार आहे! प्रेम ही या जगांत अजब चीज आहे!

पद्य—चाल—हे तरु कामीजन.

**अद्भुत किति हा प्रेमाचा। प्रभाव याच्या योगें फिरतो वर्णहि वस्तूचा ॥ विलास याच्या लहरींचा। क्षणीं प्रसादा दात्रि जनकही होय पांडुतेचा ॥ दृढतम रज्जू प्रेमाचे वळें ओढिले तरी जाणती नांव न तुटण्याचें ॥ क्षणभरि मंदिर केलीचें। गमलें तें मज दिसे प्रियेविण निर्जन वन साचें ॥ ४ ॥**

अजून कां बरं येत नाहीं? [ मनोरमा हळूच प्रवेश करून एक फुलांचा गुच्छ न कळत माधवाचे अंगावर फेंकते. गुच्छ उचलून ] स्वारी आली वाटतं! [ मनोरमा पुढें येते तीस ] कां? आज आपल्याला इतका उशीरसा!

**मनोरमा**—' आपल्याला, आपण, तुम्ही ' असलीं संबोधनं मला द्यायचीं असतील तर मी आतां मुळींच—

**माधव**—कां बरं? आपण, आपल्याला असं तुला उद्देशून मी कां म्हणूं नये? ज्याच्यावर आपलं खरं प्रेम, खरी

भक्ति त्याला सन्मानाचीं संबोधनं कधींच लावूं नयेत असं कोणी सांगितलं आहे ? माझं तसंच तुझ्यावर प्रेम आहे!

पद्य—चाल—परमेशा धन्य खरीं.

**खचित असासि तूं मदीय जीवितेश्वरी । त्व-**
**त्प्रेमें धन्य मीच एक भूवरीं ॥ ध्रु० ॥ मत्कुल-**
**गत पूर्व विभव । पावुनिया नष्टभाव । स्मृति-**
**रूपें मात्र ठाव । धरित तरी मी सदैव । तु-**
**जसंगें मग्न होत सौख्यसागरीं ॥ १ ॥ इष्ट**
**न मज पुरनिवास । विपिन तेंहि सुखद**
**खास । त्वत्संगतिहूनि आस । अन्य नसे**
**या जिवास । कल्पलता तूं मदीय गमसि**
**अंतरीं ॥ २ ॥**

**मनोरमा**—माझ्यावर इकडली अशी प्रीति आहे म्हणूनच माझ्यासारखी पुण्यवान् मीच असं समजतें. माझ्यावर आपली मुळींच प्रीति नसती तर मी काय केलं असतं ? ज्यांच्या पतींची त्यांच्यावर प्रीति मुळींच नाहीं अशा बिचाऱ्या काय करतात ? पण माझी आपल्यावर प्रीति कशी आहे हें आहे का ठाऊक ?

**माधव**—ती तर दिसतेच आहे !

**मनोरमा**—जी दिसते आहे ती कांहींच नाहीं. तिच्यापेक्षां—

**माधव**—मग ती कशी आहे सांग पाहूं ?

**मनोरमा**—पद्य—चाल—विदित तुम्हां.

**निरपेक्षा प्रीति वसे माझिया मनीं । प्राणांता-**
**वधि टिकेल ती स्थिरा जनीं ॥ प्रीति असो**

**वा न असो अपुलि मजवरी । तुच्छभाव मजशिं बरा कितिहि अंतरीं ॥ ध्रु० ॥ सुख-दुःखीं अपुलि अर्धभागिनी तरी । स्वप्राणा होमिन मी सौख्य मानुनी ॥**

**माधव**—अहाहा ! अशाच प्रीतीला प्रीति म्हणावं ! पण हें काय ? तूं उभी का ? ही मर्यादा वाटतं ? मर्यादा-बाईवर तुझं फार प्रेम दिसतं !

**मनोरमा**—नको का असायला ? माझीचशी काय ? पण सर्व कुलीन आर्यस्त्रियांची ती अगदीं जन्माची प्रिय-मैत्रीण ! मग मला तिची हेळसांड कशी बरं करतां येईल ? तिचा आम्ही त्याग केला कीं, आमचं कुलीनत्व नष्ट झालंच !

**माधव**—पण आपल्या एकांतांत हिचं काय काम आहे ? घटकाभर तिला विश्रांति दे. आणखी अशी इथं येऊन बैस ! [ तिला शेजारीं बसवितो ]

**मनोरमा**—[ बसतां बसतां ] आतां माणसानं काय बोलावं बाई !

**माधव**—बरं पण उशीर होण्याचं कारण नाहीं सांगितलंस ?

**मनोरमा**—ठाऊक असून मुद्दाम विचारायचं ना ? ज्याकरितां आपल्याला सुद्धां इतका उशीर झाला त्याच-करितां मला सुद्धां झाला !

**माधव**—हो ! साहित्याची तयारी !

**मनोरमा**—खरंच ! दोन दिवस पहाते आहे ! वन्सं-चं लग्न ठरलेलं आपल्याला पसंत नाहींसं दिसतं ! आण-खी त्याचमुळं वसंतभावजींकडे जाऊन इतक्या रात्रपर्यंत बसायचं वाटतं !

**माधव**—हो. मग काय करावं ! साहित्याच्या गर्दीत तुमचं दर्शनसुद्धां दुर्लभ! गोष्टीच्या भरांत उशीर किती झाला तें समजलं नाहीं. निघाल्याबरोबर वाटलं कीं, दिवाणखान्यांत पाऊल घालतांच समशेर चालेल ! पण इथें ठिकाणच नाहीं ! आपल्याला हें लग्न नाहींच पसंत— खरोखरंच नाहीं ! आणखी चारपांच वर्षं तिला चांगलं शिक्षण देऊन ती बरीच मोठी झाल्यावर माझा मित्र जो वसंत त्याच्याकडून हिचं पाणिग्रहण करवायचं असं माझ्या मनांत होतं ! लग्न न करण्याचा त्याचा निश्चय आहेच. पण माझ्या भिडेनं माझ्या शब्दाला त्यानं खचित मान दिला असता !

**मनोरमा**—सगळं खरं. पण आतां काय उपयोग ? मामंजींना, सासूबाईंना आपण पुष्कळ सांगून पाहिलं. पण लवकर लग्न करण्याचा त्यांचा हट्टच आहे तिथं काय इलाज ! लग्नापूर्वी मला कुठें इतकं शिक्षण मिळालं होतं ? पण मग इकडच्या सहवासानं तें मिळून माझं मन विक-सित झाल्यानं आतां आपण उभयतां आनंदानं नाहीं का काळ घालवीत ? तसंच त्यांचं होवो म्हणजे झालं !

**माधव**—तसं होईल तर बरंच ! पण हल्लींच्या एकंदर स्थितिवरून तसं होईलसं वाटत नाहीं. आपल्या लग्नाची गोष्ट निराळी म्हणा ! असे सर्व योग फारच वि-रळा जुळून येतात ! असो, माझं कर्तव्य मी बजावलं आहे!

**मनोरमा**—हो ! बरी आठवण झाली ! आज रात्रीं एक आनंदाची बातमी सांगेन असं माजघरांत हळूच सांगणं झालं होतं ती कोणची बाई ?

**माधव**—आपल्या वसंताचे कुलोपाध्याय विरक्त

होऊन दहाबारा वर्षांपूर्वींच हिमालयाकडे तपश्चरण करायला गेले होते.

**मनोरमा**—हो! हें एकदां ऐकलेलं आहे! बरं मग?

**माधव**—गुरूंच्या आज्ञेनं ते आतां परत आले आहेत. त्यांच्या गोष्टी ऐकत बसल्यामुळेंच मला उशीर झाला.

**मनोरमा**—गुरूंची काय आज्ञा झाली आहे?

**माधव**—हीच! भरतखंडांत हल्लीं रूढीचं फार प्रस्थ माजलं आहे तें मोडून खऱ्या आर्यधर्माचं रहस्य लोकांना नीट समजावून सांगावं. वसंताचं साहाय्य मिळवून समाजाची उन्नति करण्यासाठीं अविश्रांत श्रम करावे; आ-णखी मग योगाध्ययन करायला आश्रमांत परत यावं. त्यांना आचार्य असं म्हणतात! माझा अजून विशेष परि-चय झाला नाहीं तरी ह्या उदार विभूतीच्या परिश्रमानं समाजाचं पाऊल बरंच पुढें पडेल असं वाटतं.

**मनोरमा**—मोठ्याच आनंदाची बातमी! पण बाई आतां असं बोलत तरी किती वेळ बसायचं? [आश्चर्यानें] हें काय! पांच वाजले! उजाडलंच म्हणायंच! आज झोंप नाहींच म्हणायची!

**माधव**—[ पाहून ] खरंच! बोलण्याच्या नादांत रात्र मात्र सरली!

**मनोरमा**—मला बाई आतां खालीं गेलंच पाहिजे. लवकर अंग धुवून देवघरांत यायला सासूबाईनीं सांगून ठेवलं आहे. [ उठते ].

**माधव**—जसं कांहीं खरंच सांगितलं असेल!

**मनोरमा**—खोटं कशाला सांगूं?

**माधव**—[ शृंगारचेष्टेनें ] मग जाणारच का?

**मनोरमा**—[ लज्जायुक्त शृंगारचेष्टेनें ] असं काय तें!

**माधव**—चला तर. मलासुद्धां वसंताकडे आचार्यांची गांठ घ्यायला लवकरच जायचं आहे. गच्चीवरून मागल्या हौदाकडे उतरूं म्हणजे झालं. [ मनोरमा पावलें जलद टाकूं लागते तें पाहून थट्टेनें ] हें काय ! आतां असं लवकर चालणं चांगलं नाहीं ! तूं आतां पहिली उरली नाहींस !

**मनोरमा**—पुरे मेलं ! जिथें तिथें थट्टा करायला हें बरं निमित्त झालं आहे !

**माधव**—[ मनोरमेचा हात धरून ] ही मौज पाहि-लीस का ?

पद्य—चाल—राग, मांड, ताल, दादरा.

निजपतिच्या करपाशांतुनि सुटुनी रजनि
जातसे ॥ ध्रु० ॥ भग्नमनोरथ शशि तो ।
म्लान किती बघ दिसतो । नभमंदिर हें
त्यजितो । रमणिरहितसें ॥ १ ॥ नचि
तारा, जाईचा । गजरा जणु रजनीचा ।
तुटुनि पडुनि वेणीचा । विखुरला असे ॥२॥
पूर्वदिशा पांडुर ती । गर्भवती जणु युवती ।
तिमिरमिषें केशांप्रति । सांवरीतसे ॥३॥ जल-
पृष्ठावरुनि फिरती । सुमनांचा गंध हरिति ।
स्वैरगती संचरती । वायु सुखदसे ॥ ४ ॥ तरु
वल्लींसह डुलती । खगगण कलरव करिती ।
जगदीशा गौरविती । रसिक कवि जसे ॥५॥
निद्रेच्या मोहांतुनि । उद्योगी जन सुटुनी ।
दिनचर्या निज योजुनि । वागती तसे ॥ ६॥

[ जातात. ]



---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—तात्यासाहेबांचें वाड्यांतील माजघर.

**सगुणाबाई**—काय करावं बाई! असं स्थळ पाहूं गेलं तरी मिळायचं नाहीं. काय पोरीच्या नशिबीं असेल तें खरं! [ गांवकाकू प्रवेश करते तीस ] या, बसा अशा.

**गांवकाकू**—वहिनीसाहेब, भटजी येऊन गेले का?

**सगुणाबाई**—छे हो! मी त्यांचीच वाट पाहतें आहें. [ भटजी प्रवेश करतो. ] हे आले पहा.. भटजी, तुमची केव्हांची वाट पहाते आहें. बसा, बसा; कसं काय झालं? खरोखर अतांशा तुम्हाला किनई फार श्रम पडताहेत बरं!

**लटपटभट०**—हें काय वहिनीसाहेब! आपण असं म्हटलं म्हणजे मात्र मला खरोखर श्रम होतात. घरचंच काम! लोकांकरतां कां झटतो आहें? काय काय प्रयत्न करीत आहें तें एका ईश्वरालाच ठाऊक!

**गांवकाकू**—वहिनी साहेब, यांच्या तोंडावर बोलावं असं नाहीं, पण मी एक सांगून ठेवते. हें काम झालंच तर यांच्याच हातून होईल.

**सगुणा०**—म्हणूनच मी सगळा भार यांच्यावर टाकला आहे!

**लटपट०**—आणखी तो भार उचलायला मी ही एका पायावर तयारच आहे!

**सगुणा०**—मला असं झालं आहे कीं, माझ्या सुभद्रेचं लगीन केव्हां होतं! सारी आठ वर्सांची आहे तरी केवढी दिसते पहातांना? इश्श् ग बाई! मी नाहीं तिचं यंदा लगीन केल्याशिवाय रहायची! ती शेजारची वेणू नाहीं

का? तिचं लगीन कसं अगदीं वेळेवर झालं! ती सहा वर्षांची आणखी नवरा मुलगा सारा दहा वर्षांचा! काय सांगू काकू? राम न् शीता जशीं दिसत असतील लग्नांत तसं तें जोडपं दिसतं!

**गांवकाकू**—आणखी हें जुळलं किनई म्हणजे हें सुद्धां जोडपं असंच शोभेल हो! नवरा मुलगा कांहीं फार मोठा नाहीं. सारा बारा वर्षांचा! किती पण नाजूक!

**सगुणा०**—असंच पाहिजे हो. नाहीं तर ती शेजारची नानांची सून पाहतांना? लगीन होऊन पुरा महिना झाला नाहीं तोंच तिला—[ हंसून ] मग का आधींच आलं होतं कोण जाणें? इश्श् ग बाई! मी नाहीं आपल्या सुभद्रेला एवढी मोठी वाढूं देणार. सगळ्या बायका मला बोलबोलून पुरें करतील. बाकी आमच्या माधवानं तर हट्टच धरला आहे कीं, अजून पांच वर्षं तिचं लगीन कराचंच नाहीं. चांगला शिकलासवरलेला मुलगा, आणखी आपला असं बोलतो! काय चमत्कार बाई! असं जहागीरदाराचं स्थळ पाहूं गेलं तरी मिळेल का?

**लटपट०**—वहिनीसाहेब, त्यांचं अजून अल्पवय आहे. परीक्षा पास झाल्या म्हणून संसाराचं धोरण कां त्यांना समजतं आहे? आतां हळूं हळूं समजेल म्हणा!

**गांवकाकू**—अगदीं खरं बोललांत भटजी! अहो, त्यांचं तें पुस्तकी ज्ञान तसंच!

**सगुणा०**—आणखी तिकडं कुठं इतक्या लवकर लगीन जुळवायचं मनांत आहे? माझी आपली नेहमीं टकळी सुरू आहे म्हणूनच एकदां सांगणं झालं आहे कीं, जुळलं तर टाका ठरवून. मग काय भटजी? त्यांचे उपाध्येबुवा काय म्हणाले?

**लटपट०**—अहो, तो ब्राम्हण किती वस्ताद ! पहिल्या प्रथम तर कांहींच थांग लागूं देईना. पण गांठ पडली अस्मादिकाशीं ! मग स्वारी लगेच थोडीबहुत ताळ्यावर आली ! पण यावी तशी अजून आली नाहीं !

**गांवकाकू**—त्यांचं म्हणणं तरी काय आहे बाई ?

**लटपट०**—अहो काय विचारतां ! बाबासाहेबांचा विशेष भरंवसा जोतिषावर आहे. त्यांच्या महाराजांच्या पदरच्या जोशीबोवांना बोलावून आणून पुन्हा एकदां सुभद्राताईचं टिपण ते नीट पाहणार आहेत. जोशीबोवांनीं जर का कांहीं थोडी शंका घेतली तर मात्र मग–[ संज्ञा करितो. ]

**सगुणा०**—हं ? अजून हें आहेच का कांहीं तरी ? मग आतां काय करावं ? [ लटपटभट संज्ञेनं गांवकाकूस सुचवितो. ]

**गांवकाकू**—वहिनीसाहेब, तुम्ही आतां किनई मागं पुढं पाहूं नका. ही वेळ आहे ! थोडा हात ढिला सोडल्याशिवाय व्हायचं नाहीं ! कसं भटजी ?

**लटपट०**—हें काय विचारावं ? दाम करी काम ! जगाची ती रीतच आहे !

**सगुणा०**—अहो पण भटजी, टिपणं जर खरोखरीच जुळत नसलीं तर खोटं काम करून काय उपयोग ? आपल्यालाच नाहींका तें वाईट ?

**लटपट०**—वहिनीसाहेब, आपला स्वभाव किती भोळसर आहे ! बरोबर आहे. व्यवहारांतली कुटिल कारस्थानं कशीं वरं आपल्या लक्षांत येणार ?

**गांवकाकू**—भटजी, असं अर्धवट नको. काय असेल तें यांना स्पष्ट सांगा. हो ! अधीं कडू मग गोड !

**लटपट०**—अहो, हल्लीं लग्न म्हणजे एक प्रकारचा सवदाच झाला आहे! मनासारखा सवदा जुळवायचा म्हणजे मधल्या सगळ्या दलालांची समजूत करावी लागते. वहिनीसाहेब, आपल्या समोरच जे एजंट साहेब राहतात कीं नाहीं त्यांची यांची तऱ्हा एकच. या कामीं उपाध्ये-बुवा एजंट, ज्योतिषीबुवा पड एजंट, तेव्हां यांची मूठ दाबलीच पाहिजे! हा मोठा सवदा पडला! भारी किंमतीचा माल! पांच हजार हुंडा तेव्हां कमींत कमी एक हजार कमिशन होणारच! आणखी हें दिलं नाहीं म्हणजे ते मंगळ वगैरेचं कांहीं खुसपट काढून मोडता घालतील!

**सगुणा०**—असं खोटं काम त्यांच्यानं करवतं तरी कसं? आमच्या सुभद्रेचं टिपण चांगलं आहे हो!

**लटपट०**—अहो मी टिपण पाहिलं का नाहीं? दोन्ही चांगलीं जुळतात. पण हा त्यांचा धंदाच पडला! बारा बारा वर्षं त्यांनीं जी घोकंपट्टी केली आहे ती कशाला? कांहीं मोक्षसाधन करायचं नाहीं! पैसाच मिळवायचा! नुसतीं टिपणं पाहून कोण काय देतात? तेव्हां अशीच कांहीं तरी लटपट करायचेच ते! आणखी अहो—त्यांचं तरी पोटचना?

**सगुणा०**—भटजी, इलाज नाहीं मग काय करायचं? हे पहा पैशाच्या बाबतींत आम्हा बायकांना काय विशेष समजतं? तुमच्या विचारास येईल तसं जुळवा म्हणजे झालं. आतां तर झालं ना?

**लटपट०**—आतां आपण अगदीं निष्काळजी असा. वहिनीसाहेब, आपण आतां बेलाशक तयारीला लागा. लग्नाचं अगदीं कायमचं जुळलं असंच समजा. साखरपुड्याची देखील हवी तर तयारी करा!

**सगुणा०**—देवकरो आणखी तुमच्या तोंडांत साखर पडो! घरांत पुष्कळ कामं पडलीं आहेत. मला आतां तिकडे जायला हवं. सुनबाई आहेच. पण मलासुद्धां जवळ असलं पाहिजे.

**लटपट०**—हं! हें काय विचारावं? अगोदरच आपल्याला स्वस्थ बसायला नको; आणखी आतां तर साहित्याची तयारी! मग काय विचारायचं आहे!

**सगुणा**—माझी एकुलती एक मुलगी! तिचं लगिन मी अगदीं थाटानं करणार आहे हो! विहीणबाई पडली जहागीरदारीण! तिचा रुसवा असा मुळींच ठेवायचा नाहीं. साहित्य करायला मेलीं हवीं तेवढीं माणसं आहेत. आमची सुनबाई शिकलीसवरलेली असेनाका, पण घरांतल्या कामांत मोठी दक्ष आहे बरं! शिवाय माझ्या अगदीं अर्ध्या वचनांत असते. म्हणूनच मी तिच्या लिहिण्यावाचण्याकडे फारसं लक्ष देत नाहीं. एरवीं मला तें मनापासून नाहींच आवडत. बरं काकू, तुम्ही आतां केव्हां याल?

**गांवकाकू**—आतां मी आपली चार दिवस रहायलाच येते. माझं काय? दोन्ही घरीं मी आहेंच. त्यांनीं देखिल मला अगदीं आग्रहच करून सांगितलं आहे कीं, लगीन ठरलं म्हणजे चार दिवस येऊन राहिलं पाहिजे. पण मी बाई आपली आपल्या घरीं येणार.

**सगुणा**—ठीक. ठीक. चला तर आतां त्या शेवयांचं पाहूं काय होतं आहे तें. भटजी, तुम्ही जा आतां, अगदीं उभे राहूं नका!

[ सर्व जातात. ]

## प्रवेश ४ था.

**स्थळ:**—वसंतरावाचें क्रीडोद्यान.

**वसंत**—ती कोण आणि मी कोण! अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. मग सुभद्रेचा विवाह निश्चित झाला म्हणून मला कां बरं इतकी चुटपुट लागावी? अथवा माधवाच्या उद्विग्नतेन मला थोडं उदासीन बनवावं यांत नवल तें काय? अहाहा!

पद्य—चाल—लाल शालजोडी.

**प्रेम माधवावरती माझें त्याचें तेंही मजवर-**
**ती। निस्सीम असे भेटुं परस्पर आतुर उभ-**
**य मनें होती॥ दर्शन न घडे एक दिवस**
**तरी उभयाहि चित्तें हुरहुरती। होतां दर्शन**
**विकासित कमलांपरी प्रसादा ती वरिती॥**
**दृढसौहार्दी शाश्वत निगडित राहुनि मित्र**
**प्रेमांतीं। स्वप्राणाही त्यजिती ऐशा विरल**
**विभूती या जगतीं॥**

बरं पण माधव अजून कसा आला नाहीं! [ दूर अवलोकन करून ] त्या जाईच्या मंडपापलीकडून कोण बरं येत आहे? [ नीट न्याहाळून ] माधवच तो! [ माधव प्रवेश करितो ] मित्रा, काय हा विलंब?

**माधव**—वसंता, वेळच तशी आहे! चालू असलेला प्रकार मनाविरुद्ध तर खराच! पण वडिलांच्या आज्ञेप्रमाणं कामाचा बोजा उठविलाच पाहिजे!

**वसंत**—तिथें निरुपाय आहे. लग्नतिथिसुद्धां निश्चित झाली का?

**माधव**—सर्व कांहीं झालं आहे. आतां काय तो अक्षता पडण्याचाच अवकाश! तेवढं झालं कीं आमची

मंडळी कृतकृत्य झाली ! वरं तें जाऊं दे. तें लग्न आतां व्हायचंच. मी आतां त्याचा विचारच सोडला. पण सायंकाळीं आज आपण मित्रमंडळी बोलावली आहे त्यांच्या स्वागतविधीचा कार्योपक्रम कसा काय ठरविला आहे ? हो ! गैरकायप्रभृति बडयाबडया मंडळीचा बडेजाव नीट राहिला पाहिजे. नेटिव्ह आणखी इंग्रज एका ठिकाणीं आणण्याची ही तुझी कल्पना फार उत्तम आहे बोआ !

**वसंत**—तुझं साहाय्य असलं म्हणजे कुठचंच व्यंग राहायचं नाहीं. आजच्या बेताची उठावणी आपल्या दक्षतेवर अवलंबून आहे.

**माधव**—मीं तयारच आहें. आणखी आज तर मला मोठ्या उत्साहानं मदत केली पाहिजे. कारण, आमच्या वसंतरावाना लौकरच जीं सरदारीचीं वस्त्रं मिळायचीं आहेत, व त्याबद्दल जो मोठा समारंभ व्हायचा आहे त्या सगळ्याची आज ही प्रस्तावनाच आहे!

**वसंत**—त्यांत कांहीं विशेष नाहीं. आजचा दिवस मात्र नीट साजरा झाला पाहिजे.

**माधव**—बरं पण आचार्य कुठं आहेत ?

**वसंत**—मी बागेंत फिरायला निघालों तेव्हां त्या पलीकडल्या वृक्षवाटिकेंत प्रातर्विधि आटपून उपनिषदावरील भाष्य घेऊन बसले होते. आतां इतक्यांत येतील. [ पाहून ] ते पहा, आलेच ! [ आचार्य प्रवेश करतात, वसंत माधव त्यांस उत्थापन देतात. सर्व आपआपल्या जागीं बसतात. ]

**आचार्य**—वसंता, आजचा दिवस तुझ्या आयुष्यांत संस्मरणीय असाच रहाणार ! माधवरावांची तुम्हाला मदत आहेच. तुमचं उभयतांचं प्रेम पाहून मला मोठा आनंद

होतो ! वसंता, तूं सकलशास्त्रपारंगतच आहेस. तथापि कुलोपाध्याय या नात्यानं तुला माझं नेहमीं सांगणं हेंच !

पद्य—चाल; ( धेनु पयोदा० )

**उच्च कुळीं ज्या जन्म होय तव त्यासि मनीं**
**स्मरुनी । तत्कीर्तीला साजे ऐशी नित्य करीं**
**करणी ॥ ध्रु०॥ तनुची दृढता सत्कार्यांची ख-**
**चित असे जननी । तिजविण पंगू यत्न स-**
**कलही देशोन्नतिकरणीं । स्वोदाहरणें तत्व**
**ठसवि हें अपुल्या मित्रगणीं । सामाजिक-**
**सुखसाधनरूपीं कीर्ति वरीं भुवनीं ॥ १ ॥**

**वसंत**—आचार्य, आपल्या उपदेशाप्रमाणं माझं नेहमीं वर्तन राहील. आपल्या समाजाच्या उन्नतीसाठीं तनमनधन अर्पण करण्याचा माझा तर संकल्पच आहे !

**माधव**—लोकसेवेंत आपलं बहुतेक आयुष्य घालविण्याचा ज्यांचा निश्चय अशा आचार्यांसारख्या महात्म्यांचं सहाय्य असल्यावर हा संकल्प तडीस जाणारच !

**आचार्य**—बरं, माधवरावाच्या भगिनीचा विवाह ठरलाच म्हणावयाचा !

**माधव**—आचार्य, शक्य तेवढा प्रयत्न करून चुकलों! वडिलांच्या जुन्या समजुतीपुढें माझा नाइलाज आहे !

**आचार्य**—असो, तूं आपलं कर्तव्यकर्म बजावलंस हें फार चांगलं केलंस !

**वसंत**—आचार्य, ह्या बालविवाहपद्धतीनं आपल्या समाजाची किती हानी झाली आहे !

पद्य—राग कानडा, ताल त्रिवट.

**बालवयींची परिणयरीती । अनर्थमाला-**
**जननी होती ॥ ध्रु० ॥ अज्ञवयींच्या तनुसं-**

सर्गं । उभय वरवधू क्षीणतमांगें । उत्साह-
बला पूर्ण विसरती ॥१॥ विद्यार्जनिं मन लव
नचि उरतें । स्त्रीस अधिक तें बाधक होतें ।
दासपणाची जडते नीति ॥२॥ अकालजननी-
भावपावतां । शिशुसंगोपन लेश नुमजतां ।
केंवि टळावी क्षीण संतती ॥३॥ राष्ट्र सर्वही
खुजट जाहलें । स्वातंत्र्याचें नांव बुडालें ।
वाढत राहे जनीं अवनती ॥ ४ ॥

**आचार्य**—सत्य भाषण केलंस ! अरे, ह्याला विवाह नांव देणं यथार्थच नाहीं ! कारण,

**पद्य**—चाल—अमोल देह०

धर्म अर्थ काम शब्द विप्रलाप भासती ।
स्त्रीपुरुषां उभयतांस बंधनीं न गोंविती ।
उभयपक्षिं विदित नसे शब्दशक्ति जोंवरी ।
'जाहला विवाह' वाक्य विफल कां न तोंवरी ।

**माधव**—आचार्य, ऐतिहासिक दृष्ट्या पाहिलं तर हा चिमणाचिमणीविवाह प्रचारांत येऊन असंख्य काळ लोटला आहे असं नाहीं. अगदीं अलिकडलाच आहे ! वास्तविक पाहिलं तर जसा काळ बदलतो तशी रीतही बदलावी लागते. पण ' शास्त्राद्रूढिर्बलीयसी ' असं म्हटलं म्हणजे आमच्या मंडळीचं समाधान झालं ! जास्त विचार कोणी करावा ? आचार्य,

**पद्य**—चाल—तुमच्या प्रीतिसीं.

एकदां योग्य भासलें । तरि तें नाहिं चांगलें
॥ध्रु०॥ बौद्धमताच्या संन्यासा ललना आद-
रिती । तत्प्रतिबंधास्तव लोकीं योजिलि हे
रीती ॥१॥ पतिसत्तेच्या रज्जूनें आकळुनी

**युवती। बाळपणीं हें लादियलें जोखड त्यां वरती ॥ २ ॥**

**वसंत**—उघडच आहे! पण आतां समाजाच्या परिस्थितीकडे नीट लक्ष पुरवून लोकांच्या पुढाऱ्यांनीं ह्या चालींत योग्य तो बदल केलाच पाहिजे!

**आचार्य**—बरोबर आहे! त्यांनीं मनांत आणलं तर विलंब लागणार नाहीं. वचनच आहे! 'समयश्चापि साधूनां प्रमाणं वेदवद्भवेत्. ' दुसरं असं, प्राचीन काळीं ह्या पुण्यभूमींत ही घातुक चाल नव्हतीच! कारण,

पद्य.

**स्त्रीजातीचा विवाह ऐच्छिक रीति पुरातनची।**
**तिजला सद्योवधूत्व देणें कृति मन्वादींची।**
**पूर्वकल्पगत उपवीताची रीती जाऊनी।**
**ब्रह्मचारिणीव्रतावलंबन नाशा पावूनी।**
**स्त्रीकारावें केवळ दासीभवना पतिभवनीं।**
**हीच होउनी वसली शाश्वत रूढमती स्त्रीची ॥१॥**

**वसंत**—तात्पर्य, बलवान् पुरुषवर्गानं निर्बल स्त्रीवर्गाचं स्वातंत्र्य सर्वस्वी हिरावून घेतलं! बरं पण आचार्य स्मृतिकारांनीं स्त्रीवर्गाचं सद्योवधूत्व कायम केलं—पण वयासंबंधानं फारच घोंटाळा दिसतो!

**आचार्य**—सत्य आहे! पणं हा घोंटाळा नाहींसा व्हायला उपायही आहे! वसंता,

पद्य—चाल—गार अशा या०.

**स्मृतिकारांहीं स्त्रीचा परिणय अवश्य जरि तो मानियला ॥ तरी वयाचें प्रमाण एकचि अभिमत नाहीं सर्वांला ॥ त्यांत दीर्घतम असेल जें कां प्रथम स्वीकारुनि त्याला ॥ क्रमाक्रमानें**

**विवाहावधी पाहियजे मग वाढविला ॥ २ ॥**
**विद्यायोगें प्रगल्भतेतें पाववितां स्त्रीचित्ताला॥**
**होईल शक्य क्रमें दाविणें स्वयंवराच्या**
**मार्गाला ॥ ३ ॥**

**माधव**—असंच झालं पाहिजे ! स्वयंवराची चाल पडलीच पाहिजे !

**वसंत**—ती पडेल तो सुदिन ! [ शागीर्द स्नानाची वर्दी देऊन जातो. ]

**आचार्य**—बराच उशीर झाला. [ सर्व उठतात. ]

**वसंत**—माधवराव, आचार्यांना घेऊन मुदपाकाकडे चला. मी असा वळसा घेऊन येतों. [ आचार्य व माधव जातात. ] हा काल किती शांततेचा ! विचारस्वातंत्र्याचा पूर्ण फायदा घेण्याचा हाच प्रसंग ! स्वोन्नति करण्याचा हाच सुसमय ! समाजोन्नतीचं तारूं पुढें ढकलण्याची हीच वेळ ! यांत काडीमात्र संदेह नाहीं !

पद्य—चाल—झाली सफल०

**देशीं प्रकट ही शांतता दिसे ॥ ध्रु० ॥ दंगे**
**धोपे विसरुनि सारे, विश्रम पावति लोक कसे॥**
**जीवित वित्त सुरक्षित तेणें जन निजभवनीं**
**स्वस्थ वसे ॥ १ ॥ ईशदयेनें कुटुंब सुस्थिति**
**साधुं समय हा योग्य असे ॥ आधिभौतिकी**
**उन्नति येइल मागुनि संशय यांत नसे ॥ २ ॥**

[ चार पावलें चालून ] विवाहशृंखलेनं मला बद्ध करून टाकण्याचे माझ्या आप्तवर्गाचे किती भगीरथ प्रयत्न चालले आहेत ! कांहीं विवक्षित काळपर्यंत अविवाहित राहण्याचा माझा निश्चय मुळींच ढळायचा नाहीं हें यांच्या कसं लक्षांत येत नाहीं ? ब्रह्मचर्यव्रताचा महिमा यांना

कळत नाहीं हेंच आश्चर्य ! खरंच जसंजसं अधिक उच्च कुळ, जसजशी अधिक श्रीमंती तसतशी अगदीं बाळपणीं लग्न लावण्याची हौस जास्तच ! काय हा प्रमाद ! अविवाहित तरूणाच्या अंगीं जी धमक, जी शक्ति, जो उत्साह असतो तसा माझ्या विवाहित समवयी मंडळींत एकाच्या अंगीं तरी वास करीत आहे का ? छे ! छे ! ह्या समजुती कधीं नष्ट होतील त्या होवोत ! [ घड्याळ पाहून ] अरे—बराच उशीर झाला ! [ वर पाहून ] सूर्यही बहुतेक माध्यान्ही आलाच ! अहाहा !

पद्–चाल–धीरा भ्रमरा०

**सुधारणेचा भानु सदोदित समाजरूपांबरीं । विराजो प्रखरतमीं निजकरीं ॥ ध्रु० ॥ अनेक जाती पंथ अनेकाहि पोटभेद किति तरी । असती नक्षत्रांचे परी ॥ १ ॥ त्या सर्वांच्या अस्तित्वेंही तिमिर न राहे दुरी । अज्ञता-रूपें वासा करी ॥ २ ॥ धर्मगुरू ते परप्रकाशी त्यांस इंदुची सरी । नेणती तमोनाशकूसरी ॥ ३ ॥ नक्षत्रांचें दर्शन टाळावया ॥ अज्ञानाचा परिहार व्हावया ॥ अमुच्या यत्नीं ईश्वर द्यावो दया ॥ समाजस्थिती परम समुज्वल राहिल तेणें जरी ॥ धन्यता तरि समजावी खरी ॥ ४ ॥**

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ—रस्ता.**

**कटपट**०—अरसं झालं पाहिजे ! नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं ! मध्यस्थांची देणगी आजच्या

आज त्यांच्या पदरांत न पडेल तर आजचा गोरजमुहूर्त अंतरून लग्न खास मोडणार असं जेव्हां नीट समजावून सांगितलं तेव्हां कार्यभाग झाला. काय म्हणे, मागाहून देऊं! कच्च्या गुरूचे चेले नाहींत! पैसे द्यायच्या वेळीं तात्यासाहेबांनीं किती पण आढेवेढे घेतले! पण 'आमची सुभद्रा तालेवाराच्याच घरीं पडली पाहिजे' असा जेव्हां वहिनीसाहेब हट्ट धरून बसल्या तेव्हांच आमचे बाईलबुद्धी तात्यासाहेब वठणीला आले! पण ते तसे आणखी या अशा आहेत म्हणूनच एवढी रक्कम आज आम्हाला लाभली! सगळं खरं! पण यांतली थोडी तरी त्या महामायेला नेऊन दिली पाहिजे; नाहीं तर ती आपली माया लगेच दाखवील! [ मागें पाहून ] ऑं! ठीक! ही आमचा सुगावा काढीत आमच्याच घराकडे येत आहे असं वाटतं! ही कोल्ही सावजाचा वास काढीत काढीत आली बरं! तरी पण मी आपली शिकार सर्वैथैव दवडणार थोडाच! [ थोडेंसे चालूं लागतो. ]

**गांवकाकू**—[ घाईनें प्रवेश करून ] अहो भटजी, अहो भटजी—

**लटपट०**—[ मागें वळून ] का काकू, इतक्या घाईनें कुठें चालल्यात?

**गांवकाकू**—तुमच्याच घरीं जायला निघालें आहें!

**लटपट०**—[ आश्चर्यानें ] आमच्या घरीं! आणखी इतक्या उतावळीनं! कशाला बुवा?

**गांवकाकू**—अहो, तुम्ही जी शिकार आपल्या बरोबर चालविली आहां ती तुमची एकटयाची नाहीं! आपली दोघांची आहे! तिच्यांतला वाटा घ्यायला जात आहे! आतां समजलं का?

**लटपट०**—अस्सं ! अस्सं !

**गांवकाकू**—तस्सं ! तस्संच हो ! तुमच्या खाकेंत जी पैशाची पुरचुंडी आहे नाहीं तिनं का एकदां तुमचं तळघर पाहिलं म्हणजे मग मी कवळ तळं राखल्यासारखंच होणार ! तुम्हीच कोण एकटे पाणी चाखणार ?

**लटपट०**—आमची कुठें तकरार आहे ! बाकी व्यवहार तुम्ही जाणतांच आहां. श्रमविभागाप्रमाणं प्राप्तीचेही विभाग होणं इष्टच आहे !

**गांवकाकू**—वारे व्यवहारी ! हें पहा, भटो, बोलण्यांतले छक्केपंजे मला सगळे समजतात ! एकदां सांगते आपल्या पहिल्या ठरावाप्रमाणं सर्व कांहीं झालंच पाहिजे ! नाहीं तर अजून–

**लटपट०**—[ मधेंच ] हें पहा, कबूल ! पण आतां हा वाद इथें रस्त्यांत नको. घरीं चला. आम्ही तुमच्या मर्जीबाहेर कसें वागूं ?

**गांवकाकू**—चला तर लवकर. मला पुन्हां गडबडीनं वहिनीसाहेबांकडे गेलं पाहिजे ! संध्याकाळीं लगीन ! हां हां म्हणतां दिवस जाईल !

**लटपट०**—मला तर तुमच्या दुप्पट घाई आहे ! आतांपासून याज्ञिकीचं संधान ठेवलं पाहिजे ! हा लग्गा तर पदरांत पडलाच ! आतां तेवढं याज्ञिकीसंबंधानं उरकलं म्हणजे दुहेरी लाट साधला ! [ जातात. ]

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**—तात्यासाहेबांचा वाडा—लग्नमंडप.

[ पडद्यांत मंगल वाद्यांचा ध्वनि होतो. बंदुकांचे आवाज होतात. लग्न लागतें. नंतर लग्नसभा—पानसुपारीचा थाट

**भिक्षुकांची** गर्दी होत आहे वगैरे देखावा दृष्टीस पडतो. ]

**पहिला**—[ दुसऱ्यास ] अजूनपर्यंत तर निभावलं म्हणायचं! शुक्लकृष्णपक्षाचा भेद इथं दिसत नाहीं हें आपलं भाग्यच !

**दुसरा**—अहो, मोठंच भाग्य ! कारण आज कांहीं चकारी पकारींतला प्रकार नाहीं !

**तिसरा**—अहो, निभावलं असं तुम्ही म्हणतां खरं, पण अजून गंध लावणं व्हावंयाचंच आहे ! आणखी तें काम आहे लटपटभटाकडे. त्याची काकदृष्टि आहे! म्हणून म्हणतो जें आहे तें पुढेंच आहे !

**पहिला**—बरं, असो, आपल्या पक्षांतलीही इथें बरीच मंडळी आहेत! कांहीं चिंता नाहीं. [ इतक्यांत लटपटभट भिक्षुकांस गंध लावीत लावीत येतो; व ही कृष्णपक्षांतली मंडळी आहे असं ओळखून ]

**लटपट०**—[ विरुद्ध पक्षाच्या भिक्षुकांस उद्देशून ] हें पहा, तुम्ही मुकाट्यानं उठून जा नाहीं तर नवीन ग्रामण्य होईल.

**तिसरा**—उठून जा म्हणजे? तुम्ही ब्राम्हण. न आम्ही शूद्र कीं काय ?

**लटपट०**—त्याच्याही पलीकडले ! अतिशूद्र पुष्कळ बरे ! पण तुमचा संसर्ग नको !

**पहिला**—तुम्ही सांगणार कोण ? यजमान सांगतील तर मात्र आम्ही क्षणभरसुद्धां येथें बसणार नाहीं समजलांत?

**लटपट०**—तुम्ही म्हणे सांगणार कोण ? या ब्रम्ह-वृंदाचा मी कोतवाल आहे म्हणून ! पुनर्विवाहाची दक्षणा घ्यायला पाहिजे नाहीं ! आतां तिकडेच जात चला ! इकडे कशाला आलेत?

प०—अससं ! असंसं ! आम्ही तर नाहीं ना पुनर्विवाह लावला ! नुसती दक्षणा घ्यायला कसला प्रतिबंध आहे ! आम्ही तुमच्यापेक्षां पुष्कळ बरे. अहो लटपटभट, भिक्षुक मंडळींनीं इकडे असला धार्मिकपणा दाखवायचा आणखी तिकडे बेलाशक अपेयपानादि अगम्यगमनादि नीच कृत्यं करायचीं याची नाहीं का तुम्हाला शरम वाटत!

एक—तोंड संभाळून बोला ! मर्यादा सोडलीत !

दु०—अहो मर्यादा तरी कुणाची राहिली आहे ! सगळीच तर तुम्ही सोडली आहे ! अहो हे लटपटाचार्य काय कमी आहेत !

लटपट०—तोंड आटपा, नाहीं तर बत्तिशी रंगवीन—बत्तिशी !

प०—अरे जा ! मोठा धाक दाखवितो आहे.

दु०—हे दलाल सुद्धां आहेत ! [ त्यांची मारामारी जुंपते. ]

आचार्य व वसंत—[ प्रवेश करून ] हं ! हं ! हं ! हात आटपा ! वाः ! फार चांगलं कृत्य ! आतां कांहीं शूद्रांनां हंसायला नको. काय हा अविचार ! तुम्हीं कुठें आहांत हें विसरलां वाटतं ! [ मंडळी बाजूला होतात. ]

लटपट—अहो, हे धडधडीत पुनर्विवाहाला जाऊन दक्षणा घेणारे यांना आम्ही आमच्यांत कसे मिसळून देऊं!

प०—अहो हे धडधडीत अगम्यगमन करणारे यांच्यांत तरी आम्ही कां बसूं ?

एक—अहो शिष्ट, अगम्यगमन ! त्यांत दोष तो कसला ! अहो, वचनच आहे ! ‘ मुखे वसति गंगा—’

लटपट०—योग्य ! [ सर्व हंसतात ]

आचार्य—शिव ! शिव ! शिव ! [ कानांवर हात

ठेऊन] ऐकवत सुद्धां नाहीं! ब्राम्हण्य अगदीं लयास गेलं!

**वसंत**—शांत व्हा! वेड्यासारखे बरळूं नका.

[ मंडळी आपसांत कुजबुजूं लागतात. ]

[ जरा बाजूला जाऊन ] आचार्य, आतां इथं काय बरं युक्ति योजावी? निष्कारण बहिष्कृत मानलेल्या या ब्राम्हणां नां विन्मुख जाऊं देणं चांगलं नाहीं.

**आचार्य**—हो! ही संधी बरी आहे. अरे, या दांभिक भिक्षुकांची ही उसनी घेतलेली धर्मश्रद्धा द्रव्याचं पोटं आमिष दाखविलं म्हणजे किती लवकर लटपटते हें पाहण्याची ही वेळ आहे!

**वसंत**—ठीक आहे! .असला प्रकार होणं इष्टच आहे! एखादी नवी चाल प्रचारांत आणून समाजहित साधण्याला प्रस्तुत कालीं हा एक मार्ग आहे. बरं आहे! विचारून पहातो.

**आचार्य**—ठीक आहे! माधवराव कशांत निमग्न आहे तें पहातों. [ जातो. ]

**वसंत**—[ लटपटभटास बाजूला घेऊन. ] काय हे भटजी! अशा वेळीं असला प्रकार तुम्हाला आवडतो ना! घरच्या मालकाकडे कांहीं नजर द्या.

**लटपट०**—माझं कांहीं म्हणणं नाहीं! हे इसम आमच्यांत मिसळले तर बाकीची मंडळी खास उठून जाणार आहेत.

**वसंत**—अहो, यानीं पुनर्विवाहाची दक्षणा घेतली म्हणून हे बाटले कीं काय?

**लटपट०**—मला तें कांहीं समजत नाहीं. आपल्याला म्हणून सांगतों बरं, ही मंडळी उठतील इतकंच नव्हे

तर ग्रामण्य होऊन यजमानावर बहिष्कार सुद्धां घालतील. पहा बुवा!

**वसंत**—[ स्वगत ] काय करावं! अंगाची अगदीं लाही लाही होऊन जाते! पण प्रसंग निराळा आहे. [ उघड ] हें पहा, लटपटभटजी, असल्या प्रसंगीं वाद माजविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यानं म्हणावं एकेक रुपाया जास्त दक्षणा घ्या पण तंटा करून, आलेल्या ब्राम्हणास परत पाठवूं नका. जा अगोदर. पहा जुळतं कां! [ लट-पट० व इतर कुजबुजतात. इतक्यांत आचार्य व माधव प्रवेश करतात. ]

**माधव**—[ वसंतास ] साधली का युक्ति!

**वसंत**—आतां तेंच पहाणं आहे.

**लटपट०**—[ त्रिवर्गाजवळ येऊन ] ऐकत नव्हतींच! पण मोठ्या मिनतवारीनं एकदां कबूल करविलं आहे झालं! पण एवढं आहे, या भटांवर ग्रामण्य होणार आहे·तें टळेल असं दिसत नाहीं.

**वसंत**—बरं जा. त्यांना नेऊन बसवा. [ तो तसें करण्यास जातो. ] माधवराव, पानसुपारी वाटायला घ्या. [ माधवराव तसें करूं लागतो. ] उद्या हवं तें करा. आम्ही म्हणें ग्रामण्य करणार! थांबा! तुमची पुरी फजिती उडविली पाहिजे!

**आचार्य**—वसंता, खरोखर असल्या अधिकाराला हा भिक्षुकगण अगदींच नालायक होत चालला आहे!

**पद्य**—चाल—रहुं काय तुला॰

**भलत्याच परी करिं अधिकार योग्य न या असणें ॥ ध्रु० ॥ गृहस्थ यांतें भीक घालिती। तेणें शेफारुनि निजमति। अनाचार हे माज-**

वितासी । सामाजिक हित नोळखुनी । बाह्य-
पिक्रयेच्या खोट्या नांवें । क्लेशविती हे सुजन-
मनें । गृहस्थ घेती मनावारि जरी । विचार
याचा करिति सभांतरिं ॥ क्षणाहि न लगतां
निश्चित मग तरि । काकशदितसम भटलसणें ॥

**बसंत**—यांत काय संशय? चला. [ आचार्य व
बसंत जातात. पानसुपारी वाटून झाल्यावर थोडा वेळ
वारांगनांचें नृत्य होऊन पडदा पडतो. ]

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**— तात्यासाहेबांचा दिवाणखाना—

[ तात्यासाहेब सचिंत बसले आहेत. ]

**तात्यासा०**— [ स्वगत. ] एकुलती एक मुलगी आणखी तिची अशी दशा व्हावी आं! प्रारब्ध माझं! आम्ही आपल्याकडून नीट म्हणून पाहिलं पण काळाला नाहीं तें आवडलं त्याला काय करणार? आठ वर्षं झालीं! या हृद्रोगानं माझी काय दशा झाली आहे ही! घरांत तिची तरी काय अवस्था झाली आहे! सुभद्रेची कष्टमय वैधव्यदशा पाहून एकदां असं वाटतं कीं, तीचं जगांतून नाहींशी झाली असती तर पत्करतं! माझ्या सुभद्रेकडे पाहून कुणाचं अंतःकरण द्रवणार नाहीं? हर! हर! हिच्या काळजीनं आम्ही असंच झिजून झिजून मरावं असा ईश्वरी संकेत दिसतो! राम! राम! राम!

**लटपट०**—[ प्रवेशकरून ] नमस्कार तात्यासाहेब!

**तात्यासा०**—नमस्कार! या. आज कुणिकडे?

**लटपट०**—आमंत्रण करायला आलों आहे.

**तात्यासा०**—कसलं बुवा!

**लटपट०**—अहो, आमच्या आनंदीचं लग्न ठरलं! स्थळ तर फारच चांगलं मिळालं आहे!

**तात्यासा०**—कोणचं बरं!

**लटपट०**—तें कांहीं विचारूं नका. चवदा वर्षांची होईपर्यंत वाढविली खरी, पण आज त्याचं चीज झालं!

**तात्यासा०**—पण देतां कुणाला?

**लटपट०**—अहो आपल्या श्रीमंत अण्णासाहेबांना!

**तात्यासा०**—खरंच का हे?

**लटपट०**—कां? आपल्याला आश्चर्यसं वाटलं? हं! समजलों! थोडेसे पोक्त आहेत म्हणून कीं काय?

**तात्यासा०**—भटजी, कांहीं विचार करा. केवळ पैशाकडेच पाहूं नका. तुमची एकुलती एक मुलगी ना? तुमच्या आवडीला अशा थेरड्याला देऊन तिचं जन्माचं मातेरं कां करतां? श्रीमंतांना चळच लागला आहे! पण तुम्ही कांहीं विचार करा.

**लटपट०**—अहो, पोरींना नवरे अगदीं तरणे पाहिजेत! कबूल! पण सगळ्याच गोष्टी लग्नाच्या कामांत जुळतात कुठें? नुसता तरणा नवरा पाहिला म्हणजे झालं का? दुसऱ्याही गोष्टी पाहिल्याच पाहिजेत. मी कांहीं तिचं वाईट करीत नाहीं. होऊं नये पण हें पहा, तसाच कांहीं वाईट प्रकार झाला तर तिला कांहीं कमी नाहीं! श्रीमंताचं वैभव काय वर्णावं? दुसरा वारस ही कोणी नाहीं! मग काय वाईट आहे?

**तात्या०**—अहो, अजून विचार करा. मी भोगीत असलेल्या दुःखाची कांहीं कल्पना करा.

**लटपट०**—आतां बोललों तर आपल्याला वाईट मात्र वाटेल! आपण आपल्या सुभद्रेला अगदीं कोंवळा नवरा करून दिला होतात मग तिला का वैधव्य आलं! तें कांहीं नाहीं! मरण कोणाच्या स्वाधीन नाहीं! म्हणून म्हणतों आज आलेलं घबाड घालवूं कीं काय?

**तात्या०**—मर्जी तुमची!

**लटपट०**—बरं आहे! दशमीचा मुहूर्त कायम केला

आहे, सर्वत्रांनीं यायचं. अगत्य यायचं बरं! कारण, अण्णासाहेबांची हौस! लग्नसोहळा मोठ्या थाटानं करणार आहेत. मी येतो आतां.

**तात्या०**—यावं [ तो जातो ] हा नीच आणखी तो अण्णासाहेब महा नीच! मला म्हणे तुम्ही काय केलंत? अरे सगळं खरं! माझ्या चुकीचं मीं प्रायश्चित्त भोगीतच आहे. पण तूं माझ्यापेक्षांही मोठी ढोबळ चूक करीत आहेस! यांच्या या राक्षसी वासनेला काय म्हणावं! असो; ' बुद्धिः कर्मानुसारिणी ' हेंच खरं.

[ जातो. ]

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक ....
नों. दि. ....

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—वसंतरावाच्या वाड्यापुढील रस्ता.

[ वसंत व माधव बोलत प्रवेश करतात. ]

**वसंत**—माधवा, तूं असा हा शोक किती दिवस करीत बसणार? मित्रा,

पद्य—चाल—वसुनि कोणती.

**शांत करीं मानसासि कांहिं तरि धीर धरीं ॥**
**सुविवेका आपुलिया ठाव देईं अंतरीं ॥**
**तेंचि तेंचि दुःख मनीं ॥ करित बससि आठ-**
**वुनी ॥ अजवरिचें विपिनरुदित काय होय**
**मम तरी ॥**

**माधव**—मित्रा, मी पुष्कळ विवेक करतों पण सुभद्रेची भावी स्थिति मनांत आली म्हणजे कांहीं सुचत नाहींसं होतं! पण हें बघ—अगदीं मनांतली गोष्ट सांगूं का!

**पद्य**—चाल–काय परम रमणीय०

**भगिनीविषयक अनर्थ भावी स्पष्ट मला दिसतो ॥**
**स्नेह तुझा मजविषयीं परि हा धैर्य मना देतो ॥**
**गतगोष्टीचा तव सहवासें विसर मला पडतो ।**
**तोचि परी सहवास पुनरपी स्मरणा जागवितो ॥**
**शांतविण्या मज उपाय एकचि । तो मज**
**गमतें तत्र करिं वसतो ॥**

**वसंत**—हें कसं काय ?

**माधव**—तें आजच सांगत नाहीं. पण सांगितलं हें मात्र अगदीं खरं आहे !

**वसंत**—तूं कांहींच स्पष्ट सांगत नाहींस तेव्हां मी तरी काय समजूं ? तुझं समाधान करण्याचं माझं काम आहे आणि तें मी करीतच आहें. ह्याचशा काय, पण तुझ्या कोणत्याही दुःखाचा वाटेकरी होण्याला मी एका पायावर तयार आहें!

**माधव**—मला तरी तेंच पाहिजे ! बरं तें असूं दे; तूं आज कांहीं नवल विशेष ऐकलं आहेस का ? आपल्या समाजाच्या खडतर चालींना एक नवा बळी लवकरच पडणार आहे !

**वसंत**—[ आश्चर्यानें ] तो कोण बरं ?

**माधव**—अरे लटपटभटाच्या आवडीचं लग्न ठरलं ! त्या अण्णासाहेबांना द्यायची ! दशमीचा मुहूर्त धरला आहे.

**वसंत**—अरेरे ! नशीब बिचारीचं ! बुडाली म्हणायची !

**माधव**—आतां तो थेरडा तिच्याशीं विलास करणार !

का! कशा आहेत आपल्या चाली! लटपटभटानं आज चवदाशें रुपये घेऊन पोरीला विकली म्हणायची!

**वसंत**—तो तर खाटीकच आहे! पण त्या अण्णासाहेबांची काय ही भयंकर कामवासना! असा एक कायदा असावा कीं, असल्या लोभी बापाला आणि असल्या जांबुवंत वराला सक्त मजूरीची कैद! पण कायदा—छे! तेंही बरोबर नाहीं!

**माधव**—नाहींच बरोबर! समाजानंच या गोष्टीचा निर्बंध केला पाहिजे. त्यावांचून मुख्य हेतु सफल व्हायचा नाहीं.

**वसंत**—पण सरकाराजवळ कायदा मागायचा नाहीं; आणखी आपला समाज तर तिकडे लक्ष देत नाहीं—म्हणजे ' आई जेवायला घालींत नाहीं व बाप भीक मागूं देत नाहीं. ' अशांतलाच प्रकार होत आहे हें मात्र खास!

**माधव**—पण आतां लोकांचे डोळे लवकरच उघडतील असं तुला नाहीं का वाटत?

**वसंत**—तसं असतं तर असले जरठोद्वाह कां होते? ही रूढीरूप राक्षसी आणखी असे किती बळी घेणार कोण जाणें!

**माधव**—बरं पण श्रीमंतांचा तो लग्नसोहळा पाहयला मजबरोबर येशीलना?

**वसंत**—मित्रा, अरे तो लग्नसोहळा कसला? त्या गरीब अबलेची ती केवळ विटंबना नाहीं कां?

**पद्य**—चाल—गंगानदि०

**लग्नसोहळा खोटा ही तर थट्टा लग्नविधीची॥**
**विटंबना ही पूर्व मुनींच्या स्तुत्य अशा हेतूंची॥**
**फुकट आढ्यता नसतें वैभव अंगीं दाख-**

**विण्याची ॥ वृद्धधनिकमनें राहुनि पिकते पोळी धनलोभ्यांची ॥**

आणखी असली विटंबना पाहायला तुला जावसं वाटतं?

**माधव**—तसा अर्थ नाहीं! नुसत्या गोष्टी ऐकून मनावर जो बरावाईट परिणाम होतो त्यापेक्षां त्या प्रत्यक्ष घडलेल्या पाहिल्या असतां त्यांचा मनावर जास्त ठसा उमटतो. म्हणून जायचं इतकंच!

**वसंत**—ठीक आहे! जाऊं बरोबर. पण चला, सभेची वेळ झाली. वक्तृत्वोत्तेजक सभेला वेळेवर गेलंच पाहिजे. कारण सध्यां ह्या कलेची आपणास फार जरूरी आहे. इतर गोष्टीप्रमाणं सामाजिक हित साधण्यास ही बरीच उपयोगी पडणार आहे!

**माधव**—चला तर. [ दोघे जातात. ]

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—लटपटभटाचें घर.

[ विड्या तोडण्याचा समारंभ. स्त्रीमंडळाचा आवडीस ( वधूस ) विड्या तोडण्याबद्दल आग्रह चालला आहे. ]

**गोपिका०**—हें काय बाई नवल! लग्नाच्या चवथ्याच दिवशीं एवढा का हट्ट? नवऱ्याजवळ विड्या तोडायच्या नाहींत मग दुसऱ्या कुणाजवळ तोडायच्या?

**वारुणा**—काय मेलं चिन्ह न् थेरंच! ह्या अलिकडच्या मुली अशाच हो! आळा घालायला आई नाहीं म्हणून हवा तसा धिंगाणा घालते आहे दुसरं काय?

**यमुना**—[ हळूंच ] आवडे, अग कसं झालं तरी नवरा ना तो? अग, पदरीं पडलं न् पवित्र झालं! **ऊठ**

अन् पटकन् तोड झालं. आहे काय त्यांत? तसं केलं नाहींस तर तुझ्या नवऱ्याला राग नाहीं का येणार?

**आवडी**—मी नाहीं जा मुळींच तोडायची! काय माझं होईल? मरणाला सुद्धां मी आतां भीत नाहीं! [ रडते]

**अण्णासा०**—तसलं कांहीं उपयोगीं नाहीं. विड्या तोडल्याच पाहिजेत! ही तर मोठी हौस! पण हें काय? छे! छे! पानाची न् असली खोबऱ्याची लांबलचक विडी अगदींच निरुपयोगी! जारे बाळ्या, एक लवंग आणं जा—लवंग! लवंगेची विडी उत्तम! [ आवडी-कडे पाहून झोंक्यानें हंसतो. ]

**बाळ्या**—जातो पण काकासाहेब, हिला मी काय म्हणूं?

**अण्णासा०**—[ हळूंच ] बाळ्या तुझी ती काकू हो!

**बाळ्या**—छे! काकासाहेब, माझी काकू केव्हांच मेली! ही नाहीं माझी काकू. माझी काकू पुष्कळ मोठी होती!

**अण्णासा०**—अरे, तुझी ही दुसरी काकू हो! हिला काकू म्हणावं बरं!

**बाळ्या**—छे! ही नाहीं मला काकू शोभत! काका साहेब, मला बहीण कुठं आहे? मी आपला हिला ताईच म्हणेन बरं का? हं! हं! ताई, ताई, बरं!

**अण्णासा०**—चल निघ! मूर्ख कुठला!

**बाळ्या**—ही पहा माझ्या खिशांत एक लवंग आहे. ताई, ही घेऊन ठेव. काकासाहेब आतां विडी तोडणार आहेत. पण काकासाहेब ही रडते कांहो?

**अण्णासा०**—[ रागानें ] या चघळ कारट्याला इथं कोणी आणलं? वारणा, याला अगोदर तिकडे ला-वून दे पाहूं.?

**बाळ्या**—मी नाहीं जायचा! मी आपला या नव्या ताईजवळच बसेन!

**अण्णासा०**—[ हात उगारून ] जातोस कीं नाहीं इथून ? [ आवडीकडे पाहून ] आमचा राग मोठा कठीण आहे. चल निघ !

**बाळ्या**—[ डोळे चोळीत ] हें काय काकासाहेब ? तुम्ही एकटे विड्या तोडणार ना ? मला नाहीं का ? हूं ! हूं ! हूं! [ रडत जातो. ]

**अण्णासा०**—वारणा, अम्हाला उशीर होतो.

**वारणा**—आतां ती ऐकतच नाहीं त्याला काय करावं बाई ? जाऊं दे ! पोरीचीच जात आहे. तुम्हीच तोडा म्हणजे झालं. [असें म्हणून आवडीच्या तोंडांत लवंग ठेवते.]

**अण्णासा०**—बरं आहे बुवा! आम्ही तोडतों ! [ तसें करण्यास वांकतो, ती मान फिरवते. पडदा पडतो. ]

[ वसंत व माधव पडद्याबाहेर येऊन. ]

**माधव**—का ! कशी आहे हौस ?

**वसंत**—आग लावा त्या हौसेला ! गरीब अबलांची ही विटंबना आपली मंडळी डोळे मिटून पहातेना ? मग पशूंत आणखी आपल्यांत काय फरक आहे बरं ?

**माधव**—मित्रा, बाळ्या म्हणाला तें कांहीं खोटं नाहीं ! त्याला ती बहीणच शोभते ! आतां या वृद्ध कपीपासून आवडीला लग्नाचं काय बरं सुख मिळणार आहे? अशा स्थितींत तिचं जर प्रसंगीं वाईट पाऊल पडलं तर तिला कां दोष लावावा ?

**वसंत**—धिक्कार असो या पुरुषांच्या अप्पलपोटेपणाला ! खरोखर, या निंद्य चालीनं आपल्या समाजाला खालीं पाहयला लावलं आहे ! माधवा,

पद्य—चाल—ग्रंथिला यानें—

अति अप्पलपोटे, शास्त्रांचे रचिते। झालों
आम्हि अम्हांपुरते ॥ अतिस्वार्थकर्यीहो, अ-
नेक वनितांतें। कराया सोकळीक अमुतें॥ २॥
परि अतिमुग्धांहीं नष्टभर्तृकांतें। न देऊं एक-
हि वरुं पतितें॥ ३ ॥ नीच निंद्य आम्ही समाज-
हितहंते। जाहलों पात्र दूषणांतें ॥ ४ ॥

[ जातात. ]

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—सुभद्रेचें सरस्वतीमंदिर.

[ सुभद्रा वाचनांत निमग्न आहे. ]

**आवडी**—[ प्रवेश करून ] सुभद्रे! [ निमग्न आहे असें पाहून ] वाचायला येत असलं म्हणजे असं असतं! कांहीं करमेनासं झालं म्हणजे एखादं चांगलंसं पुस्तक घेऊन बसावं, मग कशाला बाई भलतीकडे विचार जाणार आहेत? [ मोठ्यानें ] अहो सुभद्राबाई, आंत येऊं का?

**सुभद्रा**—[ चपापून ] अग बाई! आवडे, आंत येऊं का म्हणून विचारायला का हवं?

**आवडी**—अग, तूं इंग्रजी शिकलेली! आणखी ही इंग्रजी रीत तूंच नाहींका त्या दिवशीं सांगितलीस?

**सुभद्रा**—शर्थ झाली बाई तुझ्यापुढें! नुसती रीत सांगितली म्हणून काय झालं? अग आपण त्यांची भाषा शिकलों म्हणून आपल्याला त्यांचे रिवाजसुद्धां का पाळले पाहिजेत? बरीच बोलायला शिकली आहेस हो! पण अशी इकडे ये. [ दोघी बसतात. ] आवडे, माझी तुला आज बरेच दिवसांनीं आठवण झाली म्हणायची!

**आवडी**—मला बाई वरचेवर इकडे यावंसं वाटतं! पण आतां मी पहिल्यासारखी मोकळी का आहे?

**सुभद्रा**—असं का? घरांत मालकीण काय ती तूंच! आणखी नवरा बिजवर म्हणून तर अगदीं अर्ध्या वचनांत असायचा!

**आवडी**—बाहेर जायची मला किनई अगदीं सक्त मनाई झाली आहे. अग हेंचसं काय? जें आहे तें आपलं बरंच आहे म्हणायचं, दुसरं काय?

**सुभद्रा**—[ स्वगत ] हिचं मन पाहण्याकरतां असंच बोलावं! [ प्रकाश ] का बरं? तुझं काय कमी पडतं आहे? आवडे, तुझं वैभव काय वर्णावं बाई?

पद्य—चाल—मुद्रा तुमची :—

**श्रीमंतांची पट्टराणी तूं मोठ्या भाग्याची। पूर्व-जन्मिंच्या पुण्यबळानें मूर्ती लक्ष्मीची॥ ध्रु०॥ दागदागिने नोकरचाकर उंच हवेली ती। गाड्याघोडे बागबगीचे पक्कान्नां न मि-ती॥ १॥ काय असे तुज उणें तुजवरी पति करिती प्रीती। विसंबती नच फुकट न मानीं स्थिति हे कष्टाची॥ २॥**

**आवडी**—सुभद्रे, तुला सर्व ठाऊक असून असं म्हणतेस हें तुला शोभतं ना? बरं बाई!

**सुभद्रा**—हं! समजलें! अग पण ते जरा वयातीत असले म्हणून काय झालं? अगदीं माझ्यासारखं तर नाहींना? घोड्यावर बसणाऱ्यानं पायीं जाणाऱ्याकडे पाहू-नच समाधान मानावं! दुसरा कांहीं इलाज आहे का बाई?

**आवडी**—माझ्या दुःखावर डागण्या देणं तुला बरं वाटतं ना? [ आसवें येऊन ] कुणी ऐकत नाहीं ना!

हे बघ, फार काय सांगूं? असल्या मळमळीत सौभाग्या-पेक्षां झळझळीत वैधव्य काय वाईट?

**सुभद्रा**—आवडे तूं शुद्धीवर आहेस ना? मी आपलं सहज विचारलं म्हणून असलं अभद्र का बोलावं?

पद्य—चाल—स्फटिकाचे ते०—

**भलतें काय असें हें वदसी। स्त्रीपण अपुलें**
**केंवि विसरसी॥ प्रबल पुरुष ते शास्त्रें करि-**
**ती। समाजरूढी तेचि ठरविती॥ चैन आ-**
**पुली मात्र साधिती। अबलाक्लेशा मनीं**
**नाणिती॥ अपरिहार्य गति समजुनि चित्तीं।**
**दूर करीं या संतापासी॥**

**आवडी**—खरं आहेग! परदुःख शीतल आहे म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं!

**सुभद्रा**—पण खरंच सांग, माझ्यापेक्षां तूं थोडी तरी सुखी नाहींस का?

**आवडी**—कशी बरं असेन? सुभद्रे,

पद्य—चाल—अनिवार मनुज०—

**वद काय मिळालें आजवरी तें मजसी सुख**
**बाई। दुर्भाग्यें शिशुपणीं त्यजूनी वरी मृत्यु**
**आई। जनकें ही। लव न दया। मनिं धरिली**
**मजविषयीं॥ मजसि गमे। लाज गडे। तो**
**जनिता। हें वदुं ही॥ विफल करी मम जन्म**
**खचित तो खाटिक नाचि काई॥**

खाटिक तरी पुष्कळ बरे हो!

**सुभद्रा**—शिव! शिव! आईबापांसंबंधानं मात्र मी तुझ्यापेक्षां सुखी आहे खरी! पण—

**आवडी**—पण काय ? आतां येऊन जाऊन तिकडलं सूख ना ? त्याच्या नांवानं तर आवळ्याएवढं पूज्य ! अग सुख तर बाजूलाच राहिलं—पण नकोग बाई तो त्रास ! सुभद्रे,

पद्य—चाल—तरि अतां त्यासीं—

**इतर तीं वैभवें मिळुत न वा अबलांतें ॥**
**प्रिय एक भर्तृसुख त्यांतें। मज जरी शून्य**
**खचित तें। वांया तरी कां न हो सकल जन्म**
**तें ॥ ध्रु० ॥ दिसे भोंवतीं जरि घर भरलें।**
**तरि त्यायोगें सुख तें कसलें। उलट मना-**
**ला पीडा, डसलें। कीं जणु कुतरें। तें विष**
**पसरें। काय थरथरे। सर्वांगाची होते लाही।**
**पुनः पुन्हा मज मूर्च्छा येई। करूं काय—**
**हय हाय।** [ सुभद्रेच्या गळां पडते. ]

**सुभद्रा**—आवडे, असं काय हें? उगी ! अरेरे ! पुरुषांची बाई ही करणी फार वाईट !

**आमडी**—मला बाई एक मोठी धास्ती पडली आहे.

**सुभद्रा**—ती कोणती बाई ?

**आवडी**—सुभद्रे, असा हा छळ मी बाई किती दिवस सहन करूं ? वाईट पाऊल पडण्याची मला बाई मोठी भीती वाटते ? तिकडल्या त्या म्हातारपणच्या हौसेनं मला बाई अगदीं जीव नकोसा होतो !

पद्य—चाल—मनीं कोणी धरीती न०—

**काय बाई होय माझी गति न कळे।**
**चित्त पाहें भटकुनि जाया । निश्चयें**
**त्या आकळाया । यत्न करितां जाती**
**वांया । मति हि चळे ॥ ध्रु० ॥ उपचारा-**

स्तव बाह्यभूषणें घालितसें। माल्यादिकही
त्याच हेतुनें सेवितसें। परि त्यायोगें त्रास
मना अति होत असे। वहकुनि मम मन अ-
योग्य वाटे। जाईल निश्चित मज भय वाटे।
कृष्णमुखा मग कवण्या थाटें। दावूं तूंतें।
विधिचें लिहिलें न टळे॥ [ रडते. ]

**सुभद्रा**—आवडे, उगी! असा अविचार कधीं करूं नको. अग, आपलं सत्व दाखवायची हीच वेळ आहे!

पद्य—चाल—वधू ही वल्ली०

त्यजीं हे वाणी। करिं विवेक अंतःकरणीं॥
अविचाराचें वर्तन करितां। क्षणैक गमलें
सुख जरि चित्ता॥ तरि जन्माचा नाश तत्व-
तां। मनीं हें आणीं॥ १॥ कांचपात्र तें जरि
बहु सुंदर। असलें तरि तें आहे भंगुर। भं-
गुनि जातां प्रीति तयावर। करीना कोणी॥ २॥

आवडे, तुला पीडा होते आणि मला मुळींच होत नाहीं असं कां तूं समजतेस? पण त्याला इ-लाज का आहे? अग, आपण असंच झिजून झिजून मेलं पाहिजे! म्हणजे या पुरुषांच्या कठोर अंतःकरणाला कांहीं तरी पाझर फुटेल! आपले बळी आपल्यासारख्या हजारों देशभगिनींच्या सुखास केव्हां तरी कारण नाहींत का होणार! हें का थोडं समाधान आहे!

**आवडी**—पुरे बाई! बायकांनीं तेवढं समाधान मानावं! आणखी पुरुषांनीं आपलं हवं तसं करावं! मला नाहीं बाई हें आवडत!

**देहभानही सुटुनी जातें। वदुं काय पुढें तें मजला। नाचि सुचे विवश झालीला॥**

**सुभद्रा०**—पण असं विवश होऊं नये ! अग, आपलं मन आपल्या ताब्यांत नाहीं म्हणजे काय ? एक निर्धार केला म्हणजे झालं !

**आवडी**—बरं बाई, पहातें यत्न करून ! झाला निर्धार तर चांगलंच ! येऊं आतां ? बराच उशीर झाला !

**सुभद्रा०**—बैस ग जाशील आतां. किती दिवसांनीं तरी आली आहेस!

**आवडी**—नको हो ! एवढा वेळ झाला आहे, या बद्दलच आतां किती तरी बोलून घ्यावं लागेल. तिकडनं किती तरी शंका निघतील ! आणि मग समाधान करतां करतां मला बाई अगदीं पुरेसं होईल! अग साठीं न् बुद्धे नाठी!

**सुभद्रा**—अग म्हातारे नवरे असेच संशयी असायचे !

**आवडी**—[ रागानें ] बरं हो !

**सुभद्रा**—आवडे, अशी रागावूं नकोस. सहज म्हटलं. पण हे पहा परवां मी कोणच्याशा पुस्तकांत वाचलं कीं, इतकं जपणं कांहीं चांगलं नाहीं. पुरुषांची बाई ही मोठी चूक आहे. कारण,

पद्य—चाल—तो कुमार०

**भरंवसा स्त्रियांचा नलगे भ्रांती हे पुरुषमनातें। अवमानें ऐशा टिकतें प्रेमाचें केंवी नातें। विश्रंभशून्यता हेची कुपथाचें शिक्षण त्यांतें॥**

**आवडी—ठेवात अम्हां कोंडोनी । जरि आम्हीं आणिलें स्वमनीं। तरि सदनीं निज राहूनी। निःसंशय फसवूं त्यांतें। पति वेडे त्यां फसवाया क्षण नलगे तो आम्हांतें॥**

**सुभद्रा**—अग न आवडून चालतं कसं? पण आपली खरी दावेदारीण कोण ती तुला ठाऊक आहे का!

**आवडी**—ती कोण बाई?

**सुभद्रा**—अग रूढि हो! ह्या कवटाळणीचा बाई प्रभावच विलक्षण!

पद्य—चाल—मी असोनि नृपकांता—

**रुढि ही प्रखर देवी लव दया इस नाहीं।**
**शक्तिचें भयंकर रूप लोकिं चिरहि वाही।**
**भुलवि सकल जन। हरि तन मन धन।**
**सुमतिविनाशन। करित ही ॥ शाक्तचि जन**
**होती। अर्पण बलि करिती। प्रबलां सोडुनि।**
**अबलानिहनानिं। शौर्या मिरवुनि ॥ द्विज-**
**वेशधारि चांडाळ प्रौढी भोगित ही। धर्मध्व-**
**ज परि अनीतिवर्धक, यांच्या हृदयीं लाज**
**वसत नसे कांहीं ॥ दया त्यां नये तों वरी,**
**अबलांच्या रुधिरें, भूषित होवो ही मही ॥**

म्हणून सांगतें, समाधानाशिवाय दुसरा मार्गच नाहीं. अग तुला शिक्षण नसलं म्हणून काय झालं? आपल्या कुलीन पोक्त बायकांचा सहवास हें कांहीं लहान शिक्षण नाहीं. त्या काकूसारख्यांची मात्र संगत अगदीं धरूं नकोस!

**आवडी**—खरोखर, नेहमीं तुझ्याजवळ असावं असं वाटतं! सुभद्रे,

पद्य—चाल—किति सुरसः—

**उपदेश तुवां जो केला। अनुरूप नीति मा-**
**र्गाला ॥ सत्य तो ॥ अनुसरूं करिन यत्नाला।**
**परि शंका गमत मनाला। बहुपरी ॥ रोमांचित**
**तनु थरथर हलते। दावदहनपरि वेष्टित गमते।**

बाहेर तरी जायला कशाला हवं ? बरं मी येतें आतां.

**सुभद्रा**—ये बरं. पण आपलं मन बहकून देऊं नकोस. अग पण थांब, कुंकुं तरि लावून जा ? मी वहिनीला हांक मारतें.

**आवडी**—नको ! कशाला दगदग ? आहे तेंच टिकायची आशा असेल तर ना त्या सगळ्या खटपटी ?

**सुभद्रा**—अग असं बोलूं नये.

**आवडी**—माझं मी पुढलं ओळखून आहे. न बोलल्यानं तें टळणार आहे थोडंच !

**सुभद्रा**—पुरे पण ! ये बरं. मी आपली तुझी लहानपणची मैत्रीण आहे. [ चालल्यासारखें करते. ]

**आवडी**—बरं पण मला कांहीं पोंचवायला यायला नको. [ जाते. ]

**सुभद्रा**—[ गेली असें पाहून ] गेली बिचारी ! बरं पण अधिक दुःखी कोण ? ती का मी ! बरं पण माझ्याविषयीं तिला एवढा आदर का वाटतो ?

पद्य—चाल—असताना यति०

**मज गार्गी तैशी ब्रम्हवादिनि ही समजे ।**
**परि तीची उपमा लेश मजला नाचि साजे ॥**
**॥ ध्रु० ॥ क्षुद्र स्त्री मी एकुणिसाव्या या शत-**
**कांतिल अल्पधी ॥ पूर्वकाळच्या उदात्त रीती**
**गेल्या लोपुनि पार म्हणुनि हृदय थिजे॥१॥**
**स्त्रीस मान्यता तेव्हां होती नुरलें तीचें नांव**
**ही । बळी असे तो कान पिळी हा आहे**
**अजिचा न्याय । नरजाती गर्जे ॥२॥ जरख**
**थेरडे मनोवासना नाचविती ज्या आपुल्या ।**

**युवतिजनांनीं त्या अवशाव्या कोण जुलुम हा**
**बाइ। तिळ तिळ मनिं मि झिजे ॥ ३ ॥**

आवडे, तूं आणि मी बहुतेक समदुःखीच आहोंत! खरोखर, स्वयंवराचा काल आमच्या आर्यस्त्रियांना सुखाचा गेला! तो पुन्हा येईल का? पण माझ्या मनांत हे भलतेसलते विचार आज कां बरं येतात? [ विचार करून ] पण कां येऊं नयेत? स्त्री आणखी पुरुष हे दोन्ही मानवी प्राणीच ना? दोघांचेही विकार सारखेच! खरंच,

**पद्य**—चाल–मदीय बंधुला०

**ईशमानसांत खचित। भेदभाव लव नसे।**
**स्त्रीनरांस उभयतांस। देइ तुल्य वासनांस।**
**तत्पूरणिं उत्सुकता। तुल्य उभयिंही वसे॥१॥**
**साधो नर इष्ट हेतु। स्त्रीविषयीं मात्र किंतु।**
**कुत्सित ही कल्पना न। तद्हृदयीं पळहि**
**असे॥ २॥**

असं असून, देवा, स्त्रीजनांविषयीं डोळेझांक कां करतोस!

**कुमार**—[ एकदम प्रवेश करून ] आत्या, ए आत्या, [ तिला हलवून ] कुणाशीं ग बोलतेस?

**सुभद्रा**—[ चपापून ] अग बाई! कोण हे! येरे माझ्या चिमुकल्या. [ स्वगत ] कुमारानं कांहीं ऐकलं तर नसेलना? हा बाई फारच चाणाक्ष आहे! नाहीं तर दादाला जाऊन कांहीं तरी सांगेल. त्याला अगोदरच थट्टा करायला नको, मग काय! त्याच्या कानावर जायचा काय तो अवकाश! [ उघड ] बाळा कुठें होतास इतका वेळ? उन्हांत का खेळत होतास? हें गोजिरवाणं तोंड किती तरी बाई लाल झालं आहे!

**कुमार**—मी किनई दादाजवळ वाचीत बसलों होतों हो. आणखी मग किनई–पण कांग, आज सकाळीं आईनं मला मारलं तेव्हां तिला तूं रागं नाहीं भरलीस ती? मी नाहीं जा आतां तुझ्याशीं बोलत!

**सुभद्रा**—[ स्वगत ] काय लबाड आहे पहा! गुला-माला आठवण पण कशी राहिली आहे ती! [ उघड ] बाळा, आतां वहिनीला रागं भरेन बरं. पुढें सांग पाहूं काय झालं तें?

**कुमार**—मग किनई तिथं काका आला बरं का.

**सुभद्रा**—कोण आलं?

**कुमार**—अग, आपला वसंतकाका.

**सुभद्रा**—[ हंसून ] अस्सं का? मग काय–तुझ्या मनासारखंच झालं म्हणायचं!

**कुमार**—पण कांग? काकाचं नांव घेतल्याबरोबर तूं आतां हंसलीस कां?

**सुभद्रा**—[ स्वगत ] काय विचारतो आहे पहा! [ उघड ] अरे तुझ्याकडे पाहून मला हंसूं आलं हो!

**कुमार**—अरे वा! मी इतका का छानदार आहे! पण वसंतकाका माझ्यापेक्षां सुरेख आहे नाहीं?

**सुभद्रा**—[ रागानें ] मला नाहीं ठाऊक! पुढें काय झालं तें सांग.

**कुमार**—आत्या, पण तूं अशी रागावतेस का! तुझ्यापेक्षां कांहीं तो सुरेख नाहीं.

**सुभद्रा**—[ हंसून ] हें रे तुला कुणी सांगितलं?

**कुमार**—अग काकाच दादाला सांगत होता तें मी ऐकलं.

**सुभद्रा**—[ प्रफुल्लित मुद्रेनें ] अस्सं का ? तुझी अगदीं शर्थ झाली हो ! बरं मग पुढें ?

**कुमार**—सांगतो पण अशी घाई कां करतेस ? मग किनई काका मला म्हणाला चला आपण आखाड्यांत कुस्ती खेळायला जाऊं. मग आम्ही तिकडे गेलों.

**सुभद्रा**—अरे वा ! आतां काय तुम्ही पहिलवान होणार तर ?

**कुमार**—असं काय बरं आत्या ? अशानं मी सांगत नाहीं जा !

**सुभद्रा**—रागाऊं नकोसरे बाळा. बरं मग पुढें ?

**कुमार**—मला खाऊ देशील तर सांगेन.

**सुभद्रा**—कसा लबाड आहे पहा ! कांहीं तरी कारण शोधीत असतो. बरं खाऊ देईन हो ! मग ?

**कुमार**—मग काय ? मी कुस्ती खेळून वसंत-काकाला पाडला.

**सुभद्रा**—अरे वा !

**कुमार**—अग पाडला म्हणजे काय ? तो मुद्दाम पडला हो–नाहीं तर तुला राग येईल एखादा !

**सुभद्रा**—[ आश्चर्यानें ] मला रे कां राग येईल ?

**कुमार**—हें बघ, परवा आपले ते भटजी नाहींत का ? ते नाहीं का वसंतकाकाबद्दल असंच कायसं बोलले ?

**सुभद्रा**—बरं मग ?

**कुमार**—तेव्हां तूं नाहीं का त्यांनां त्याबद्दल राग भरलीस ? म्हणून म्हटलं हो !

**सुभद्रा**—[ कौतुकानें ] एवढासा आहे पण किती धोरणी आहे ! माझ्या बाळाची आज दृष्ट काढली पाहिजे ! [ चुंबन घेण्यास वांकते. ]

**कुमार**—ह्या गालाचा घेऊं नको बरं? मघाशी किनई वसंतकाकानं घेतला न् तो हा पहा थोडासा असा झाला आहे! माझे आपले जे ते मुकेच घेतात हें ग काय?

**सुभद्रा**—बाळा, तूं तसाच गुणी आहेस हो!

[ असें म्हणून त्याच गालाचें चुंबन घेते. ]

**कुमार**—हें ग काय आत्या? तुला नको म्हटलं ना?

**सुभद्रा**—[ हंसून ] त्याला काय झालं आहे? तुझा तोच फार गोड आहे हो!

**कुमार**—बरं पण खाऊ आणवितेस ना? हें बघ वसंतकाकालाच इकडे आणतों. तूं त्याला सांग आणायलं. तो बघ अगदीं लवकर आणवील. [जायला निघतो.]

**सुभद्रा**—[ त्याला धरून ] अरे थांब! त्यांना नको इकडे आणूं.

**कुमार**—कां ग! तूं त्याला लाजतेस? अग तो किती छानदार आहे!

**सुभद्रा**—[ गोंधळून ] किती रे बोलशील? मी दादालाच आणवायला सांगतें, मग तर झालं ना!

**कुमार**—छे! छे! नको! नको! दादा नाहीं आणविणार. मला ठाऊक आहे. [ जरा दूर होऊन ] मी काकालाच इकडे आणतो थांब! मघांशीं मला धरलंस नाहीं? आतां धर पाहूं? [ धांवत जातो ]

**सुभद्रा**—आतां काय करावं बाई! हा गेलाच! काय असेल तें असो! वसंताचं नांव निघालं पुरे, कीं माझे सर्व विचार जागच्या जागींच राहतात! खरंच, पुनर्विवाहाची चाल आमच्या लोकांत असती तर काय वाईट होतं? पण आज असले विचार माझ्या मनांत

वरचेवर कां बरं येतात ? तरी पण यांत माझा काय बरं दोष ? मोठमोठे विरक्तसुद्धां ज्यापुढें जेर .आले त्याच्या पुढें मी तर यःकश्चित अबलाच आहे ! पण हें काय ! छे ! छे ! मनोनिग्रहाबद्दल आतांच ना तूं आवडीला उपदेश केलास ? छे ! तें कांहीं नाहीं !

पद्य—चाल—झालें मी बावरी :—

**मन अपुलें आवरीं, सुभद्रे ॥ ध्रु० ॥ प्राणिमात्र या कामशरांचें । विषय होउनी राहे साचें । विरक्त मनही येणें नाचे । संशय यांत न लेश असे तरि ॥ १ ॥ विवेकबुद्धी कोठें गेली । निग्रहशक्ती कोठें लपली । क्षण हि न राहीं गे तूं या स्थलिं । वसंतदर्शन सुदूर सारीं ॥ २ ॥**

मी नाहीं पुन्हां अशी मोहांत पडणार ! मला ठाऊक आहे यापासून मला फारच क्लेश होतील ! पण चालेल ! असं झिजून मरायची पाळी आली तरी पतकरली ! सत्व जाऊं द्यायचं नाहीं हाच निर्धार ! तर मग बाई भेटीचा प्रसंगच टाळावा हें बरं ! [ जाते. ]

---

## प्रवेश ५ वा.

### स्थळ—रस्ता.

[ दोन रंगेल प्रवेश करतात. ]

**अक्कडराव**—कोण ? फक्कडराव ? वाहवा कुणीकडे धिंडका निघाली आहे ?

**फक्कडराव**—ओहो ! अक्कडराव ? आपली अक्कड आज कुठें भीक मागायला चालली आहे ?

**अक्कड०**—का फारसे चढलांत ? लवकर सुटका झाली म्हणून वाटतं ?

**फक्कड०**—अरे मला आटकवण्याची पोलीसची काय बिशाद आहे ? आलो कीं नाहीं तावडतोब सुटून ? अरे आमचं वजनच तसं आहे !

**अक्कड०**—यंव् ! भले ! जसं कांहीं आम्हाला कळ-लंच नसेल ?

**फक्कड०**—सांगा, सांगा ! काय मुक्ताफळं पडताहेत तीं पाहूं तर खरीं !

**अक्कड०**—अहो, आपले ते फक्कड मामलेदार नाहीत का ? आणखी त्यांचं तें फक्कड पात्र चंद्राजी ?

**फक्कड०**—बरं मग ?

**अक्कड०**—मग काय ? तिच्याच शिफारसीनं तुम्ही सुटलान् दुसरं काय ? आणि म्हणे आमचं वजन आहे ! ! पहा तर खरं ?

**फक्कड०**—अहो, पण हें तुम्हाला कसं कळलं ?

**अक्कड०**—अहो, तुमचा आमचा धंदा एकच ! चोराची पावलं चोरालाच—हं !

**फक्कड०**—पण हे बघ, चंद्राजी एक माषुक पात्र आहे बरं !

**अक्कड०**—[ पडद्याकडे पाहून ] अरे पण हें काय पेटलं ? पहा ! पहा ! ओहो !

**फक्कड०**—अरे आग लागली कीं काय ?

**अक्कड०**—अरे, आग पण आग ! पाणी घातलंतर जास्तच पेटायची !

**फक्कड०**—[ पाहून ] हं ! हं ! समजलों ! पाहूं ? आहा ! हा !

**अक्कड०**—आहे कीं नाहीं बहार ? पण ती मधली गुलाबाची कळी पाहिलीस का ?

**फक्कड०**—आ ! हा ! हा ! काय पण लचका आहे ! काय तो नखरा ! यंवरे मुरका ! अरे ती आमची आवडीच !

**अक्कड**—इतक्यांत झाली कां तुमची ?

**फक्कड**—अरे, अजून झाली नाहीं. पण बेटया कसं ही कर—तेवढं जुळवून दे. काय हवं तें कर. पाहिजेल तें घे!

**अक्कड**—माफ करा ! माफ करा ! महाराज, फार वाहवलात ! मी कांहीं दलाल नाहीं !

**फक्कड**—तसं नाहीं रे ! पण एखादी युक्ति तर सांगशील कीं नाहीं ?

**अक्कड**—हो, हो, युक्ति सांगू. अरे त्या गांवकाकूला वळीव म्हणजे काम फत्ते ! अरे, म्हाताऱ्या नवऱ्यांच्या बायका वश व्हायला फार मेहनत लागत नाहीं—आणखी त्यांत तर तुम्ही पहिल्या प्रतीचे फक्कड ! मग काय उशीर !

**फक्कड**—हें बरं सांगितलंस. आतां जातोच तिकडे. पण तूं इकडे कुठें चाललास ?

**अक्कड**—अरे आज तिकडे हळदीकुंकूं आहे ना ?

**फक्कड**—कुठें ? हं ! हं ! समजलों ! हं ! मग तिथं तुम्हाला काय कुंकूं लावून घ्यायचं आहे कीं काय ?

**अक्कड**—नसलं म्हणून काय झालं ? खिरापत आहे ना ? शिवाय आणखी किती तरी लटपटी आहेत ! कितीक संधान आहेत !

**फक्कड**—हं ! आलं लक्षांत ! पण जरा बेताबेतानंच हं !

**अक्कड**—आणखी आपणही जरा धीराधीरानंच हं !

**फक्कड**—ठीक ! ठीक ! [ दोघे जातात ]

**आचार्य**—[ एकदम प्रवेश करून ] काय चमत्कार आहे ! यांचं मी सर्व भाषण ऐकलं ! किती मूर्ख आहेत! यांची मी अनेक वेळां कानउघाडणी केली आहे पण व्यर्थ ! प्रत्यक्ष शिक्षा भोगल्याशिवाय ह्या कामांधांचे डोळे उघडायचे नाहींत हेंच खरं ! काय हा अविचार !

पद्य—चाल—जंग आशेचा पिता०—

**भररस्त्यावर हे खल नरपशु अनुलक्षूनी परवनितांतें। असभ्यतेची बडबड करिती लज्जा कैशी न गमे यांतें ॥ध्रु०॥ यांच्या घरच्या स्त्रियांविषयिं जरि आदरि कोणी याच पथातें। विकारवशता तरि मग जाची यांच्या न कळे कां चित्तातें ॥ १ ॥ अल्लड बाला अनुभवशून्या फसवूं करिती हे यत्नातें। नीतिभ्रंशचि अवनतिसाधन कैसे विसरति या तत्वातें ॥ २ ॥**

असो; आपलं कर्तव्यकर्म आपण बजावीत असावं! [ जातो ]

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**—तात्यासाहेबांचा वाडा.

[ देखावा—हळदीकुंकवाचा समारंभ—सुवासिनींच्या ओटया भरणें वगैरे कामें सुरू आहेत—नावें घेतल्यानंतर]

**कुमारिका**—सुभद्राताई, तूं घेग नांव. सगळ्यांनीं नाहीं का घेतली ?

**सुभद्रा**—इश्श्! काय मेली भलतंच सांगते आहे पहा !

**कुमारिका**—असंग काय ? घेग ! तूं चांगली शिकली सवरलेली असून असंग काय करतेस ?

अनु
विभाग
क्र.

**सुभद्रा**—[ उसासा टाकून ] अगमें माझ्या नांहीं नशीबीं हो !

**वारणा**—पोरी इकडे ये. चाहटळ मेली ! भलतंच कांहीं तरी सांगते. तिला नाहीं हो नांव घ्यायचं. असल्या बायका नांव घेत नाहींत हो !

**कुमारिका**—अग तें मला ठाऊक आहे. आपल्या घरीं सैपाक करायला काकू येते नाहीं !—तिला नाहीं मी नांव घ्यायला सांगायची. पण ही तशी दिसते आहे का ग? उगीच का माझ्यावर रागावतेस ?

**वारणा**—अग तशी दिसली नाहीं म्हणून काय झालं ? कांहीं मेलीला समजत नाहीं [ अगदीं हळूं ] तिला कुंकू आहे का ? [ मोठ्यानं ] बैस उगीच! [ बायका जाऊं लागतात व पडदा पडतो. ]

**सुभद्रा**—[ पडद्या बाहेर येऊन ] मी कुणाचं नांव घेऊं ? हाय ! बरं हो ! माझं लग्न झालं तरी केव्हां ? [ आठवून ] पण--नाहीं--छे ! कांहीं आठवत नाहीं ! माझं लग्न म्हणजे केवळ स्वप्नच नव्हे का ? पण स्वप्नाचीसुद्धां नाई थोडी आठवण रहाते. खरोखर,

पद्य—चाल—पाहुनी नृपास०—

**बाहुलीविवाह होय ज्यापरी । जाहला मदीय ही तयापरी ॥ खेळ मांडिला न तोंचि तो झुगारिला । स्वप्नरूप कारभार सर्व जाहला । लग्नाचा मूळ हेतु मुनिमनांतला । रूढिवशें हाय बाइ विफल जाहला । अर्थशून्य हास-रूप तोंचि पावला । दशा अशी पुढील त्यां ॥ न विदित ती तरी ॥**

सुभद्रे, तुला भ्रम नाहींना झाला? नाहीं! नाहीं! मी चांगली शुद्धीवर आहे! माझ्या लग्नाचा मात्र मला भ्रम झाला आहे! खरंच, माझ्या स्थितीचं कुणाला वर्णन करतां येईल का? माझ्या अंतर्यामीचं चित्र मला स्वतःला तरी काढतां येईल का? त्या चित्राला मला नांव तरी देतां येईल का? हाय!

पद्य—चाल—त्या मदनानें०—

अतनुव्यथिता ग्रीष्मरूप मी चित्तीं अनुभ-
वितें। अश्रुमिषानें वर्षा साक्षात् क्रतितें मी
घेतें॥ प्रियजनमुखशशिचिंतन मजला शरद्-
चि भासवितें। मनिंची लज्जा हेमंताचें दर्शन
मज देते॥ परी निराशाशिशिर मनोरथवृक्षा
शोषवितें। सुखदवसंतप्राप्ती होणें शक्य
नसे मातें॥

काय ही माझी दशा! माझं लग्न म्हणजे स्वप्न! काल्पनिक पति! आणखी त्याची मी भ्रमिष्ट पत्नी! [ विचार करून ] बरं, आम्ही विधवा झालों हा बाई आमचा का अपराध? आम्ही म्हणे अगदीं अपवित्र! मग हाच न्याय पुरूषांना कां लागूं नसावा? काय हा गैरसमज! माझ्यासारख्या दुर्दैवी स्त्रियांना वागविण्याची आमच्या लोकांची तऱ्हेवाईक चाल पाहून मला बाई फार वाईट वाटतं!

पद्य—चाल—वदन चंद्र०—

विधवापण पाप महा रूढि जनां भासविते।
पतिमरणीं पायगुणी स्त्रीच जनीं बोलविते।
तद्दर्शन अपशकुनी शुभकार्यी वर्ज्यचि तें।
संन्यास ग्रहण करो तरि निंदा नचि टळते॥१॥

काय हा प्रसंग! [ साश्रू ] आमच्यासारख्या निरापराधी

दीन अबलांची कुणालाच काहो कींव येत नाहीं! आमचे करुणविलाप तुम्ही मोठ्या आनंदानं ऐकतां ना? देवा,

पद्य—चाल—दैवा काय०

गाई दीन अम्ही तरि अमुची कोण करी करुणा। फोडितसों चिर हंबरडा तो नाचि भेदित या खाटिककर्णा॥ ध्रु०॥ तारस्वरगत विलाप अमुचा। द्रववि न एकहि अंतःकरणा॥ १॥ काय वदावें वाली कोणी न मिळे आम्हां दुःस्थितिशरणा॥ २॥ हे परमेशा दीन दयाळा। आर्जवितों अम्हि विधवा तुजला। त्वरें धांवुनी या पंकांतुनि उद्धरिं आम्हां संकटहरणा॥ ३॥

[ जाते. ]

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—वसंतरावाचा वाडा.

[ आचार्य, वसंत व माधव बोलत प्रवेश करितात. ]

**वसंत**—उपदेशाप्रमाणं आचरण ठेवलं पाहिजे असंच ना ?

**आचार्य**—उघडच आहे. ' बोले ऐसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें ' नाहीं तर,

**पद्य—चाल—रक्षियलें तुम्हिच०**

**वाणीचे सुघड करुनि उघड बोलती । धैर्य-**
**मात्र नसुनि हाव फुकट दाविती । सुधारणाऽ**
**सुधारणासि विघ्न आणिती । बुडलिया समा-**
**जकाज लाज न धरिती ॥ १ ॥**

वयातीत मनुष्यानं लग्न करणं फार गैर असा लोकांना उपदेश करायचा आणखी आपण स्वतः दहा वर्षांच्या मुग्धबालेशीं विवाह करायचा ! अरे ' वचने किं दरिद्रता ' या म्हणीप्रमाणं पुनर्विवाह करावा—अवश्य करावा असं अकांडतांडव करायचं ! पण जर का स्वतःवर पाळी आली तर मात्र मग—अँ ! हं ! अशानं समाजावर कसं वजन पडावं ? बरं हें असो; हा वाद नेहमींचाच आहे ! आवडीची दुष्ट वार्ता तुम्हाला समजली ना ? श्रीमंत काल रात्रींच निजधामास गेले !

**माधव**—हो ! सकाळींच समजलं ! वाईट झालं !

**वसंत**—बाकी आवडीला वैधव्य यायचं हें ठरलंच होतं !

**आचार्य**—मला आणखी असं समजलं आहे कीं तिचं फक्कडरावावर प्रेम बसलं आहे ! आणखी आतां ती पुनर्विवाह करण्याच्या बेतांत आहे..जुळेल तर सर्वोत्कृष्ट !

**वसंत**—फार चांगलं !

**माधव**—अहो, चांगलं खरं ! पण तें जुळायचं नाहीं हें मात्र खास ! कारण तो नीच फक्कडराव माझ्या चांगल्या माहितीचा आहे. तो पुनर्विवाह तर नाहींच करणार—पण थापा मारून ह्या विचारीला फशीं मात्र पाडील!

**वसंत**—तेंही संभवनीयच आहे ! अनीतीचा प्रसार फारच होत आहे ! अशानं इष्ट सुधारणा कशी व्हावी ?

**आचार्य**—हो ! आणखी एक मोठंच विघ्न आहे ! लटपटाचार्य या गोष्टीला कधींच कबूल होणार नाहीं ! इतकंच नव्हे तर तो लवकरच एखाद्या क्षेत्रीं जाऊन तिला संन्यास देणार आहे असं समजतं !

**वसंत**—अरेरे ! ही गोष्ट मात्र काळजाला झोंबणारी आहे ! आचार्य,

पद्य—चाल—सुवर्ण केतकी०

**त्यजुनि विवेका जन हा शास्त्राढ्ढिर्वलीयसी मानी । क्रूर अमानुष रीती वरितो घेई करूनी निजहानी ॥ध्रु०॥ मतलबशास्त्रें आत्महितास्तव काढुनियां नव अनयाचीं । ब्राम्हणगण त्या रूढिनियंत्रित ठेवुनि संतत किति जाची ॥ १ ॥**

**माधव**—आचार्य, आपण लटपटभटाला त्याबद्दल दोन गोष्टी सांगून पाहूं !

**आचार्य**—त्याच्या मनावर कांहींएक परिणाम होणं नाहीं ! चला, प्रयत्न करणं हें आपलं कर्तव्य आहे !

[ आचार्य व माधव जातात. ]

**वसंत**—[ विचार करून ] आतां आवडी दुराचरणी होणार! शिक्षणानं तिचं मन विकसित झालं असतं, तर गोविंदरावाच्या फक्कड स्वरूपाला ती भुलली नसती! हं! शिक्षण दिल्यानं स्त्रिया म्हणे बिघडतात! मग हाच परिणाम पुरुष वर्गावर कां होऊं नये? छे! तें कांहीं नाहीं! त्यांना ज्या रीतीनं शिक्षण दिलं पाहिजे तसं दिलं, आणखी संगत चांगली ठेविली तर खरोखर स्त्रिया स्वर्गलोकींचं सुख ह्या भूलोकींच देतील! फार कशाला? सुभद्रेचंच उदाहरण घ्याना? मला वाटतं सर्व प्राण्यांना चटका लावणारी ही एक ईश्वरानं मोहनीच निर्माण केली आहे! अथवा, स्त्री हा प्राणी उत्पन्न करण्यांत विधात्याचा जो कांहीं हेतु आहे त्याची मनुष्यकोटीला थोडी तरी कल्पना व्हावी म्हणून तर हिचा जन्म नसेल ना? अहाहा! काय तें सौंदर्य! काय ती सुजनता! न्यून असं हिच्यांत कांहींच नाहीं! हिच्या बाह्य अलंकारांत एक तेवढा कमी आहे! तो शिवकर तिलक माझ्या हातून—पण हें काय? माझा निश्चय ढळणार कीं काय?

पद्य—राग, पिलु. ताल, त्रिवट.

**काय ऐशी कल्पना ही येत असे मम मनीं।**
**सुविवेकनाशरूपी तम राहे पसरूनी। कार्य-**
**क्रम ठरवीला सकलहि फुकटचि होय जनीं**
**॥ ध्रु० ॥ विवश मनीं मी फुकट वनतसें विघ्न-**
**शताचा विचार न करुनि ॥ समाजविघ्नें अ-**
**सोत कांहीं। त्यांची चिंता तिळ मज नाहीं।**

**परि सुंदरिचें मन मजविषयीं । कसें काय हें ठाउक नसुनी ॥**

त्या सर्व प्रकारावरून माझ्यावर सुभद्रेची प्रीति आहेच असंही म्हणतां येत नाहीं ! बरं–नाहीं असाही तर्क होत नाहीं ! छे ! इतकं वेड चांगलं नाहीं ! माधवाकडे जाणच वर्ज करावं ! मण तेंही अशक्यच ! काय करावं !

पद्य—चाल—पाहिली त्या०

**सुंदरिची मूर्ति सदा मम नयनांपुढति उभी दिसत कोमला ॥ सर्व काळ मज तीच भासते दर्शन निज परम रम्य देतसे मला ॥ १ ॥ ब्रम्हचर्यपरिपालनहेतू, भंगुनीया मम विवेक सर्व लोपला ॥ २ ॥ मन आवरितां तें नच अवरे, स्मरशरहत हा मदीय देह जाहला ॥ ३ ॥**

[ जातो. ]

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—गंगातीरावरील एका भिक्षुकाचें गृह.

[ आवडी सचिंत बसली आहे. ]

**आवडी**—या क्षेत्रांतली भिक्षुक मंडळी माझ्या बाबा इतकी निष्ठूर नसतील असं मला वाटलं होतं ! पण छे ! कांकणभर ज्यास्तच ! त्यांना आपला तेवढा स्वार्थ दिसतो ! आतां करूं तरी काय ! जें नको तें मेलं नशीबीं येतं ! आमच्या केंसावर ह्यांचा एवढा कां कटाक्ष ? खरंच

पद्य—चाल—सुचिन्ह हें नच०

**विरूपतेहुनि मरण बरें अति ॥ध्रु० ॥ नांवाचें मळमळीत कुंकूं पुसुनी टाकी दैव । परि ही पुढची विटंबना कां होतें टाळूं न चले मम**

**मति ॥ १ ॥ मानवकृतिचें कुंकू मानव काढु-
नि घेउ खुशाल । ईश्वरनिर्मित शोभा कुंतल
तद्‌हरणीं अधिकार न त्याप्रति ॥ २ ॥ स-
हायहीना दीन असें मी निर्दय माझा बाप ।
पोक्तविचारें पुनर्विवाहें कां न करुनि दे मज
दुसरा पति ॥ ३ ॥**

पण गोविंदराव कबूल होईल का? होईल! माझ्यावर त्याचं तसंच प्रेम आहे! पण मी किती वेडी! मला आज वळजबरीनं संन्यास घ्यायला लावणार नी लग्नाची नाई कसली कल्पना करते! बायकांचा जन्म पराधीन खराच! हे मेले राक्षस माझ्यासारख्या तरणीताठीच्याच कां पाठीस लागतात? ज्यांच्या बायका मरतात त्या मेल्यांना कां संन्यास देत नाहींत?

**पद्य**—चाल—धवानि अम्हां नेति०

**जुलुम पहा हा किती ॥ ध्रु० ॥ पुरुष मत-
लबी स्त्रीच्या मरणीं । उदासीन निज विरूप-
करणीं । अबलामस्तकभूषणहरणीं । निर्दय
होती अंतःकरणीं । आनंदें डोलती ॥ खाटिक॥**

वेळ अगदीं थोडा राहिला! कांहीं सुचत नाहीं!

**लटपट०**—[ प्रवेश करून ] आवडे, सकाळपासून इतका विचार कसला चालला आहे? आहे कीं नाहीं तयारी? बोल! आटप लवकर!

**आवडी**—[ साश्रू ] बाबा, असं करून घ्यायला माझं वय कारे झालं आहे? मी अगदीं नाहीं म्हणत नाहीं पण कांहीं दिवस तरी देवानं दिलेलं हें भूषण राहूं दे! अजून पुरा महिनासुद्धां झाला नाहीं तोंच कां एवढी घाई? माझा तर सर्वस्वी घात झाला आहे! पण—

पद्य—चाल—बहु काम करी०

नाचि होइ पित्या तूं पाषाणी ॥ ध्रु० ॥ लघु मम वय जरि । खरतम किति तरि । प्रसंग मजवरि । गुजरत मनिं धरिं । तूं कींव खरी मनिं आणीं । बा मनिं आणीं ॥ १ ॥ मदवन तुजाविण । वद करिल कवण ।

लटपट०—नाशिव उलट म्हण । परिस वचन पण । गाळिशी वृथा कां पाणी । गे हें पाणी ॥ २ ॥ वहिष्क्रियेची मजला भीती । म्हणुनि आदरीं हे जनरीती । इजहुनि लोकीं अन्य न नीती । तूं धीर धरीं निर्वाणीं । गे निर्वाणीं ॥ ३ ॥

वा:! तुझ्याकरतां मी आपला सर्वस्वी नाश करून घेऊंकीं काय?

आवडी—बाबा, असं नकोरे बोलूंस! माझ्यामुळं तुला थोडं का मिळालं आहे? होतं नव्हतं तेवढ्याची चांगली निरवानिरव करून बसला आहेस! आतां कशाला उगीच पैशाची हाव धरतोस?

लटपट०—अरे वा! मोठ्या ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी सांगते आहे पहा! तें कांहीं नाहीं! आपल्या चालीप्रमाणं सर्व कांहीं झालं पाहिजे! हें बघ, तूं होऊनच या सत्कृत्याला कबूल व्हावंस हें चांगलं. लघळपणा पुरे झाला!

आवडी—[ रागानें ] माझ्या घाताला सर्वस्वी कारण तूंच आहेस! तूं मात्र आपला तळीराम गार केलास! माझी तुला कांहींच कींव येत नाहीं मग मी तरी तुझी कशाला एवढी पर्वा करूं? साफ सांगते, मला असलं कांहीं करून घ्यायचं नाहीं. इतकंच नव्हे तर मी पुनर्विवाह करणार! तूं आपला स्वार्थ साधलास, मग मी तरी हाल कां सोसूं?

**लटपट०**—अग गाढवी ! बरीच शहाणी झालीस आँ ! तरी बरं आतांशा त्या सुभद्रेची संगती बरीच कमी झाली आहे. नाहीं तर दिवेच लाविले असतेस ! ती वाढली आहे कीं नाहीं एक सकेशा घोडी ! मोठ्याची मुलगी ! बोलावं कुणी ? तशी राहून माझ्या तोंडाला काळोखी का आणणार तूं ?

**आवडी**—काय कमी झालं आहे ? काळं मात्र लावायचं राहिलं आहे !

**लटपट०**—आँ ! उलटून बोलतेस !

पद्य—चाल—अससि तू राणिचा०

**कारटे तुझ्या मी पायीं । बुडवूं मम भिक्षुकि**
**काई ॥ सांग गे ॥**
**आवडी—मज विकिता नीच कसाई । तृप्त कां**
**अजुनिही नाहीं ॥ सांग रे ॥**
**लटपट०—हां ! तोंड आवरुनि राहीं । मज हें**
**तें न कळे कांहीं ॥ पोरटे ॥ तूं मूढ,**
**आवडी—असशि अति मूढ,**
**लटपट०—चाल ती रूढ, मुकाट्या साहीं ।**
**मनसोक्त तोंडसुख घेई ॥ मागुनी ॥**

**आवडी**—पण मी कबूल होईन तेव्हां ना ?

**लटपट०**—आवडे, तुला नीट सांगून पाहिलं, राग भरून पाहिलं तरी तूं आपला हेकडपणा सोडीत नाहींस हें काय ? अग तुला हें मी मोठ्या आनंदानं सांगतों आहे असं का तूं समजतेस ? [ हुंदका आणून ] या हृदयांत काय कालवाकालव होत आहे ती माझी मला ठाऊक ! ही माया मोठी कठीण ! [ डोळे पुसतो. ]

**आवडी**—बाबा, जवळ माया असली म्हणजे तुझ्या सारख्याला ह्या मायेचं का भुरळ पडणार आहे ?

**लटपट०**—बाळे, अपत्यप्रेमाची तुला कशी कल्पना असणार ? सुदैवानं दोन मुलं झालीं असतीं म्हणजे त्यांच्या करतां जिव कसा तिळ तिळ तुटतो तें समजलं असतं !

**आवडी**—बाबा, तसं झालं असतं तर तुझ्या या अपूर्व मायेचा अनुभव मला कसा बरं आला असता ?

**लटपट०**—कपटी भाषण ! एवढं सांगितलं तरी अजून उजेड पडत नाहीं ! [ त्रासानें ] अग आपला ब्राम्हणाचा धर्म ना? मागल्या जन्मीं बहुत पुण्य संपादन करावं तेव्हां हा ब्राम्हणाचा जन्म मिळतो ! असं अधर्मानं राहणं हेंच का ह्या जन्माचं चीज ? पापपुण्याची तुला कांहींच का दिक्कत वाटत नाहीं ? ईश्वरेच्छेप्रमाणं गोष्टी घडतात त्याला काय इलाज ? चल, वेडी कुठली !

**आवडी**—[ रागानें ] तुझा तो धर्म आणखी तुझं तें पुण्य तुझं तुलाच लखलाभ असो ! मला त्याचा विटाळही नको ! काय पण धार्मिकपणाचं सोंग ! हे तुझे लपंडाव मला समजत का नाहींत ? तुझ्या ह्या कसाबाच्या करणीनं आपल्या जातीला काळिमा मात्र लावलास !

पद्य—चाल—अधम किति०

**निर्दयी मांग तूं द्विज कशाचा । दाविशी डौल हा कां फुकाचा ॥ ध्रु० ॥ द्विज जरी सत्य तरि जाइं विपिनांतरीं । न धनलोभ लव वागवीं अंतरीं । पोटचा पिंड हा कींव याची धरीं । नरकपथ नादरीं पातकाचा ॥ १ ॥**

**लटपट०**—हां ! फारच बहकलीस ! उद्धटपणाचा कळस झाला ! अजून ऐक. सनातन वैदिक धर्मांप्रमाणं

सर्व विधि झालेच पाहिजेत. पुरुषांनीं काय आणखी स्त्रियांनीं काय परंपरा चालत आलेल्या मार्गाचं अवलंबन केलंच पाहिजे ! आणखी—

**आवडी**—पुरे पुरे ! मला इथं फसवून आणून माझा असा गळा कापतोस आँ !

**पद्य**—( पुढें चालू )

**धर्मसमता जरी राहते तव मनीं । मृत्युवश मम जननि जी तिये अठवुनी । आपुली घे शिखा श्मश्रु अधिं मुंडुनी । मग मला सांग पथ पुण्यकृतिचा ॥ २ ॥**

**लटपट०**—आतां असं नाहीं उपयोगी ! साम दाम सगळं कांहीं झालं ! ही उलटी मलाच उपदेश करिते ! आतां चवदावं रत्न दाखविल्याशिवाय सुटकाच नाहीं !

**आवडी**—हं ! मार ! घे जीव ! म्हणजे सुटलें एकदांची ! [ त्याच्यापुढें डोकें आपटते. ]

**लटपट०**—थांब ! तुला बांधून ठेवूनच विधि उरकला पाहिजे. नाहीं तर कार्टे, उद्यां तूं उठून देखील जाशील ! [तिला बांधावयास जातो. ती आक्रोश करिते.]

**गांवकाकू**—[ एकदम प्रवेश करून ] हं! हं! हं! हें काय भटजी ! तिच्यावर प्रसंग कोणता आणखी तुम्ही हें काय आरंभलं आहे ! अशानं का नायका वळतात ? तीं कामं आम्हींच केलीं पाहिजेत.

**लटपट०**—हरकत नाहीं ! तुम्हीच वळवा. मी पलीकडल्या जागेंत सगळी तयारी करतों. वळवा म्हणजे झालं ! करतां काय! नशीबीं आलं खरं ! [ जातो ]

**गांवकाकू**—[ स्वगत ] आलं नाहीं ! पण आणलंस खास ! [ उघड ] आवडे, काय ग हा तमाशा? हीच

का तूं शाहाणी? अग मी काय केलं? तसंच तूं कर म्हणजे झालं! इलाज का आहे बाई? अग असं नाहीं असं—या तऱ्हेनं कां होईना? समजलीस ना मी काय म्हणतें तें?

**आवडी**—ती तुमची तऱ्हा मला नको हो! त्यापेक्षां पुनर्विवाह केला तर काय वाईट? प्राण गेला तरी चालेल पण आज असं करून घातलं मी बाई कुणाला हात लावूं देणार नाहीं.

**गांवकाकू**—हा काय बाई भलताच हट्ट!

**लटपट०**—[ प्रवेश करून ] काय झालं? वळली का स्वारी?

**गांवकाकू**—ऐकतच नाहीं! मी तरी काय करूं बाई!

**लटपट०**—हेंच का शेवटीं तुम्ही दिवे लावलेत तें काकू! [ ती त्याच्याकडे डोळे वटारून पाहते. ] अहो, तसं नव्हे. जर तुमची खात्री नसती तर मी इतकी सगळी तयारी तरी केली नसती. पण आतां सगळ्यांच्या तोंडून फजिती करून घेण्याची पाळी तुम्ही आणलीत तेव्हां आतां दुसरा इलाजच नाहीं! कोण आहे तिकडे? पाहतां काय? धरा हिला! [ एका नापिकासह भिक्षुकं मंडळी सत्वर प्रवेश करिते. नापीक बाजूला उभा राहतो. बाकी मंडळी आवडीस धरूं लागतात. ]

**आवडी**—नका हो! तुमच्या पाया पडते! [ मो-ठ्यानें रडूं लागते ]

**लटपट०**—काकू, तुम्ही पण जवळ असायच्या बरं का! अरे, मठ्ठासारखे उभे काय राहतां? ओढा तिला [ तिला ओढतात. ती किंचाळी फोडते—पडदा पडतो. ]

---

# प्रवेश ३ रा.

**स्थळ**—तात्यासाहेबांचा वाडा.

**सुभद्रा**—अखेरीस माझा तर्क खरा होणार असं चिन्ह दिसतं. आवडीचं वाईट पाऊल पडलंच तर मी एका मैत्रीणीला मुकलेंच म्हणायची! खरंच, प्रेताबरोबर लग्न लागलेल्या तरुण वधूच्या संसाराचे धिंडवडे होऊं लागणं यांत नवल तें कसलं?

पद्य—चाल—सार्थचि ते वदती.

**हेंचि असें व्हायाचें। खचिताचें। शक्यचि नाहीं टाळायाचें ॥ ध्रु० ॥ मूढ लोक या दैवचि ह्मणती। पूर्वजन्मिचा दोष समजती। सद्यः-कृतिफल मनिं नच आणिती। दास हि बनती विस्मरणाचे ॥१॥ लोभी जनका हाव धनाची। चाड न पतिला वृद्धपणाची। तेणें आहुति तारुण्याची। काय न हें फळ अविवेकाचें ॥२॥**

बरं पण, मी आपलं आयुष्य पुढें कसं बरं घालवावं? शिकल्या सवरल्याचा चांगला उपयोग केला म्हणजे सार्थक झालं!

पद्य—चाल—मज नाहिं गडे.

**वैवाहिक सुख मम तें नष्ट सर्वथा। मरणावधि न तरि कधीं त्यजिन सत्पथा ॥ध्रु०॥ पुनरूढा होउं तरी लभ्य सुख असे। परि उदात्त तत्व तयीं मज न गमतसे। मत्सम बहु गतपति-कासंघ जगिं वसे। एकटिची क्लेशमुक्ति अल्प ही कथा ॥ १ ॥ विद्येचा अल्प लाभ मजासि जाहला। संसारीं तदुपयोग न मज राहिला।**

म्हणून आतां हाच निश्चय!

**मद्भगिनीहितकरणीं देह वाहिला । चंदनसम झिजविन त्या साहुनि व्यथा ॥ २ ॥**

समाजाकडून ज्यांचा नेहमीं छळ होत आहे अशा दीन अबलांना मी शिक्षण देणार! शिक्षणाची बलाई बाई फार निराळी आहे! निरुपायच झाला तर हवे तर पुनर्विवाह लावा म्हणावं. पण आवडीसारखी उच्छृंखळ वृत्ति फार वाईट !

[ मनोरमा प्रवेश करिते. ]

**मनोरमा**—[ स्वगत ] बरेच दिवसांनीं वन्संजवळ एकांतीं बसण्याची संधी मिळाली आहे. याबद्दल आतां टीका तर होणारच ! हो ! आजची वेळ बाई बरी आहे ! तिकडनं सांगितल्याप्रमाणं एकदां खडा टाकून बघतें. रुचलंच तर बरंच झालं ! [ पाहून ] जेव्हां पाहवं तेव्हां आपल्या विचार करीत असतात ! पण तेंही खरंच ! त्यांची तशीच स्थिति आहे !

पद्य—चाल—सदुपाय जाणें०

**अति कष्टकारी स्वस्थिती विवेक तरी किती॥ ॥ ध्रु० ॥ आंचवल्या अल्पवयामाजि निजपती ॥ नसे स्वप्नीं विदित त्याची सुखद संगती ॥ नैसर्गिक भाव मनीं क्लेश उभविती॥ महाधैर्यें साहुनी त्यां चित्त जिंकिती ॥**

[ प्रकाश ] काय चाललं आहे वन्सं ?

**सुभद्रा**—वहिनी, या, बसा अशा. पण घटकाभर बसायला वेळ आहे का ? नाहीं तर ना बाई ! उगीच तुम्हांला बोलून घ्यावं लागेल !

**मनोरमा**—वन्सं, अशा रागावतां काय ? तुमच्याजवळ वरचेवर मी येत नाहीं का ? वन्सं, तुम्ही माझ्यापेक्षां

इतक्या शिकलेल्या असून असल्या क्षुल्लक गोष्टीसाठीं तुमचं आपलं रुसणं अजून जात नाहीं हें काय ?

**सुभद्रा**—वहिनी, हिला क्षुल्लक गोष्ट कशी म्हणतां येईल ? अग तूं जवळ असलीस म्हणजेच माझा वेळ मोठ्या आनंदांत जातो ! नाहीं तर,

**पद्य**—चाल—जाळि मला चंद्र हा०

**एकटिचा काळ गे जाय नच वेगें दीर्घ दिसे ।**
**भ्रांति मना वाटते ताप बहु होई सह्य नसे ।**
**तुज अशा विदुषिचा समागम दुःखा नाशि-**
**तसे । विस्मृतिचा लाभ हो सदा मन चिंतितसे ॥**

हे बघ, शिक्षित स्त्रियांचीं दुःखं तितक्याच मानानं मोठ्या कसोटीची असतात हो ! आमच्या सारख्यांच्या हृद्रोगाला तुझ्यासारख्या विदुषींची संगत हीच रामबाण मात्रा ! माझं असो म्हणा—पण खरोखर, तुझी स्थिति अगदीं हेवा करण्यासारखी मोठ्या सुखाची आहे कीं नाहीं ?

**मनोरमा**—सर्व सुखांत तुम्ही मला सख्या बहिणी-प्रमाणं वागवितां हें मात्र मोठं सुख !

**सुभद्रा**—माझा दादा भाग्यवान् खराच ! वहिनी, तुमचं उभयतांचं अखंड प्रेम पाहून मला बाई मोठं समाधान वाटतं ! अग ह्या जन्मीं मला सुख काय तें एवढंच !

**मनोरमा**—वन्सं,

**दिंडी.**

**दंपतीचें हें प्रेम चिर असावें ।**
**आपणांपरि अन्यांस ही मिळावें ॥**

पण

**तुम्हां वन्सें तें प्राप्त होतें नाहीं ।**
**सदा चिंता लागली पतिमना ही ॥**

**सुभद्रा**—असल्या प्रेमाच्या शीतळ छायेचं सुख माझ्या नशीबीं नाहीं हें तर ठरलेलंच आहे. दुसरं असं वहिनी,

पद्य—चाल—धाडुनि दिधले०

**दुःखाचा जरि अनुभव नाहीं तरि मनुजा**
**सौख्याची । कळुनि न येई खरी योग्यता**
**निपजे हृदयांतरिं अरुची ॥ ध्रु० ॥ रंगभूमि-**
**सम जग हें त्यावरि नानाविध रूपांनीं ।**
**मानवपात्रें लीला करिती तदनुगुणी चेष्टांनीं ।**
**दुःखभूमिका येत मजकडे तीच नीट साधोनी ।**
**मिळविन वाहवा प्रेक्षक मार्मिक जो त्या**
**जगदीशाची । अज्ञ बहुल हीं समाजपात्रें**
**स्फीति नसे मज त्यांची ॥**

अग, एका सुखी पात्राचं काम तूं पतकरलंस आहेस! पण या नाटकांत ही दुःखभूमिका मला चांगली शोभते नाहीं वरं? खरंच सांग हो.

**मनोरमा**—वन्सं, तुमच्या धैर्याची शर्थ आहे बाई! [ स्वगत ] बोलण्याची आतां थोडी दिशाच बदलावी! [ प्रकाश ] बरं पण वन्सं, वसंतभाऊजींनीं रचलेलं नाटक तुम्हीं सगळं वाचलंत का?

**सुभद्रा**—अग हो! तीनदां वाचलं! समाजावर मोठाच कटाक्ष धरला आहे हो! असंच पाहिजे! अब-लांच्या शोचनीय स्थितीचं चांगलंच चित्र वठवलं आहे! त्यांतला नायक तरी किती उदात्त आहे! मला वाटतं तो स्वतांचीच प्रतिमा आहे!

**मनोरमा**—खरंच तें! आणखी नायिका काय कमी आहे? कांकणभर जास्तच! मला वाटतं तुमची

हुबेहुब नक्कलच! हो! बरं· आठवलं! वसंत· भाऊजींचं लग्न ठरलं! आतां आपल्याला निदान आठ दिवस तरी तिकडे राह्यला जावं लागेल.

**सुभद्रा**—तुला आपलं उगीच कुणी कांहीं सांगितलं आहे झालं! अग असं होईल कसं? त्यांचा संकल्प तूंच ना मला सांगितलास?

**मनोरमा**—खोटं नाहीं वन्सं! मला तरी तिकडूनच समजलं आहे हो!

**सुभद्रा**—[ आश्चर्यानें ] अस्सं का! पण बाई इतक्या वर्षांचा मनोनिग्रह वायां जात आहे तेव्हां ती कोणी तशीच असली पाहिजे! मला तर बाई जवळपास तशी कोणी दिसत नाहीं! मग कोण जाणें!

**मनोरमा**—तशीच अगदीं सर्व प्रकारानं त्यांच्या तोलाची सांपडली आहे हो! पण तुम्ही याल ना तिकडे राह्यला? मला बाई तुमच्याशिवाय मुळींच करमायचं नाहीं!

**सुभद्रा**—[ दीर्घ श्वास सोडून ] मी बाई अशी पडले! तिथें मी येऊन काय उपयोग? वहिनी,

**पद्य**—चाल—कुसुमसमय संपतां.—

**परिणयविधिमंगलीं फुकटची। मजसम वनि·**
**ता नच कामाची ॥ ध्रु० ॥ बहुकार्यभरीं गुंतु·**
**नि जाशिल। वाण नसे मजऐशीची ॥ १ ॥**
**तोंड लपवुनी घरींच राहिन। हीच स्थिती**
**मज सौख्याची ॥ २ ॥**

तूं आपली खुशाल जा बरं!

**मनोरमा**—[ स्वगत ] कशी मुद्रा झाली आहे! पाणी मुरतं आहे खरं! [उघड] वन्सं, तुमच्यासारख्यांनीं काय पाप केलं आहे? तसलं कांहीं मुळींच मनांत आणूं

नका. तुम्ही आलांत तरच मी जाईन. बरं आतां जाते खालीं. [ जाऊं लागते. ]

**सुभद्रा**—[ तिला अडवून ] इश्श ! दादाशिवाय इतकं का करमत नाहीं ?

**मनोरमा**—हें काय भलतंच वन्सं ! करमत नाहीं असं कुणी म्हटलं ? पण आतां उशीर नाहीं का झाला ?

**सुभद्रा**—पण हें काय बाई नवल ! दादासुद्धां इकडेच येत आहे !

**मनोरमा**—खरंच का ?

**सुभद्रा**—अग, तुलाच शोधायला इकडे येत असेल !

**मनोरमा**—इश्श ! थट्टा तरी किती कराल वन्सं !

**सुभद्रा**—अग, त्याला कसं तुझ्याशिवाय चईन पडेल ? हा आलाच !

[ माधव घाईनें प्रवेश करितो. मनोरमा लाजून उभी राहते. ]

**माधव**—सुभद्रे, चला, चला, नऊ वाजले ! नाटकाला जायचं आहे ना ?

**सुभद्रा**—बरं तर वहिनीला जा घेऊन.

**मनोरमा**—हें काय बोलणं ! तुमच्याशिवाय मी मुळींच जायची नाहीं.

**सुभद्रा**—बरं पण दादा, तूं मला बोलवायला आलास का वहिनीला ?

**माधव**—हें काय सुभद्रे ? नऊ वाजून गेले ! ही थट्टेची वेळ आहे का ?

**सुभद्रा**—पण हें बघ—

**माधव**—समजलों ! बाबांची परवानगी ना ? घेतली आहे.

**सुभद्रा**—पण मी आलें तर लोक काय म्हणतील ?

**माधव**—असल्या कामांत त्यांची मला मुळींच पर्वा नाहीं ! नाटकसं काय ? सृष्टींतील नानाविध प्रेक्षणीय गोष्टी पाहून विधात्याच्या चातुर्याची तारीफ कुणी करायची? मनुष्यांनीं का जनावरांनीं ? मनुष्यांनीं असेल तर स्त्रिया ह्या माणसेंच आहेत. त्यांना जनावराप्रमाणं समजणारा आणखी वागविणारा मी नव्हे ! चला, उशीर होतो.

**सुभद्रा**—बरं तर, चला जाऊं.

**मनोरमा**—[ माधवाकडे पाहून हंसत ] खरंच, वसंतभाऊजीसुद्धां यायचे असतीलच ?

**माधव**—[ हंसत ] तर ! त्याला कसं एकट्यालाच चैन पडेल !

**सुभद्रा**—दादा, त्यांचं तुला एवढं काय रे वेड तें ?

**माधव**—सुभद्रे, जशी कांहीं कृष्णार्जुनाची जोडीच असं सर्व म्हणतात !

**सुभद्रा**—तुमचं उभयतांचं तसंच प्रेम आहे म्हणून लोक तशी उपमा देतात, दुसरं काय ?

**माधव**—पण सुभद्रे, त्या उपमेंत थोडं न्यून आहे. तूं मनांत आणलंस तर मात्र तो अलंकार बरोबर शोभेल! आणखी तुलाही एक अलंकार मिळेल !

**सुभद्रा**—दादा, थट्टा करण्याच्या तरी परी आहेत. शोभेल असं असलं, संभवनीय असं असलं तरच मौज ! विनोद झाला म्हणून काय झालं ? अगदींच असंभवनीय अशी गोष्ट विनोदाचा विषय होत नाहीं. मग सगळा रस निघून जातो.

**माधव**—छे बुवा ! भाषणांत तूं कुणाला हार जाणार ? असाच बोलत उभा राहिलों तर उशीर मात्र

होईल. चला, लवकर आटपा. [ जातो. ]

**सुभद्रा**—वहिनी, ' येतें ' असं दादाला म्हटलं खरं, पण किनई आज मला कससंच होतं आहे. जीवाला बरंच वाटत नाहीं.

**मनोरमा**—वन्सं, अगोदर तें नाटक! त्यांतून विषय सामाजिक! चांगलीच करमणूक होऊन तुमच्या मनाला समाधान वाटेल! चला कशा?

**सुभद्रा**—बरं बाई! कुमार कुठें आहे तें पाहा जा. माझं काय? अशीच येतें.

**मनोरमा**—[ जात असतां–स्वगत ] वसंतभाऊजींचं लग्न ठरलं असं सांगितलं म्हणून ' जीवाला बरं वाटत नाहीं. ' वसंतभाऊजींवर वन्संचं मन बसलं आहे हें खास. आतां परत आल्यावर ही सगळी हकीकत तिकडे सांगावी. [ जाते. ]

**सुभद्रा**—अप्रिय अशी गोष्ट श्रवणीं पडली म्हणजे मनाची स्थिरता नाहींशी होते हें खरं! वहिनीनं सांगितलेलं खरंच असलं पाहिजे. अथवा माझं इंद्रत जाणण्यासाठीं तर तिचा हा प्रयत्न नसेल ना? माझा मुग्धभाव मला जाचतो आहे असं नव्हे का? काय असेल तें असो!

पद्य—चाल—कपटानृतभूमी.

**मन कां हुरहुरतें ॥ माझें हें मज नच कळतें ॥**
**॥ ध्रु० ॥ वसंतपरिणयवार्ता मजला । देत असे**
**कां अप्रियतेला ॥ कसा देऊं दोष तयाला ।**
**जरि मी आवरितें । निज मन त्या नच जाण-**
**वितें ॥ १ ॥**

[ जाते. ]

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—गांवकाकूचें घर.

[ फक्कडरावाशीं तिचा संवाद सुरू आहे. ]

**फक्कडराव**—तुमते आशीर्वाद नकोत. एक नक्की दिवस ठरवा.

**गांवकाकू**—गोविंदरावजी, असलीं कामं घाईनं होत नसतात. रंग पाहून संधान जुळवायला हवं! आवडी किनई अगदीं नादान आहे हो! तिच्या डोक्यांत पुनर्विवाहाचं जें वेड शिरलं आहे तें अजून साफ निघालं नाहीं. म्हणून तर भटजींच्या मागं लागून तिला सोवळी केली.

**फक्कडराव**—तें अगदीं माझ्या मनासारखं केलंत. पुनर्विवाहाचं लचांड नको! आपला हा मार्ग उत्तम! बिनबोभाट काम! बरं पुढें कसं?

**गांवकाकू**—ऐका. अगोदरच ती उतावीळ झालेली. लगेच आमच्या उपदेशाची तालीम सुरू झाली. असलीं कामं म्हणजे हातचा मळ! बहुतेक काम रंगांत आलंच आहे. आणखी एक दोन तालमी झाल्या, म्हणजे पहा तिला कशी नाचविते ती!

**फक्कडराव**—त्यांत तुम्ही अगदीं तरबेज! म्हणूनच तुमचा आश्रय केला! बरं तूर्त हें घ्या. तुह्माला फार मेहनत पडते!

**गांवकाकू**—छे! तुमची अगदीं शर्थ आहे हो! अहो पैसे कसले देतां? पैशांकरतां का एवढं करते? बरं आणलेतच तर आतां ठेवते—पण एवढ्यानं तुम्ही कबूल केलेली मोहरेची आंगठी नाहीं हो सोडायची! हे पैसे त्यांत वळतं द्यायची नाहीं.

**फक्कडराव**—त्याला मी कधीं नाहीं म्हटलं आहे! बरं पण तिकडलं कांहीं जुळेल का? तेवढं जर होईल तर काय मागाल तें देईन. सुभद्रेकारितां घरदार जरी विकावं लागलं तरी चालेल! पण एकदां—

**गांवकाकू**—ठीक! उद्यां तुम्ही म्हणाल आभाळां-तला चंद्र आणून दे! स्वर्गांतली रंभा आणून दे! अहो, तुमच्याकारितां तिकडेसुद्धां मी जाळं पसरलं होतं. पण ती किती शहाणी! शिकलेली सवरलेलीच ती! मीच त्या जाळ्यांत सांपडलें असते. पण मीच म्हणून कशीबशी सुटले झालं!

**फक्कडराव**—अहो, शिकलेली असली म्हणून काय झालं? मदनाच्या तडाक्यांतून कोण सुटलं आहे! तरु-णपणची हौसच कांहीं निराळी!

**गांवकाकू**—छे! छे! तिकडला रंग निराळा आहे बरं. सुभद्रेचा नाद अगदीं सोडून द्या. नाहीं तर आपली दोघांची पुरी फजिती! खरं पुसाल किनई तर ती कांहीं इतकी सुरेख नाहीं. आतां तारुण्याचा लचका आहे एवढंच. आपली आवडी किती सुरेख! किती नाजुक! किती तेजस्वी!

**फक्कडराव**—तसं आहे खरंच! पण-जाऊं दे! आवडीचं तरी नक्की ठरवा म्हणजे झालं.

**गांवकाकू**—तें माझ्याकडे लागलं. फार कशाला-तुम्हाला नक्कीच सांगते. [ कानांत सांगते ] या म्हणजे झालं. मग हवी तेवढी मजा मारा.

**फक्कडराव**—यंव रे युक्ति! वेळ पण कशी शोधून काढलीत! वाः! अक्कडरावाचं धोरण खरं! त्याच्यामुळं

तुमचा परिचय झाला. [ अक्कडराव प्रवेश करितो त्यास उद्देशून ]

**गांवकाकू**—नांव काढल्याबरोबर तयारी!

**फक्कडराव**—यावं, यावं. अगदीं वेळेवर आलांत. काम बहुतेक आटोक्यांत आलं! तुम्ही आमच्याकडून बक्षीस उपटणार!

**अक्कडराव**—अगोदर तुमचा कार्यभाग होऊंद्या. बक्षिसांचं काय मोठंसं? मग तुम्ही आम्हाला हवीं तितकीं द्याल आम्ही तुमच्याकडून हवीं तितकीं मागून घेऊं! तें चाललंच आहे. बरं काकू, रावसाहेबांना पानसुपारीचं तबक आणा.

**गांवकाकू**—खरंच! बोलण्याच्या नादांत अगदींच विसरलें! तबक घासायला टाकलं आहे. चंचीच देते. [पलंगाखालून भरजरीची चंची काढून त्यांच्यापुढें ठेविते.]

**फक्कडराव**—तुमच्या घरीं चंचीचा उपयोग करणारा कोण बुवा?

**अक्कडराव**—प्रकृतिमानामुळं ह्यांना हें व्यसन निरुपायास्तव ठेवावं लागलं आहे.

**गांवकाकू**—तरी पण मला चंचीबिंची नाहीं हो लागत? ती आमच्या मधुसूदनाची आहे.

**फक्कडराव**—हे मधुसूदन कोण?

**गांवकाकू**—नातेवाईकांपैकींच आहे. पाहिलं तर नातं कांहीं फार लांबचं नाहीं. माझ्या बहिणीचा आतेदीर. व्यापारधंद्यामुळं नेहमीं इथेंच राहवं लागतं! बहुतेक माझ्याच घरीं असतो. अल्पवयी असून किती चालीचा आहे? किती पण भिडस्त! माझ्या शब्दाबाहेर इतका जात नाहीं!

**फक्कडराव**—तुमच्या कसोटीस जो उतरला तो तशाच गुणाचा असला पाहिजे !

**गांवकाकू**—[ फक्कडराव सुपारी फोडूं लागतो तें पाहून ] जरा थांबा. थोडा चहा घेऊन मग पान खायचं.

**अक्कडराव**—रावसाहेबांना चहा चालतो. श्रमपरिहाराला आम्हाला आपलं दूध चालेल!

**गांवकाकू**—तुमच्या सारख्यांच्या कृपेनं माझ्या घरीं त्यालाही कांहीं कमी नाहीं बरं !

**फक्कडराव**—पण आतां त्याचं कांहीं कारण नाहीं.

**गांवकाकू**—छे ! छे ! माझ्या घरीं येऊन तसंच का जायचं ? तुम्ही मला परके नाहींत. चला, आंत चलायचं.

[ सर्व जातात.]

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—तात्यासाहेबांचा वाडा.

**पद्य**—चाल—दिसली पुनरपि०

**माधव**—**सागरनीरापरि गंभीरा भगिनि सुभद्रा सम असुनी । वसंतपरिणयवार्तारूपी पवनें क्षोभातें पवुनी ॥ अभ्यंतरिंचें स्वप्रेमाचें अर्धप्रकटित रत्न करी । या योगानें अंकुर माझा भावी आशावृक्ष धरी । वसंत व्हावा तत्पति ऐशी चिंता माझ्या मनिं वसते । तिस अनुमोदन मातापितरें देतिल कैंवी नाचि कळतें ॥**

शाब्दिक सुधारणा काय कामाची ? तीं कृतीनंच वठली पाहिजे. काय बरं करावं ? [ विचार करून ] अगोदर सुभद्रेला स्पष्ट विचारावं का वडिलांच्या संमतीचा विचार

करावा?—[ पाहून ] अरे माझी प्रिया इकडेच येत आहे! पण मुद्रा इतकी खिन्न कां [ मनोरमा प्रवेश करिते तीस] आज मुखचंद्रमा इतका म्लान कां बरं ?

**मनोरमा**—एकेक विपरीतच होऊं लागलं तर कां वाईट वाटणार नाहीं ? ज्या गोष्टीचा सभांतून, पत्रांतून निषेध करायचा ती जर आपल्याच घरांत होऊं लागली तर मन उद्विग्न नाहीं का होणार ?

**माधव**—[ चकित होऊन ] ह्या उद्विग्नतेचं कारण तरी काय ?

**मनोरमा**—[ आश्चर्यानें ] म्हणजे ! आपल्याला नाहींच का कळलं ? हं ! समजलें ! मामंजींच्या मनांतून ती गोष्ट आपल्याला मुळींच कळूं द्यायची नाहीं असं दिसतं. तरीच एवढ्या गुप्त मसलती चालल्या आहेत !

**माधव**—[ त्रासानें ] आतां मला घोटाळ्यांत किती वेळ ठेवणार ? काय आहे तें एकदम स्पष्ट सांग.

**मनोरमा**—[ दुःखानें ] काय सांगूं ! परवा भटजी आणखी मामंजी वन्संना घेऊन कुठल्याशा क्षेत्रीं जाणार आहेत. मामंजींची आणखी सासूबाईंची प्रकृति इतकी क्षीण झाली आहे तरी सुद्धां मोठ्या कष्टानं जाणार आहेत. पुढलं माझ्यानं नाहीं बाई सांगवत ! देवा, अशी पाळी कुणावरही आणूं नकोस !

**माधव**—पुरे ! पुरे ! अरेरे !

पद्य—चाल—किती अहा प्रौढ०

**हतविधे करिशि हे काई ॥ तव मनीं लाज**
**कीं लव वागत नाहीं ॥ ध्रु० ॥ कपटकारिणी**
**रूढि डाकिनी भारुनि तुज निजमंत्रांहीं । पौ-**
**रुषहीन करी अबलांच्या घातनिं उरवी शक्ति**

**तुझी ही ॥ १ ॥ आजवरीची आशा माझी मातापितरांच्याविषयीं । नाशुनि मम भगिनी-चा घ्याया बळी होय कां तुज घाई ॥ २ ॥**

**मनोरमा**—आपल्याला ती विटंबना पाहवेल का? वन्संचा सगळा आधार काय तो आपल्यावर ! बाकी त्या काय सगळ्यालाच तयार आहेत म्हणा—पण—

**माधव**–[त्वेषानें] बस्स ! एकदां सांगून ठेवतों. ऐक—

**पद्य**—चाल—चला जाऊं आपण०

**मला न उरलें सुख सदनीं । कुटुंबपाशा पार झुगारुनि, विभक्त राहिन होवोनी ॥ जिवंत राहिन मी या भुवनीं । तंववेरि सुनिश्चित मी न विरूपित देइन होऊं निज भगिनी ॥ अग्नी तीर्थोदक हीं दोन्हीं । स्वयमेव पवित्र न बाह्य-विशोधन त्यांस वदे कवि निज कवनीं ॥ कृत्रिम शोधन आचरुनी । व्यर्थ जरी नाचि शुद्धि मनीं ॥**

विधवांची विरूपता ही ह्यांच्या नीतीची पताका ! काय हा भ्रम ! भ्रम कसला ? निवळ दांडगाई ! जुलूम !

**मनोरमा**—पण एवढा संताप काय म्हणून ? विभक्त राहण्याचा प्रसंग टळण्याला मार्गच का नाहीं ? प्रयत्न करूनही यश न येईल तर मात्र आपल्याकडे दोष नाहीं ! म्हणून म्हणते मामंजींना दोन गोष्टी नीट समजावून सांगाव्या. त्यांची अगोदरच काय बरं दशा झाली आहे ! त्यांना तरी हें मनापासून का हवं आहे ? पण काय करतील ? मन द्विधा झालं म्हणजे माणसाला कांहीं सुचत नाहींसं होतं ! इकडे आड, तिकडे विहीर असं त्यांना झालं आहे !

### महादिंडी.

**मनोरमा**—प्रेम कन्येविषयिंचें एक मार्गी, वळवुं पाही।
रूढिसत्ता अन्यत्र त्यांजलागीं, खेंचिते ही ।
वारिधारे पथ दोन पुढें येतां, खोल जागीं ।
सहज अधिका गतिच कीं प्राप्त होई, तियेलागीं ॥

**माधव**—परिस्थिति तशी आहे खरीच ! प्रथम नीट सांगून पाहतोच. पण शेवटलं तुला सांगून ठेवलं एवढंच ! आणखी हें बघ—तिला धीर दे बरं. वसंताच्या हातून तिचं पाणिग्रहण झालं म्हणजे मी कृतकृत्य झालों!

**मनोरमा**—बरं पण—हें कोण येतं आहे ? [ कुमार आहे असें पाहून ] चालला बाई ! यानं तर मला अगदीं भंडावून सोडलं आहे !

**माधव**—[ कुमार प्रवेश करतो त्यास ] का, कुठें चालला ?

**मनोरमा**—पहातो आहे का पण? पहा, आपल्याच नादांत !

**माधव**—[ दरडावून ] अरे, कुठें चाललास यवेळीं ?

**कुमार**—वसंतकाकाकडे. काका आम्हाला निशाण मारायला शिकविणार आहे. तिथं आज विक्रम येणार आहे. आज माझ्याशीं तो भांडला तर मात्र आज त्याला खूप चोप देणार आहें ! [ आईस ] अगोदर सांगून ठेवतो हो नाहीं तर मग तूं मला मारशील ! मार तर खरी दादासाहेबांना सांगेन ! दादासाहेब, मला तो काल चावला तें हें पहा !

**माधव**—बरं जा. मुकाट्यानं खेळा. भांडूं नका.

**मनोरमा**—[ कुमारास पाहून ] चालला उड्या मारीत ! ऐकलं का,

पद्य—चाल—नंदगृहाच्या

**नित्य नवीं भांडणें ग वाइवाइ, काढुनि हा बसतो ॥ किति तरी ॥ कुरापती नवनव्या काढुनी उच्छादा अणितो ॥ बाइ मला ॥ चौदाव्याची चुणुक दाविते परि हा नाचि बधतो ॥ कशानें ॥ वत्सें करिती लाड इकडची फूस म्हणुनि चढतो ॥ घडिघडी ॥ धाक नसे या लव कवणाचा उच्छृंखळ होतो ॥ अगादिंच ॥**

आतां मोठा नाहीं का होत चालला?

**माधव**—बरं पण पहा तर खरं! कसा चालला आहे ऐटींत! अगदीं गुमान! एवढा गुण इकडला आहे!

**मनोरमा**—इश्श! मी गुमान का आहे? असं कांहीं सांगितलं म्हणजे थट्टेवर न्यायचं!

**माधव**—अबब! काय हा फटकारा! स्त्रिया विदुषी झाल्या तरी त्यांची चिडखोर वृत्ति विद्युल्लतेप्रमाणं मधून मधून चमकतेच!

**मनोरमा**—पण मी कुठें आहे इतकी विदुषी? दुसरं असं, पुरुषांची तीच स्थिति आहे! कितीही विद्वान् झाले तरी मेघगर्जनेप्रमाणं त्यांचा संताप केव्हां केव्हां श्रवणीं पडतोच! तेव्हां विद्वान् असो अथवा विदुषी असो उपजत अंगस्वभाव असतो तो सर्वथा कधींच बदलत नाहीं असं नव्हे का?

**माधव**—शाबास! तुम्ही तर आम्हाला व्याख्यान देऊन निरुत्तर केलंत! बरं तें असो, सांगितलेलं लक्षांत आहे ना?

**मनोरमा**—तें मी कसं विसरेन?

**माधव**—ठीक आहे! अगोदर सामोपचारानं वृद्धज-नांची मनधरणी केली पाहिजे. विलंब उपयोगी नाहीं.[जातो.]

**मनोरमा**—आतां मी निर्धास्त झालें! वन्संचं संकट आतां खास टळणार! त्यांना आतां धीर द्यायला जावं.[जाते.]

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**—लटपटभटाचें घर.

**अक्कडराव**—तरी मी तुम्हाला एकदां सुचविलं कीं, आवडीला पंढरपुरास पाठविण्याचं जुळवा म्हणजे मुका-ट्यानं सगळं सुरळीत झालं असतं; आणखी या घराला गोष्ट आली नसती.

**गांवकाकू**—सगळं खरं! पण तें कसं जुळलं असतं? अगोदरच श्रीमंतांचं कुटुंब! त्यांतून लोभी भि-क्षुकाची मुलगी! तो म्हणाला तसं केलं तरी बोभाटा झाल्याशिवाय राहायचा नाहीं. आतां तुम्हाला इथल्या इथें बिनबोभाट काय करायचं असेल तें करा. पण कायहो, असलं कसलं औषध आणून दिलंत.? असं नाहीं बाई कधीं पाहिलं!

**अक्कडराव**—ह्यांच्याच इथें जो नापीक येतो त्यानं सांगितलं अगदीं खात्रीचं आहे. कमींत कमी पंचवीस तीस पहिलटकरिणी विधवा ह्या औषधानं झटदिशीं मो-कळ्या झाल्या आहेत असं म्हणाला! म्हणून तेंच आणून दिलं. पण काहो, त्यामुळं आवडी इतकी घाबरी झाली आहे का?

**गांवकाकू**—अहो काय सांगूं! आपण करायला गेलों एक आणखी झालं भलतंच! माझ्या तर बाई तोंडचं पाणी पळालं आहे! मला कांहीं तिची धडगत दिसत नाहीं!

**अक्कडराव**—सगळं खरं! पण तो कारागीर औष-धाच्या पैशाकरितां माझ्या घरीं धरणं धरून बसला आहे त्याची वाट काय? माझा निकाल करा नाहीं तर म्हणतो आवडाबाईबद्दल फौजदाराकडे बिननांवीं अर्ज करीन!

**गांवकाकू**—आतां ह्या भोगाला काय करावं बाई! काल तिला अंमळ बरं वाटलं होतं तेव्हां मी ह्याबद्दल भटजीजवळ गोष्ट काढली. पण तो भट किती नतद्रष्ट! मला म्हणतो आवडी अगदीं बाळंतिणीसारखी सुखरूप उठली म्हणजे मग त्याला म्हणावं तुला हवं तर पागोटं बांधूं! पण तोंवर एक दिडकीसुद्धां मिळणार नाहीं! आतां काय बोलतां?

**अक्कडराव**—मग तर तो खास पोलिसांत वर्दी देणार!

**गांवकाकू**—हा मेल्यानो! त्यानं तसंच कांहीं केलं तर सगळ्यांनाच प्रायश्चित्त भोगावं लागणार!

**अक्कडराव**—प्रसंग तर तसाच दिसतो.

**गांवकाकू**—काय चमत्कार बाई! पोरीची काय दशा झाली आहे आणखी त्या मेल्याला पैसे सुचताहेत! बरं, त्याचं पाहतां येईल. पण अगोदर तुम्ही आवडीची प्रकृति पहा आणखी एखादा उतारा मिळाला तर घेऊन या. [ पाहून ] अरे दार उघडंच का राहिलं? ती पहा. अरेरे! काय ही तळमळ!

**अक्कडराव**—चला, आंत चला. [ ती जाते. ] एवढ्या उलाढाल्या केल्या पण हें खटलं अंगावर येणार असं दिसतं! [ जातो. ]

[ मरणासन्न आवडी अंथरुणावर कण्हत पडली आहे. ]

**आवडी**—अयाई! ई! नाहीं सहन होत! एकदम का शेवट होत नाहीं? गोविंदरावानं अखेरीस फसविलं

अं! काय पण थापा! कैस ठेवूं म्हणाला—अं! लग्न लावीन—आणखी—छे! त्या महामायेनं गळा कापलान्! अं! हं! सर्वस्वी मीच अपराधी! सुभद्रे, धन्य आहे तुझी! मला शिक्षण मिळतं—संगत चांगली असती तर असा शेवट खचित झाला नसता! हं! आतां कसची जगते! त्यांतून ही आणखी आतां बालहत्या! या सगळ्याला कारण हे मेले पुरुष! निर्दयी! लोभी! फसवे मेले! आई! हं! दुर्दैवी स्त्रियांनो! सावध व्हा ग सावध व्हा! साधलंच तर बेलाशक पुनर्विवाह लावा पण असं नकोग बाई! अयय! हं! आतां पश्चात्ताप होतो! आतां काय उपयोग? छे! आई! मरते! आई, तूं असलं पहायला नाहीं उरलीस बरं झालं! तुझं हृदय फाटून गेलं असतं ग! माझा अंत झाला तरी बाबाला कांहीं वाटायचं नाहीं! कारण तो पुरुषच ना? त्यांचीं अंतःकरणं दगडाचीं! अयाई! काय ही कळ! छे! वेळ जवळ आली! पण आतां मृत्यूच्या द्वारीं कशाला कुणाला दोष देऊं? हं! नशीबाला तरी कां दोष लावावा?

पद्य—चाल—शांति धरा नृपराज०

**करुनि वळें कृतिला। निंदावें कां दैवाला॥ध्रु०॥ सखी सुभद्रा सांगत असतां, दुष्पथ आचरिला। शठवचनावरि विश्वसलें मी, फसवी तो मजला॥ १॥**

देवा, सगळ्यांना क्षमा कर आणखी त्यांच्याबरोबर मलाही! आई—ई—ई! काय ह्या यातना! [ बरळते—लटपटभट व गांवकाकू प्रवेश करितात. ] कोण आलं? सुभद्रे, देवता आहेस! पवित्रतेची पुतळी! पश्चात्ताप!

आई! मी नाहीं! जाते! [ बेशुद्ध होऊन पडते. लटप० व गांवकाकू तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करितात. जरा शुद्धीवर येऊन व उभयतांस पहून ] जा, जा— काळं करा! आई!

**लटपट०**—आँ! काळं करा! भोग! आपल्या कर्माचं प्रायश्चित्त भोग!

**आवडी**—हर! हर! काय हे वाग्बाण! आई! सु–सु–सु–भद्रे–जा–जा–जाते! [ अंत होतो. ]

**गांवकाकू**—[ स्वगत ] अरेरे! माझासुद्धां असाच का शेवट होणार? शिव! शिव! [ उघड ] झालं इतकं पुरे! नको याची संगत! नाहीं पैसे मिळाले तरी चालतील! सोन्यासारखी पोर! हां हां म्हणतां कीं हो गेली! कशी मला औषध देण्याची बुद्धि झाली ही!

**लटपट०**—हां! पुरे! हें सगळं स्मशानवैराग्य!

**गांवकाकू**—काय हें उरफाटं काळीज! वरनी कुठली जागा पाहून ठेवली आहेस कोण जाणं!

[ झणकाऱ्यानें निघून जाते. ]

**लटपट०**—अरे, गेलीच! जाऊं दे! किती झालं तरी स्त्रियांचंच अंतःकरण! कांहीं वेळ तसंच वाटायचं! मग येईल पूर्व रंगावर! बरं—पोरीनं तोंडाला काळोखी आणलीनच म्हणायची!—पण हा काळा रंग जायला किती उशीर! श्रीमंतांच्या संपत्तीचे सर्वस्वी मालक आम्हीच! तिचा थोडा उजळा दिला म्हणजे हेंच तोंड झालं पुन्हा दुप्पट गोरं! मुलीकरतां थोडं वाईट वाटतं! पोटचाच गोळा! पण हें काय! पाणी येत नाहीं तें! जाऊं दे! रिकामी खटपट कुणी करावी? पण कांहीं म्हणा, तळघराकडे लक्ष गेलं म्हणजे आपलं समाधान

होतं ! असो; गेली तर गेली ! पुन्हा लग्न करूं ! आपणही करणारच ! विधुरांना अधिकार आहेच ! आतां असं त्राण पाहयचं कीं मुलींचा आपला सुकाळ व्हायचाच ! खरंच ! दैवाची आमच्यावर बहाल मर्जी खरी ! त्यानं आपलं मला बागवानाचाच धंदा लावून दिला आहे म्हणायचा !

पद्य—चाल—फुलें वेलीचीं.

**व्हावें माळी । मम लिहिलें विधिनें भाळीं ॥ ध्रु० ॥ पत्नीरूपी आंबा कलमी । एकवार म्यां केला नामी । त्याच्या उत्पन्नाचा स्वामी । जाहलों वेळीं ॥ १ ॥ पुनरपि दुसरीं झाडें करितां । हपुस पायऱ्या येतिल हातां । बहु काळानें हेची चिंता । मनातें जाळी ॥ २ ॥**

तरी पण—

**उत्पन्नाची हाव मनासी । सांगे मानुं नको कष्टासी । येइल करिशी जरि यत्नासी । यशाची पाळी ॥ ३ ॥**

मगळं कांहीं पैशानं होईल ! त्याच्या उबेनं मी आतांशा बराच तुकतुकीत झालों आहें म्हणायचा ! अरे पण—आवडीच्या अंगावर तें काय बरं चकाकतं आहे ? [ प्रेताजवळ जाऊन त्यावरील तो दागिना काढून हळूंच खिशांत घालून ] मासाभर का असे ना!—सोनं आहे ! [प्रेतावर पडदा पडतो.] हं! त्यानंही स्मशान पाहिलं असतं! [ पाहून ] अरे हें काय ! अरे एवढी लांकडं कशाला ! कांहीं कळत नाहीं ! या जमलेल्या मंडळींची आहुती द्यायची आहे काय ? मूर्ख बेटे ! हें माझं सहा महिन्याचं जळण होईल ! ह्यांना पैशाची किंमत कळत नाहीं ! अहाहा ! [ ' पैसा तुझा ' हें पूर्वोक्त पद म्हणत जातो. ]

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**सुभद्रा** —आतां मात्र पुरी कैद !

पद्य—( परमेशा करुणागारा० )

**स्थिति माझी कवण्या दोषें परमेशा करिशी ऐशी । मजविषयीं निष्ठुरतेतें, हृदयीं कां अणिशी ॥ ध्रु० ॥ मज भाग पडूं कीं पाहे, लपविणें निज वदनासी । रवितेजा टाळुनी घ्यावें, म्यां दिवाभीत करणीसी ॥ अपराध नसोनी कारावास मज देउं पहासी । मनिं करुणा आणुनि देवा, रक्षीं बा मजसी ॥**

आमच्या समाजाचा असाच दंडेली न्याय ! चूक करायची त्यांनीं, प्रायश्चित्त भोगायचं आम्ही ! मी म्हणतें समतातत्व राहिलं बाजूला पण कांहीं सारासार विचार ? छे ! तोही नाहीं !

पद्य—( मना तळमळसी० )

**उपाय न कांहीं ॥ जनहृदय, रूढिही अदय, करित असहाय ॥ ध्रु० ॥ दांभिक भटजी पूर्ण आग्रही । गतानुगति त्यां विवेक नाहीं । तदाग्रहानें मम ताताचें । मन मोहित होई ॥ १॥ अवलोकुनि मजकडेस डोळां । अश्रुपूर ये भरुनि ढळढळां । दीनमुखें किति विनवि तात मज । काय करूं बाई ॥ २ ॥**

त्यांचे दुःखाश्रू या शरीरावर पडले म्हणजे काळीज कसं चर्र होतं ! मला म्हणतात ' बाळे, प्रारब्धवादी

हो! निर्दय रूढीच्या झंझावाताला पाठ दे! बहिष्काराचे गदाप्रहार या निस्सत्व कुडीला आतां नाहीं ग सोसवत !' काय ही स्थिति ! मी साफ नाहीं म्हणून सांगूं का?—पण-- छे ! नको ! मला अशी पाहून दिवसेंदिवस कृश होत चाललेल्या माझ्या वृद्ध मातापितरांच्या मनाची काय स्थिति होईल? वडिलांच्या ठिकाणचं प्रेम सुधारणेला बाधक होतं तें हें असंच! आतां काय बरं करावं? वाचीत बसावं म्हणजे जरा बरं वाटेल. [ कांहीं पानें चाळून पुस्तक बंद करिते व हिकडे तिकडे फिरून ] छे! लक्षच लागत नाहीं! [ खालीं बसते. स्कंधांवर लोळत असलेल्या केसांकडे दृष्टि जाऊन ते तळहातावर घेतल्यावर नेत्रांतून अश्रुपात होतो. आकाशाकडे पाहून व दीर्घश्वास सोडून ]

पद्य—चाल—करिरे करिरे०

**नभिंचा पवि हा जणु येउनी । पाहे पडुं मजवरति या क्षणीं ॥ प्रकटवुनी निज अग्निगुणातें । जाळिल माझे कुंतल अघृणी ॥ ध्रु० ॥**
**अति हीन स्थिति कशी असो तरि । रूढि न कोठें ही देशांतरिं । समाज अमुचा अपवादाचा । हिस सह्य कसा घे मानुनी ॥ १ ॥**
**बालपणापासूनि सोबती । कुंतल त्यांवरि राहे प्रीती । वियोग त्यांचा अति जुलमाचा । चिर दुःखद कैंचि न हो मनीं ॥ २ ॥**

विरूपता आणि कुमार्ग हीं भावंडं का आहेत ? पण विचारशक्तीचाच जिथें अभाव तिथें कार्य कसलं आणखी कारण कसलं ? ही गोष्ट दादाला कळलीच का नाहीं !—पण म्हणतात ना ?—पण छे ! माझा दादा तसा नाहीं ! त्याच्यानं माझी विटंबना मुळींच पाहवणार नाहीं !

**मनोरमा**—[ पुढें होऊन—साश्चर्य ] वन्सं !

**सुभद्रा**—[ चपापून ] अगबाई ! वहिनी !

**मनोरमा**—एवढं तरी वाटतं हे आमचं भाग्यच !

**सुभद्रा**—तसं नाहीं ग ! एकांतांत मन हवं तसं भराऱ्या मारीत असतं ! दुःखानं होरपळून गेलेल्या माणसाचं चित्त देहभानावर असतं का ? रागाऊं नकोस. [ गहिंवरून ] पण वहिनी, या वेषानं आपली ही शेवटचीच भेट ! मला एकदां कडकडून भेट ! तुम्हा उभयतांना हें पसंत आहे ना ? पण तुमच्याकडे काय दोष !

**मनोरमा**—पसंत असेल असं तुम्हाला वाटतं का ?

**सुभद्रा**—[ निराशेनें ] पसंत ! मला स्वतःला तर अगदीं पसंत आहे ! मी आपली कांहीं तरी वडवडले एवढंच ! हें बघ, मला संन्यासच घ्यायचा ! मी एक न घेऊन हजारों दीन गाईंचा थोडाच चुकतो आहे ! हा माझा पुष्ट देह आतां संन्यासवृत्तीनं राहून उपास, तापास, व्रतं करून करून अगदीं शुष्क करणार ! मग माझीं तीं हाडं पाहून या स्वार्थपटु पुरुषवर्गाला मोठी धन्यता वाटेल ! हाल हाल होऊनच माझा अंत झाला पाहिजे ! ह्यांच्या रूढींचा ह्यांना पक्का अनुभव आला पाहिजे !

**मनोरमा**—थोडा का अनुभव येतो आहे ? पण समजून उमजून बगळ्याप्रमाणं नेत्र मिटून बसायचं तिथें काय इलाज ? अबलांचं दुर्दैव !

**सुभद्रा**—अग या भोंदूंच्या डोळ्यांत अंजन घालण्याचं सामर्थ्य या एकोणिसाव्या शतकांतील स्त्रियांच्या अंगीं कुठें ही नाहीं असं का तूं समजतेस ? पण बाई आपल्या आर्यस्त्रियांची गोष्टच निराळी ! किती विनयवती ! किती सुजाण ! किती सहनशील !

**मनोरमा**—पण आपल्या सौजन्याचा पुरुषमंडळानं असा फायदा घेणं हें मात्र अति निंद्य! काय ही अरेरावी!

**सुभद्रा**—खरंच! वहिनी, निर्बल प्राण्यांवर प्रबल प्राण्यांनीं हवी तशी सत्ता मिरवायची हा प्रकार मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंतच दिसून येतो. पण तो जर आतां ह्या सुधारलेल्या मनुष्य जातींत दिसूं लागला तर ही उन्नति का अवनति? जाऊं दे! अग, त्या वृत्तीनं देखील मी आपल्या भगिनींच्या कल्याणाकरितां थोडीबहुत झटेनच! मिळालेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग करीन! जा—जा—[ मनोरमा तिजकडे आश्चर्ययुक्त मुद्रेनें पाहत राहते. ] वडिलांना म्हणावं मी अगदीं तयार आहें.—जा विचार केव्हां निघायचं? जा बाई, विचारून ये! वहिनी, तुला धास्ती नको वाटायला! अग मी कोणत्याही स्थितींत असलें तरी माझा आवडीसारखा शेवट व्हायचा नाहीं हें पक्कं समज!

**मनोरमा**—वन्सं मी काय सांगणार आहें तें नीट ऐकून तरी घ्या! उगीच कां संताप करून घेतां? तुम्ही विद्रूप झालेल्या तिकडे कसं सहन होईल? तिकडनं तर प्रतिज्ञाच झाली आहे! [तिच्या कानांत सांगते]आतां झालं ना?

**सुभद्रा**—[ कौतुकानें ] अहाहा! माझी अटकळ होतीच! बंधु असावा तर असाच! माझ्यावरलं प्रेम आणि गुरुजनाज्ञातत्परता यांचं तुमुल युद्ध पाहण्याचा हाच समय!

**मनोरमा**—वन्सं, त्या संबंधानं तुम्हाला आतां कांहीं चिंता बाळगायला नको.

**सुभद्रा**—वहिनी तूं माझी पाठीराखी आहेस मग मला कसली चिंता? आणखी हे बघ वहिनी, बाबांचं मन नच

वळलं तरी आतां त्याबद्दल मला फारसं वाईट नाहीं वाटणार! विकारवशतेनं बडबडलें खरी! एकदां वाटलं तें मी कबूल करतें. पण आतां नाहीं वाटायचं! अग, दुःख किती करायचं? तें माझ्या अंगवळणींच पडलं आहे! मनुष्यस्वभावच असा आहे! कोणतीही स्थिति फार वेळ टिकत नाहीं. सृष्टिक्रमच तसा नाहीं का?

**मनोरमा**—आतां कशाला ते विचार? बरं वन्सं, मी एक विचारूं का? सांगाल का मन मोकळं करून? बरेच दिवस विचारीन विचारीन म्हणतें आहें. आज बरी वेळ आहे.

**सुभद्रा**—अग हें काय विचारतेस? तुझ्याजवळ का मी मोकळ्या मनानं बोलायची नाहीं? या प्रस्तावनेवरून पुढलं कांहीं विशेष दिसतं!

**मनोरमा**—विचारतेंच तर मग आतां. वन्सं तुम्ही बाई जन्मभर असंच कांहीं राहूं नये. कोणचं असं कारण झालं बाई कीं तुम्ही वैराग्य धरून निरंतर ब्रम्हचर्यच आचरावं?

**सुभद्रा**—[ उसासा टाकून ] मी आचरावं न् नये आचरूं त्याचा विचार कशाला? वहिनी, आज बाई तुला हें काय सुचलं आहे?

**मनोरमा**—तिकडनं नेहमीं म्हणणं होत असतं कीं, आम्ही जसं संसारसुख भोगतों तसं जेव्हां सुभद्रेचं पाहीन तेव्हांच आमचं खरं सुख! म्हणून म्हणते हो. आणखी तें खरं नाहीं का? तुम्ही कित्ता घालून दिला, तर काय वाईट?

**सुभद्रा**—अग तें सगळं खरं. पण तसलं कुठलं जुळायला? मनांत मांडे खायचे त्यांपैकींच एक प्रकार!

**मनोरमा** —कां बरं ? मनांत का खायचे ? प्रत्यक्ष न मिळतील तेव्हां कीं नाहीं ? आपलं मन कुठें गुंतलं आहे तें सुद्धां मी ताडलं आहे ! पण वन्सं, अगदीं योग्य वर निवडलात हो ! कारण,

**दिंडी.**

**आम्रवृक्षा माधवी लपेटावी**
**महासागरिं सुरनदी लीन व्हावी ।**
**आश्रयावें मेघास त्या विजेनें**
**तेंचि तुम्ही करणार चतुरतेनें ॥**

**सुभद्रा**—इश्श ! हें काय वहिनी ! आज तूं हवं तसं बरळते आहेस ! मी आपली इथून जातेच कशी !

**मनोरमा**—बरं हो ! तुम्हाला माझं बोलणं रुचत नसलं तर मी आतां हें बोलणंच टाकून देतें. पण बाई बरी आठवण झाली ! त्या दिवशीं माझ्या तोंडांतून एक गोष्ट निघून गेली ती अगदीं खोटी आहे एवढं सांगित-ल्याशिवाय माझ्यानं राहवत नाहीं !

**सुभद्रा**—अशी कोणती गोष्ट ती ? आणखी कांहीं गोष्ट असली तरी ती मला आठवणीनं मुद्दाम सांगितलीच पाहिजे असं काय त्यांत विशेष आहे ?

**मनोरमा**—तें कांहीं मला समजत नाहीं.—अहो वसंतभाऊजींच्या लग्नाचं ठरलंन् ते तिकडे जाणार म्हणून मी नाहीं का सांगितलं, तें अगदीं खोटं बरं ! [ सुभद्रा आनंदित दिसते तें पाहून ] अग बाई ! त्या दिवशीं इतकं वाईट वाटलं होतं आणि आज मी हें बोलल्याबरो-बर मुद्रा इतकी आनंदितशी ! [ सुभद्रा लाजते ] छे बाई ! काय असेल तें असो ! अलीकडे किनई माझा स्वभावच थट्टेखोर होत चालला आहे ! मी आपली

अनुक्रम ......
विभाग ......

पाहिजे तशी भकत असतें ! पण आतां मात्र काय तें खरं सांगेन. तुम्हाला अगदीं खरं खरं सांगतें होऽ. माझी पहिलीच बातमी खरी ! [ सुभद्रा विस्मित होते ] पण ती सगळी खरी नाहीं—अर्धी खरी आहे !

**सुभद्रा**—वहिनी, तुला बोलायचं असलं तर नीट बोलत जा. असलं ग काय बोलणं ?

**मनोरमा**—मग सांगूच तर वन्सं ? भाऊजींच्या मनांत जें कांहीं आहे त्याला एकदां तुम्ही आपल्या बाजूनं हो म्हटलंत म्हणजे मग सगळं ठरलं ! मग काय? तुमच्या बाजूनं काय ठरतें ? सांगा पाहू वन्सं. उगीच ओढून चंद्रबळ आणूं नका. आतां काय तो तुमच्याच कबूलीचा अवकाश ! हो म्हणा म्हणजे झालं.

पद्य—चाल—सुखोपभोगा योग्य नसशी०

**होय म्हणा एकदां होय मग आनंदीआनंद। विकसित सुमनांतुनी पाझरे प्रेमरूप मकरंद ॥ ध्रु० ॥ विधिची लीला अतर्क्य चतुरा चित्तीं आणूनी। अनुरूपाशीं अनुरूपाचा संगम पाहूनी ॥ १ ॥ पशुपक्षीही प्रमोदयोगें होतिल दंग मनीं। काय नवल मग मानव-जाती होतां उत्सवतुंद ॥ २ ॥**

**सुभद्रा**—वहिनी, आज तूं खचित शुद्धीवर नाहींस. अग त्यांची योग्यता काय ? मी कोण !—एक सामान्य स्त्री !—उगीच का मला मोहांत पाडतां ? पण बाई मी हें काय बोलतें ? मी तरी शुद्धीवर आहें का? माझ्या हातून तरी हा असला प्रकार घडेल कसा ? वहिनी, तुझ्या ह्या कादंबरीवर्णनाप्रमाणं माझं सुखही काल्पनिकच. तूं असं पहा—

पद्य—चाल—सुवर्ण केतकि०

शुद्ध अन्नही रूढिवशें जें निषिद्ध ऐसें मानि-
यलें । आपद्ग्रस्तें म्यां एकदिनें त्याचें सेवन
आदरिलें ॥ ध्रु० ॥ तरि मजऐशा तुल्यापत्ति-
ग्रस्ता असंख्य ज्या भगिनी । क्षुधा तयांची
शमवायाची केंवि सिद्धता शक्य जनीं ॥१॥

**मनोरमा**—अन्सं, वास्तविक प्रकार असा नाहीं का?

पद्य—चाल—शशिकुलभूषण०

दुष्परिणाम दिसत असुनी । धैर्य न वसतें
लोकमनीं ॥ तरिही सदुदाहरणांनीं । रूढित्या-
गहि शक्य जनीं ॥ दाखवितां पथ विबुधांनीं ।
जागृत होती अज्ञानी ॥ यास्तव अपुल्या स-
दुदाहरणें । संसाराचें मंगललेणें । घेउनि
दावा धन्य निज जिणें । विमल सदाचरणीं ।
शाश्वत दृढता आदरुनी ॥ हळु हळु अपुल्या
मग भगिनी । होतिल सादर अनुसरणीं ॥

आतां पुढारीण बाईनं मात्र कच खाऊं नये. नेहमीं पुढाऱ्यांनींच वळण घालून दिलं पाहिजे.

**सुभद्रा**—खरंच वहिनी !–पण नाहीं ! छे ! तुझा हा निवळ भ्रम आहे ! आपल्या समाजाच्या एकंदर स्थिती-कडे तुझं चांगलंसं लक्ष गेलं नाहीं असं दिसतं. माझा किना त्यांच्यानं गिरविला जाणार नाहीं. कारण–पण आतां इथं बसून मला बाई कंटाळा आला! आंतल्या खोलींत सांगतें चल. वहिनी, आज तूं मला सोडून जाऊं नकोस. तुझ्याशिवाय आज मला चईन पडायचं नाहीं. [ जाऊं लागते. ]

**मनोरमा**—[ स्वगत ] आज मह्याशिवाय नाहींच चईन पडायचं! मनातलं ताडलं आहे ना?—पण बाई फार खोल हो !

[ जातात. ]

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

---

## प्रवेश [illegible]रा

**स्थळ—गोविंदरावांचें घर.**

**अक्कडराव**—अर्धचंद्र मिळाल्यासारखी आपली मुद्रा झाली आहे ती कां ?

**फक्कडराव**—अरे आवडीचं खटलं भोंवतं आहे. त्यांतून हा आचार्य तर माझ्या हात धुऊन पाठीस लागला आहे असं दिसतं !

**अक्कडराव**—खरंच बुवा ! यानं तर फारच प्रळय केला आहे! विधवांनां सोंवळ्याच करूं देत नाहीं. पुनर्विवाहाची चळवळ करतोच आहे ! लावतोच आहे. जुन्या चालीप्रमाणं कुठं लग्न जुळत असलं तर ह्यानं घातलाच कांटा !

**फक्कडराव**—तें करीना का ? पण आमच्या भानगडींत यानं कां पडावं ?

**अक्कडराव**—खरंच, फारच उपद्रवी आहे ! एका जागेवर राहील तर शपथ ? आज इथें तर उद्यां तिथें—जाल तिकडे आहेच. नारद आहे बुवा ! यानं तर माझी बहुतेक गिऱ्हाइकं नाहींशीं केलीं.

**फक्कडराव**—काय करावं ! ह्याच्या वगीच फार ! बड्या बड्या अधिकाऱ्यांशीं तर ह्याचं दळण वळण विशेषच ! काय गौडबंगाल आहे तें कळत नाहीं. कुठें कांहींच चालूं देत नाहीं !

**अक्कडराव**—म्हणून काय झालं! असा धीर सोडूं नको. अरे खिसा गरम असला कीं सगळे नरम यायचे!

**फक्कडराव**—अरे त्याचाही उपयोग करून पाहिला. पण कुठें कांहीं जुळेलसं दिसत नाहीं.

**अक्कडराव**—छेरे बाबा! ही पांढरी वस्तु किती मोहक आहे! ही सगळ्यांना चकवते! अधिकाऱ्याला ही दाखविली कीं, त्याची लेखणी कचरलीच! अरे हिच्याकरितां किती तरी वेडे होतात.

**फक्कडराव**—हें खरं! द्रव्याचे पुरलेले रांजण चोरीस गेले म्हणून लटपटभट वेडा झाला आहे खराच!

**अक्कडराव**—अरे असे कितीक!–पण या वेळीं तो वेडा आहे हें बरंच! कारण, तो तसा नसता तर ह्या आवडीच्या खटल्याला भलतंच स्वरूप आलं असतं–आणखी आणताही!

**फक्कडराव**—बरं पण आतां पुढें काय करायचं? मला तर कांहीं सुचत नाहीं!

**अक्कडराव**—अरे असे हातपाय काय गाळतोस? आचार्य वगैरे मंडळींचा एवढा काय दिमाख लागून गेला आहे! अरे आमच्यासारख्या कफल्लकाला त्याची भीति! पण तुमच्यासारख्या लक्ष्मीपुत्रांनां मुळींच धास्ती नको! अरे एकदां फसलं म्हणून काय झालं? चल, ह्या गोऱ्या गोऱ्यापान [ टिचकीनें रुपया वाजवितो. ] छबकडीचा प्रभाव दाखवूं चल. ह्या कचाटांतून आपण सुटलों नाहीं तर मिशीच उतरून देईन!

**फक्कडराव**—ठीक आहे. आतां तुम्ही गुरू काय कराल तें खरं! चला.

**अक्कडराव**—अरे तुझ्यासारखे यजमान असले कीं, असल्या प्रयोगांत आम्ही अगदीं तरबेज!–पण बुवा, आज कांहीं नीट जेवण गेलं नाहीं. एखादं कांहीं रुचकर काढ.

**फक्कडराव**—घरांत जा. आजच मदनपाकाच्या वड्या केल्या आहेत. थोड्या मागून खा जा. तोंवर माडीवर जाऊन मी कपडे बदलून तयार होतो.

**अक्कडराव**—तूं आणवशील तर. त्या आम्हाला कुठल्या द्यायला?

**फक्कडराव**—अरे जा. तूं परकी आहेस काय?

**अक्कडराव**—परकी नाहींच! पण–हो--ते परवांचे लाडू संपले का?

**फक्कडराव**—काय आधाशी आहेस रे? बरं जा. असले तर घे मागून. माझं नांव सांग जा–आटप लवकर.

**अक्कडराव**—हो! हो! त्याला किती उशीर लागतो? [ फक्कडराव जातो. ] हं! काय म्हणे माझं नांव सांग! यंव! काय ह्याच्या नांवाची किंमत! हे बोवा नुसते कुंकवाचे मालक! खरे यजमान———हं! आतां कसंही करून आपल्याबरोबर ह्याचीही सुटका केली पाहिजे. नाहीं तर आंतून घुस्सा व्हावयाचा! आणखी ह्याच्या जिवावर चालणारी आमची चैन तीही नाहींशी व्हायची. [ जातो. ]

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—रेवातीर.

**वसंत**—माधवाचं पत्र येऊन आठ दिवस झाले. माधवानं धरलेल्या आग्रहाचं पुढें काय झालं तें कांहीं कळत

नाहीं. आचार्यही अजून आले नाहींत. मनाची तरी काय विलक्षण ओढ असते. अप्राप्य वस्तूविषयीं तर ह्याची फारच हाव! भावी सुखांत हा विलासी प्राणी अगदीं तल्लीन होऊन जातो! पण जर ह्या भावी सुखाची एकाएकी निराशा झाली तर मनाची स्थिति किती विलक्षण होते!

पद्य—चाल—माझे मित्र०

**व्यर्थ सुखाची ही आशा। दुर्लभ योग दिसे**
**मम पात्रे। मनोराज्य नाशा॥ ध्रु०॥ अनर्थ**
**भावी अल्प दिसांहीं। सुंदरीवरती येऊं पाही।**
**तो टाळाया उपाय कांहीं। न दिसे परमेशा॥१॥**

तें पत्र वाचून माझे नेत्र अंध का झाले नाहींत? सुभद्रेचं भावी रूप—छे! छे! त्याचा उच्चारही नको! तिची ती कष्टमय अवस्था माझ्यानं पाहवेल का? छे! छे! हे पंचप्राण पटकन निघून जातील! देवानं एक सुंदर वस्तू निर्माण करावी—आणखी पशुप्रमाणं आम्ही ती चिरडून टाकावी! मनुष्यकोटींत आमचा जन्म झाला एवढंच! काय ह्या भयंकर चाली! आमच्या समाजाचं इकडे लक्षच का जाऊं नये?

पद्य—चाल—महाश्वेता न ये०

**दुष्ट रूढी प्रलयकारी॥ नोळखूनी दुर्विचारीं॥**
**आग्रहाच्या अंधकारीं॥ सुचिर वसणें अति-**
**च लज्जेचें॥ १॥ श्रेष्ठ तुम्हि का ईश्वराहुनि॥**
**म्हणुनि तत्कृति निंद्य समजुनि॥ नष्टपतिका-**
**रूपशातनिं॥ होउं बघतां तुम्हि विश्वकर्मे॥ २॥**

यतिवेषाचं खडतर व्रताचरण विधुरांनां आणि विधवांनां सारखंच असतं तर तुम्हाला इतका दोष कुणी

दिला नसता! पण आपली तेवढी वासना हवी तशी तृप्त करून स्त्रियांच्या मनोवासनेकडे दुर्लक्ष करणं म्हणजे नरराक्षसांनीं त्यांचा केवळ छळ करणं असं नाहीं का? असलं भयंकर कृत्य पाहून तुमचं हृदय दुभंग होत नाहीं का? त्यांचे करुणविलाप ऐकून तुमच्या काळजाचे तिळतिळ तुकडे होत नाहींत का? तुमच्या मठ्ठ मगजांत एकही सुविचार शिरूं नये आँ!

पद्य—ताल, झंपा.

**षंढ तुम्हि मंदमति अंध बधिरावला। लेश नच मनुजगुण अंगिं उरला ॥ ध्रु० ॥ तूमच्या देखतां तूमच्या मातृका। कन्यका स्वसृगणा स्पर्शि नर अन्य कां। भ्रूणहत्यादिकां घडवितां पातकां। हा तुम्हां धर्मपथ काय गमला ॥ १ ॥ ईश्वरीं रसिकता शून्यता मानुनी। तत्कृता रुचिरता दोषयुत जाणुनी ॥ आपुली कल्पना मागुती ढकलुनी। हाचि का रूपगुण साधियेला ॥ २ ॥**

बस्स! आतां हाच निश्चय!

साकी.

**संन्यासाची दीक्षा घ्याया प्रिया सुभद्रा पाहे ॥
तरि मजलाही त्या दीक्षेविण पंथ दूसरा नोहे ॥
सोडुनि जगतासी ॥ होइन विरक्त संन्यासी ॥ १ ॥**

[ जाऊं लागतो. ]

**आचार्य**—[ एकदम प्रवेश करून ] हं! हं! जरा थांब! तुझ्या हातून अजून महत् कार्यें व्हायचीं आहेत! काय हा अधीरपणा!

## दिंडी.

जाशि विसरुनि तूं काय निज कुलासी । शील वयही नचि मनीं वागवीसी । मनोनिग्रह तूं आजवरी केला । तोचि अबलेनें काय लया नेला ॥ १ ॥

**वसंत**—आचार्य,

पद्य—चाल—त्वद्वनविभू०

खचित न ती अबला म्हणावी, पाळी दृढ-तम निश्चयास, विमल चरित सतत वरित लव न ढळत ॥ ध्रु० ॥ त्या धन्येची प्राप्ति न हो मज, तंववरि मम जनि विफलचि वाटत ॥ १ ॥ मूर्तिधरा त्या करुण रसाच्या, केंवि बघूं मी विटंबनेप्रत ॥ २ ॥

**आचार्य**—हं! सृष्टिक्रमानं तुझ्या विचारक्रमावर ताण केली म्हणायची! असं होणार हें भविष्य मी पूर्वीच केलं होतं. असो, ह्यांतच मला आनंद आहे! बरं पण तूं आतां असा हा त्रागा करूं नकोस. तिच्या केशवप-नाची तुला मुळींच काळजी नको. मरणासन्न झालेल्या तिच्या मातापितरांची मी समजूत केली आहे.

**वसंत**—[ आनंदानें ] आतां निश्चित झालों! जुन्या माणसांच्या वेडगळ समजुती दूर करणं आपलं अगदीं हातखंडा काम झालं आहे! आवडीच्या वेळीं आपल्याला असंच यश आलं असतं तर विचारीचं कल्याण झालं असतं!

**आचार्य**—तेव्हांही मी बहुत प्रयत्न केला; पण तिथें माझा व्हावा तसा प्रवेश होईना. त्यांनून माधवासारखा

तिला पाठीराखा कोणीच नव्हता. त्यामुळं विधि होऊन गेला. आणखी पुढं तसा शेवट झाला! असो, ' गतं न शोचामि ' म्हणून समाधान मानावं झालं.

**वसंत**—आचार्य, ह्या वपनविधीच्या शास्त्राधाराचं ह्यांनी हें काय अवडंबर माजविलं आहे !

**आचार्य**—अरे हेंचसं काय! सर्वच तसं आहे! वचनांचा ओढून ताणून हवा तसा अर्थ करितात. वचनांतील अक्षरापेक्षां वचनाच्या हेतूकडे विशेष लक्ष पुरविलं पाहिजे. एकंदर परिस्थिति अवलोकन केली पाहिजे. देशकालमानावर धोरण ठेवलं पाहिजे. अरे, शास्त्र आणि रूढि ह्या दोन गोष्टी अगदीं भिन्न होत! पण या तऱ्हेनं निरपेक्ष बुद्धीनं विवेचन कुणी करावं?—आणखीं समजतं आहे कुणाला?

पद्य—चाल—प्रियेविण मजला०

**युगायुगाचे धर्म निराळे। व्हावे कां हें कवणासि कळे ॥ ध्रु० ॥ वेद एकदां होउनि जातां। कैंवि उदेली सूत्रभिन्नता। तीच शाश्वतिक जरि मानावी। स्मृतिस मान्यता कां मग यावी ॥ १ ॥ स्मृतिही भिन्न कशास असाव्या। शाश्वत त्या मग कां न टिकाव्या। भिन्न पुराणीं जनि पावावी। एकवाक्यता त्यांत नसावी ॥ २ ॥**

इतिहासाला हीच गोष्ट लागू! हें पहा, रूढि स्थितिभेदानं बदलते हें तत्व निश्चित होतं. आणखी एवढं लक्षांत ठेवलं म्हणजे वादाचा सहज निकाल होतो.

**वसंत**—असल्या वादांत सुधारणाप्रिय आधुनिक शास्त्रीमंडळीची आणखी एक चूक होते असं मला वाटतं.

**आचार्य**—ती कोणची ?

**वसंत**—वचनांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न करितात तें चुकतं !

**आचार्य**—मोठाच प्रमाद ! वसंता,

पद्य—चाल—जीं जीं कर्मे०

**भिन्न ऋषींचीं मतें भिन्न तीं भिन्न स्थिति ते दाविती । त्या सर्वांची एकवाक्यता न्याय्य कदापि न होय ती ॥ हात कुणाचा पाय कुणाचा शीर्ष कुणाचें छेदुनी । व्यक्तिभिन्नता झांकूं जाणें । तुल्यरूपता साधूं जाणें । हास्यास्पद हें हो जनीं ॥**

**वसंत**—बरोबर आहे. जिथें तिथें वादांत आपलाच जय होतो ह्याचं कारण आपल्याला ह्या सर्व गोष्टी अवगत आहेत हेंच.

**आचार्य**—बरं पण वसंता, सुभद्रेसंबंधानं तुला जी ही आशा उत्पन्न झाली आहे ती सफल कशी व्हावी ?

**वसंत**—आचार्य,

साकी.

**प्रीतितरूचें बीज माधवें मम हृदयीं रोपियलें ।**
**त्यातें सांप्रत आशारूपी असती अंकुर आले॥**
**भवद्यत्नवारी ॥ त्यातें करिल सुफळधारी ॥१॥**

**आचार्य**—प्रयत्न करण्याचं माझं व्रतच आहे. पण तिचा मनोनिग्रह कांहीं असामान्य आहे ! तुझ्यावर तिचं निर्मल प्रेम आहे हें सत्य ! पण असंख्य अनाथ बालविधवांकडून स्वार्थपटु म्हणवून न घेण्याचा तिचा निश्चय आहे ! सार्वत्रिक चाल पडली तर मात्र ती पुनर्विवाह करण्यास प्रवृत्त होईल असं मला समजलं आहे.

**वसंत**—असं मानसिक धैर्य खचूं पाहणं हें तिच्या एकंदर गुणरूपाला गालबोटच म्हणायचं !

**आचार्य**—ह्याला व्यंग कसं म्हणावं ? जसा चंद्राचा कलंक त्याला दुप्पट शोभा आणतो; अथवा सुप्रसन्न व सुरेख अशा गोजिरवाण्या बालकाचा मुखेंदु मुद्दाम लावलेल्या गालबोटानं जसा अधिकच खुलतो, तद्वतच ह्या गालबोटानं तिच्या गुणरूपाला ज्यास्तच शोभा आली आहे!

**वसंत**—मग तर, माझे मनोरथ केव्हांही पूर्ण होण्याची आशा थोडीच !

**आचार्य**—अरे, असा हताश होऊं नकोस. आपणा सर्वांच्या परिश्रमाचं काय चीज होतं हें पाहण्याचा तिचा हेतु असावा असा माझा तर्क आहे. तुमचं अन्योन्य प्रेम पाहून मी इतकं खात्रीनं सांगूं शकतों कीं सुधारणेकडे लोकमत आपल्या प्रयत्नानं प्रचलित नच झालं तरी तुलाच माळ घालून एक दिवस ती सर्व पुरुषवर्गाला खालीं पाहयला लावील !

**वसंत**—ह्या आशांकुरावरच माझं सर्वस्व अवलंबून आहे !

**आचार्य**—बरं, ह्या रेवातीरीं येण्याचा हेतु तुझी चिंता दूर करावी हा एक; आणखी उदईक मुम्बापुरींत सुलोचनेचा पुनर्विवाह निश्चित केला आहे त्या समारंभास तूं यावंस हा दुसरा.

**वसंत**—मी आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. ठीक आहे. [ घड्याळ पाहून ] मेल निघायला अजून दोन तास अवधि आहे. मी आपली गाडी आपण उतरलां आहां त्या आश्रमांत पाठवून देतों.

**आचार्य**—ठीक आहे. [ आचार्य जातात. ]

**वसंत**—सुभद्रा विद्रूप होण्याची आतां धास्ती नको! माधवाचं साह्य असल्यामुळं आतां पुढें फारसा व्यत्यय येणार नाहीं! सुभद्रेच्या संगतींत सुखानं आयुष्यंक्रमण करण्याची माझी आशा आतां सफल होणार! असल्या प्रीतिविवाहांत किती स्वारस्य आहे हें मी आपल्या अंध समाजाला दाखविणार! या सगळ्याला कारण ही महाविभूती! सद्गुरो आचार्य, मी आपला सर्वस्वी ऋणी आहे!

पद्य—चाल—कामिनियौवन०

**धन्य असे त्या आचार्यांची। मूर्ति साक्षात् परोपकृतिची। शास्त्र जाणते सदनुकृतीतें। करण्या धरितिल जरी मतीतें। सोडितील जन तरि रूढीतें। प्राप्ती निश्चित ती प्रगतीची॥ १॥** [ जातो. ]

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—सुभद्रेची खोली.

**सुभद्रा**—बाबांची कांहीं मला वरचेवर आठवण होत नाहीं–पण आईची मात्र क्षणोक्षणीं होते! [ डोळे पुसून ] जुन्या समजुतीचीं माणसं! त्यांच्या आणखी माझ्या विचारांत किती तरी अंतर!–पण मायापाशानं मला त्याचं कांहींच वाटत नसे. गेलीं बिचारीं! ह्या हतभागीला अशीच दुःखांत टाकून गेलीं!

पद्य—चाल—बाव्या, जाई परतोनी०

**दुःस्थिति मम भाळीं, विधिनें, शाश्वत कीं लिहिली॥ विश्व सकलही उदास भासे, प्रफु-**

**लुता ती सर्व निमाली ॥ ध्रु० ॥ हीन दशा मम पाहुनि हृदयीं करपुनि होतीं जीं गेलीं। तीं मत्प्रियतम मातापितरें, उभयहि यमजालीं, पडलीं। अनुकंपाकुलमूर्तिधरें तीं, चिर दिसती मजपुढती ठेलीं ॥**

आई, पोटाशीं कवटाळून धरून 'बये, लाडके, 'असं काय बरं!' असं तोंडावरून मायेचा हात फिरवून आतां मला कोण म्हणेल! सर्वस्वी अनाथ झाले ना! मायामोह मोठा कठीण! मृत मातेची आठवण कुणाला होणार नाहीं? माझ्यासारखीला तर हा विरह फारच दुःसह! मनुष्य कितीही कठोर असलं तरी त्याला आपल्या जन्मदात्या मातेचं स्मरण व्हायचंच न् खेद व्हायचाच! अहाहा! मातृप्रेम! किती गोड शब्द! ह्या दोन शब्दांतच सर्व प्रेम भरलं आहे! पण हें प्रेम आठवायला मी तरी आतां किती जगणार! [ दोन पावलें चालून ] मला जडलेलें हें दुखणं दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत चाललं आहे! आतांशा मला फारच त्रास होऊं लागला आहे! पहिल्या प्रथम दुर्लक्ष केलं खरं.—पण आतां वहिनीला कळविलंच पाहिजे. काय दशा झाली आहे ही! स्त्रियांचा हा व्याधि भयंकर खराच! इतक्या दिवस मानसिक पीडेचीच व्यथा होती—त्यांत आणखी आतांही शारीरिक पीडेची भर पडली! माझ्यासारख्या स्त्रीचं जिणं व्यर्थ खरंच!

पद्य—चाल—सुंदरी विलासिनी०

**क्लेश घोर वाटती। मनिं मी झुरतें कणशां मरतें। तनु हे क्षरते त्वरित वदुं किती ॥ध्रु०॥ दादा वहिनी प्रेम अकृत्रिम। करिती न ग-**

**गुनि निज देहश्रम । परि तें मज सुखवाया**
**अक्षम । धैर्य चळे, अति होरपळे मन, शून्यता**
**भासते सर्वथा पतिविण विफला अबला-**
**जाती ॥** [ जाते. ]

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—मनोरमेचा महाल.

[ मनोरमा वर्तमानपत्र वाचीत असतां माधव हळूच प्रवेश करून तिच्या मागें उभा राहतो. ]

**माधव**—एवढं लक्षपूर्वक वाचन कशाविषयीं चाललं आहे ?

**मनोरमा**—खरंच बाई ! विचार करण्यासारखंच आहे! [ वर्तमानपत्राकडे पाहून ] आधुनिक शिक्षणपद्धति.

**माधव**—अस्सं ! मग त्यावर तुमचे काय आक्षेप आहेत ? पण इकडे खिडकीजवळ बसूं या. आज झोपच येत नाहीं ! [ तसें करितात. ]

**मनोरमा**—विशेष कांहीं नाहीं. सगळा निबंध अजून वाचलाच नाहीं.—पण बाई इथें लिहिलं आहे [ पाहून ] ' आमची तरूण मंडळी विश्वविद्यालयाच्या चर-कांतून नुकती कुठें बाहेर पडते न पडते तोंच अकाल-मृत्यूची धाड त्यांच्यावर ठेवलेलीच ! ' हें लिहिणं थोडं एकदेशीय नव्हे का ?

**माधव**—तुझ्या बोलण्याचा मुद्दा समजलों. हें कलम सर्वत्र लागूं पडत नाहीं खर—पण बहुतेक असाच प्रकार आहे ! श्रीमंत विद्यार्थ्यांना ही पद्धति इतकी जाचत नाहीं. थोडीशी जाचतेच—पण गरीबांच्या स्थितीकडे पहा—

पद्य—चाल—नलगे हा संग्र॰

बालपणीं अर्धि न मिळे अन्न जयां पोटभरी।
प्राप्त तयां होत असे पतकरणें माधुकरी।
हाल हाल सोसुनि ते दीर्घकाल सर्व परी।
शिरताती यूनिव्हार्सिटीस्वरूप काळघरीं॥ १ ॥
प्रतिवर्षी नवनवीन विषय परीक्षार्थ किती।
अर्धपोटिं जागरणीं जळुनि जाय रुधिर अती।
सुकृश गात्रयष्टि शुष्क दोडक्यास लाजविती।
मंददृष्टि अचुक परी यमगृहीं प्रवेशती॥ २॥

**मनोरमा**—खरंच तें !

**माधव**—तुझ्या मामेभावाचं उदाहरण तुझ्या डोळ्या-पुढें आहेच ! आतां उलट पक्षीं वसंताचं उदाहरण ! पांच सहा वर्षं मेडिकल कॉलेजांत होता--पण अजून शरीर कसं आहे !--आणखी इतकी शरीरप्रकृति चांगली रहायला दुसरं एक कारण आहे.

**मनोरमा**—ब्रम्हचर्यव्रत पाळलं आहे हेंच कीं नाहीं ?

**माधव**—तेंच ! मुद्दा महत्वाचाच ! तसंच, ज्याला सर्व गोष्टी अनुकूल असतील त्यानंच विश्वविद्यालयांत प्रवेश करावा. तुझ्या ह्या केशवाला पुष्कळ सांगितलं. पण पुढें तसा विपरीत परिणाम व्हावयाचा होता म्हणून त्यास तशी बुद्धि झाली असं म्हणावं लागतं !

**म०**—पदवी मिळविण्याकरितां तो झटत होता ! ह्या शतकांत नांवाच्या पुढें ' बी. ए. ' ' एम. ए. ' ' एल. एल. बी. ' अशी एखादी पदवी असल्याशिवाय सन्मान मिळत नाहीं.

**मा०**—हा लोकांचा भ्रम केव्हां जाईल तो जावो ! आणखी लवकर जाईल तर फार बरं !--कारण समाजाची

आधारस्तंभ जी पुढली पिढी तिची मग डिग्रीच्या आशेक-रितां अशी अकालीं मृत्युमुखीं पडण्याची फारशी धास्ती नाहीं.

**म०**—बरं पण असं आतां बोलत तरी किती वेळ बसायचं ? निजायचं नाहीं का ?

**मा०**—आज झोंपच येत नाहीं. इतका वेळ आवडीची केस घेऊन बसलों होतों. मुद्दे काढून ठेवले आहेत. औषध देणारा तो नापीक, सार्थीदार अक्कडराव, आणखी ती गांवकाकू यांना तर शिक्षा होतीलच; पण तो नीच गोविंदराव सुटेल असं दिसतं.—कारण पुराव्याची बाजू लंगडी पडते !

**म०**—तो सुटला तर कांहीं चांगलं होणार नाहीं ! असल्यांनां शिक्षाच झाल्या पाहिजेत. सरकारानं आपल्या हातीं हा कज्जा दिल्यासारखं सगळ्यांनां शिक्षा झाल्या म्हणजे मला बाई मोठं समाधान वाटेल !

**मा०**—सगळं खरं ! पण कायद्याच्या मोजक्या अक्ष-रांपुढें इलाज नाहीं ! बाकी अन्य प्रकारानं त्याचा समाचार घेण्याची आचार्यांनीं कंबर बांधलीच आहे !—खरोखर, आचार्य ही एक अमोलिक व्यक्ति आहे ! त्यांना कुठं आहेत पदव्या ?—आपल्या सुभद्रेकरतां आचार्यांची जारीनं खटपट सुरू आहे ! पुराणप्रसिद्ध पवित्र क्षेत्रांतील, तसंच मोठमोठ्या इतिहासप्रसिद्ध शहरांतील रूढिग्रस्त शास्त्री-वर्गाला त्यानीं वादांत जिंकलं. बालविधवांचा पुनर्विवाह बेलाशक करावा असं ठरविलं ! असेच ठिकठिकाणीं त्यांना जय मिळत गेले पाहिजेत !

**म०**—अगबाई ! मग तर ही आनंदाची बातमी वन्संना कळविली पाहिजे ! वन्संच्या इच्छेप्रमाणं होणार तर !

त्यांचा हाच हट्ट आहे! असं झालंच तर मात्र त्या आपल्या मनाप्रमाणं वागण्यास तयार आहेत!

**मा०**—त्याची नको काळजी! तें काम बहुतेक अटो-क्यांत येत चाललं आहे! जिकडे तिकडे जारीची चळ-वळ सुरू आहे!

**म०**—बरं–हो–वसंतच्या प्रकृतीचं आपण काय निदान केलं आहे? किती पण अशक्त झाल्या आहेत!

**मा०**—नीटसं ध्यानांत येत नाहीं! तिला आईचं फार वेड असल्यामुळं असं झालं असेल! पण या गोष्टीला आतां बराच काळ लोटला आहे!

**म०**—तें तर आहेच.—पण आणखी एक नवीनच कारण झालं आहे! इतक्या दिवस त्यांनीं चोरून ठेवलं–पण आतां मला सांगितलं. हा बायकांचा रोग फार वाईट हो! शरीर अगदीं धुवून पुसून निघाल्यासारखं फिकट बनतं! याच्यावर लवकरच जालीम उपाय योजायला हवा.

**मा०**—पण मला हें आज समजतं. उद्या वसंत येईलच. त्याला कळवूं.–तो डाक्टरच आहे!–आणखी आपल्या वैद्यबोवानाही बोलावणं पाठवूं.

**म०**—मला बाई मोठी काळजी लागली आहे!

**मा०**—काळजीच कांहीं कारण नाहीं! तेव्हांच प्रकृति ताळ्यावर आणूं! चला, निद्रादेवी तर आज आपल्यावर रुष्टच झाली आहे; पण प्रसन्न होईल तर पाहूं चला.

[ जातात. ]

---

# प्रवेश ६ वा.

**स्थळ**—माधवरावाचा वाडा.

[ रोगग्रस्त सुभद्रा निजलेली आहे. ]

[ माधव व मनोरमा प्रवेश करतात. ]

**मं०**—[ माधवास ] ह्या पंधरा दिवसांत वन्संची काय अवस्था झाली आहे ही! देवाला काळजी!

**मा०**—[ सुभद्रेकडे पाहून ] डोळा लागला आहे वाटतं. झोंप कसची म्हणा, गुंगीत असेल झालं! तूं हळूच जवळ जाऊन बैस. मी आलोंच. वैद्यराज आले का पाहतो. आलोंच इतक्यांत [ लगबगीनें जातो. ]

**म०**—[ सुभद्रेजवळ जाऊन ] लिंबासारखी यांची कांती!—पण आतां किती निस्तेज दिसते! काय होईल कोण जाणं! अहाहा! वन्संचा स्वभाव किती प्रेमळ! अशी नणंद तरी मिळेल का? मी मोठ्या भाग्याची म्हणूनच मला असली नणंद लाभली! नाहीं तर नणंदाभावजयांचं प्रेम प्रसिद्धच आहे!

**पद्य**—चाल—असशि इमानी.

**जगीं ननांदा भावजयांना म्हणति न नांदा पतिसदनीं। असभ्य वाणी सुदुःखखाणी मर्म भेदिनी चिर वदनीं॥ ध्रु०॥ उभें खडाष्टक सदा परस्पर जागृत राहे दिनरजनीं। मेघ गडाडती विजा कडाडति सारिही येती कोसळुनी॥ १॥ मायघरींची वाई एकटी खरीच ऐसें मानोनी। सासुरवासिणिवरी धांवती वडिलधाकुटीं उसळोनी॥ २॥ ही अशीच घासाघीस सदा चालते। मग सासुरवासिणि**

**येती रडकुंडितें । अति अप्रिय वसती सासरिं त्यां वाटते । मायघरासी जाउनि तेथें वसणें मुखही लपवोनी । हेंच बिचाऱ्या श्रेय मानिती निराश अंतरिं होवोनी ॥**

एक शब्दानं सुद्धां आजपर्यंत मला कधीं दुखविलं नाहीं. माझ्यावरचं वन्संचं प्रेम मनांत आलं म्हणजे अगदीं भडभडून येतं ! देवा, आमच्या सुखांत नको रे माती कालवूंस ! [ सुभद्रेच्या आंगावरून हात फिरविते. ]

**सु०**—अं ! कोण ? वहिनी, अग, जरा पड जा. तुम्हा दोघांना किनई आतांशा एकसारखीं जागरणं चाललीं आहेत. अं ! हेंच बाई माझ्या मनाला फार खातं ! तुला तर जागरण मुळींच सोसत नाहीं. जरा पड जा.

**म०**—वन्सं, असलं काय बोलणं हें ? न जागायला मला काय झालं आहे ? तुमची प्रकृति पूर्ववत सुधारली म्हणजे मग हव्या तेवढ्या झोपा काढीन.

**सु०**—मी आतां कसची बरी होते ! माझं भविष्य मला कळून आलं आहे !

**म०**—[ साश्रू ] नका हो असलं अभद्र बोलूं ! आतां उतार पडेल बरं का ?

**सु०**—अग, आतां कसला उतार ! ऊं ! चढच व्हायचा ! [ पाहून ] हें काय अडाणी बायकोसारखं ! हीं आसवं कां ? अशा वेळीं तर माझं मन प्रसन्न ठेवायला तूं झटावंस !

**म०**—[ डोळे पुसून ] नका हो असं बोलूं !—मग आम्ही काय करावं ? मला बाई कसंसंच वाटतं !

**सु०**—अग, मरण म्हणजे सर्व सुखाचं निधान ! अगदींच का विसरलीस ?. अशी भांबावूं नकोस.

**म०**—पण कोणतीही गोष्ट वेळीं झाली म्हणजे मग त्याचं एवढं वाईट वाटत नाहीं.

**सु०**—वहिनी, माझ्या सारखीला वेळ कसली आणखी अवेळ कसली !

**पद्य—चाल—त्या मदन :**

**वहिनी कां वृथा तूं ऐशी। मजविषयीं कष्टी होशी॥ मजऐशां हतभाग्यांसी। जगणें दे काय सुखासी॥ चिकटलों जरी जीवासी। तरि गणिती मृत आह्मांसी॥ स्थिति कष्ट, अशी ही स्पष्ट, म्हणुनि अम्हि नष्ट, होउं तें इष्ट, रूढ चालीसी, अम्हि भारभूत जगतासी। खचित गे॥**

**म०**—वन्सं, प्रकृतीला आराम पडल्यावर ह्या विपत्तीचं इष्ट रूपांतर होणारच आहे. मग उगीच खेद कां ?

**सु०**—मी बरी होईन तर ना ? पण खरंच सांगतें ईश्वराची मी लाडकी खरी ! म्हणूनच माझा लवकर अंत होत आहे ! अग, मरणाला कुणी भ्यावं ? पापी माणसानं ! केल्या पापाचं स्मरण होऊन त्याचा आत्मा तळमळत राहयचा ! ममतेमुळं तुला दुःख होतं खरं पण यावेळीं मी मोठ्या आनंदात आहे ! वहिनी,

**पद्य—चाल—समजुं नको।**

**मरणाचें भय न मला लेश वाटतें। स्वेच्छेनें त्वरित मला हरुनि नेउ तें॥ ध्रु०॥ आजवरी पापवृत्ति, नाहिं दिली येउं चित्तिं। सर्वकाळ रक्षियलें। चरित पूत तें॥ १॥ मद्भगिनी स्मरुत मला। देह तयां भ्यां विकिला।**

**स्वाचरणें शक्य तयां । नीतिमार्ग दाखविला॥ हेंच समाधान मनीं । अंतिं मानितें ॥ २ ॥**

**म०**—वन्सं, अशी बडबड किती कराल? जरा स्वस्थ पडाल का? नाहीं तर अधिक ग्लानी येईल.

**सु०**—अग, अजून वाचा बंद झाली नाहीं म्हणून ही बडबड! ती लवकरच होणार म्हणून एकदां शेवटचं बोलून घेतें. वहिनी, मी आनंदांत आहे खरी, पण एका गोष्टीविषयीं मात्र मला फार दुःख होतं आहे!

**म०**—ती कोणची बाई?

**सु०**—माझं हितगुज तुला थोडंसं कळलंच आहे.— पण अजून पुरतं नाहीं सांगितलं. नीट ऐक बरं!

पद्य—चाल—जडलें वेडावि०

**हृदयीं एकचि शल्य वसे । तें मज अतितम जाचितसें ॥ध्रु०॥ माझ्या मागें तव भावोजी । वसंत यांची दुरवस्था जी । भावी भासे हृदयामाजी । ती मज भिववीतसे ॥ १ ॥ आजवरी मी सुनिग्रहानें । वर्तन केलें अभि- मानानें । वसंतहेतू तें विलया ने । त्यांस करील पिसें ॥ २ ॥**

माझ्या हट्टाला असला मोहरा इरेस पडणार असं मनांत आलं म्हणजे हीं आसवं थांबत नाहींत! अंतीं क्लेश काय. ते एवढेच! असो आतां काय त्याचं!—पण माझं एक काम करशील का? माझ्यावर खरी ममता असली तर नाहीं म्हणणार नाहींस!

**म०**—वन्सं, मी कधीं तरी नाहीं म्हटलं आहे का? असं काय आहे तें?

**सु०**—माझ्या हातांत हात घालून हो म्हण म्हणजे सांगतें.

**म०**—[ साश्रू ] तसं का होईना? सांगा पाहूं. आतां मला डोळ्यापुढें कांहीं दिसत नाहीं.

**सु०**—सांगतें इकडे लक्ष असूं दे.

पद्य—चाल—आम्रमंजिरी०

**निरोप माझा त्वरें ॥ कळिव तूं वहिनी बहु आदरें ॥ ध्रु० ॥ आचार्यांच्या परिश्रमाचें । चीज लोचनीं पाहायाचें । होतें मनिं तें वि-धीस न रुचें । करील तो तें खरें ॥ १ ॥ अपुलें अजवरिचें मजवरतें । प्रेम अकृत्रिम विफल न जातें । अल्पदिशीं मी अपणां व-रितें । हेतु मनीं हा जिरे ॥ २ ॥ मदुदाहरणें मद्भगिनींसी । प्रवृत्त करितें या मार्गासी । विधि परि देइ न अवकाशासी । हेतु एक हा उरे ॥ ३ ॥**

**म०**—पुरे वन्सं, आतां सगळं समजलें. नका फार बोलूं. त्रास होईल बरं.

**सु०**—ऐक ग. मला एकदां शेवटचं सगळं सांगूं दे.

पद्य—चाल—स्वीकारी दासीस०

**सांडुनियां सुविचार । जिवासी । नका करूं अपकार ॥ निर्धारानें विसरुनि सगळी मज-विषयींची हाय । स्वयें उद्धरा एक अनाथा पंकीं रुतली गाय । प्रेम आपुलें मजवरि राहे यास्तव माझी आण । शेंवटच्या या मम वि-नतीतें या मजसाठीं मान । सोडूं नका सुवि-चार । जिवासी । नका करूं अपकार ॥**

वहिनी, तुझ्या भावजींना म्हणावं माझ्या आत्म्याला परलोकीं शांति मिळावी असं तुम्हाला वाटत असेल तर एवढं कराच ! झालं एवढंच ! आतां मी सुखानं मरेन !–हाय ! वहिनी, मला असं ग काय होतं ? [ मूर्च्छित होते. ].

म०—[ घाबरून ] अरे देवा ! आतां काय करावं ! तरी म्हटलं बोलूं नका–स्वस्थ पडा. वन्सं, [ सावध होत नाहीं असें पाहून ] अग आई ! कोण आहे बाहेर ? या हो लवकर !

मा०—[ सत्वर प्रवेश करून ] काय ? घाबरी झाली कीं काय ?

म०—[ गहिंवरून ] पहा बरं !–कांहीं विपरीत दिसतं ! [ रडूं लागते. ]

मा०—थांब ! अशी घाबरूं नकोस ! जा, थोडं पाणी आणीव. तिचा जीव गलबलला आहे. आतां सावध होईल. जा लवकर. [ ती तसें करिते; इतक्यांत वसंत, वैद्यराज, विश्वास व एक शागीर्द प्रवेश करितात. सुभद्रेला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न होतो. ती शुद्धीवर येते. ]

व०—ह्या व्याधीनं माझ्या हृदयमंदिरांतील मूर्तीची ही बाह्य छाया नाहींशी होणार असं दिसतं !

वै०—[ वसंतास ] आपण एकदां नाडी पहा.

व०—[ दुःखानें ] माझी झाली आहे परीक्षा ! आपणच पहा.

वै०—बरं, मी पाहतों. [ नाडी पाहतो. सुभद्रा डोळे उघडते. तिची दृष्टि वसंतावर जाऊन नेत्रांतून अश्रुपात होतो. ]

व०—[ स्वगत ] हा अश्रुपात माझ्यामुळेंच का ?

मा०—सुभद्रे, तुला काय वाटतं ? हीं आसवं कां ?

**वै०**—छे ! छे ! घाबरण्याचं कांहीं कारण नाहीं. आतां पुड्या पाठवून देतों. उद्याच उतार पडेल. आमच्या जवळ अगदीं रामबाण औषध आहे !

**सु०**—तसं मुळींच नाहीं ! मला आपलं कांहीं आठवलं म्हणून वाईट वाटलं एवढंच !—[ पुनरपि नेत्रांतून अश्रुपात होतो. ]

**व०**—[ स्वगत ] शंकाच नको ! माझ्याकडे पाहूनच हिचे नेत्र साश्रू होतात ! काय हें प्रेम ! [ विव्हळ होतो. ]

**सु०**—[ डोळे पुसून ] माझं मला कळून आलं आहे. वैद्यराज, मी काय म्हणून भ्यावं ? मी अगदीं शांत आहे ! मला काय सांगायचं तें वहिनीला सांगून ठेवलंच आहे ! [ माधवाचे नेत्र भरून येतात. ]

**व०**—[ स्वगत ] काय बरं सांगितलं असावं ? [ वैद्यराज वसंताशीं कुजबुजतात. ]

**मा०**—माझ्या मनाची कांहीं विलक्षण स्थिति झाली आहे !

पद्य—चाल—हर हर सांपडलों०

**मम मन घाबरतें बावरतें । संशय दोले वरतें ॥ ॥ ध्रु० ॥ प्रिय भगिनीची आशा । जडते त्यजिते हृदया विवशा ॥ १ ॥ नुरलें धैर्य वसंतीं । निशिदिनिं भलतें सलतें चिंती ॥ २ ॥ प्रेमपिशाच्यापाशीं । न कळे तस्थिति होइल कैशी ॥ ३ ॥**

**वै०**—सुभद्राताई, मी जातों बरं, सकाळीं सांगितल्याप्रमाणंच औषध घ्यायचं. भिण्याचं कांहीं कारण नाहीं. [ जात असतां—स्वगत ] धीर देत आहे पण प्रसंग कठीण दिसतो !

[ जातो. ]

मा०—वसंता, पुढल्या दालनांत बसूं चल. [तसें करितात, इतक्यांत आंतून कोणी हाक मारितें त्यास ] येतों वरं, सुभद्रा हाक मारीत. आहे असं वाटतं. [ वसंतास ] आलोंच. जाऊं नकोस. [ माधव जातो व मनोरमा प्रवेश करिते. ]

म०—[ दुःखानें ] भाऊजी, [ नेत्र पुसून ] वन्संचा तुम्हाला एक निरोप आहे. त्यांचा धीर सुटला आहे म्हणूनच त्यांनीं असं सांगायला सांगितलं.

व०—पण वहिनी, लवकर सांगाल का ?

म०—खरोखर,

**दिंडी.**

**प्रीति तुम्हावरि असे पूर्ण त्यांची ॥**
**धरिलि आशा तुम्हांस वरायाची ॥**
**विफल व्हावी हें ईश्वरासि माने ॥**
**तरी विनविति त्या तुम्हां आदरानें ॥ १ ॥**

व०—असं आहे तरी काय? पण—वहिनी, सुभद्रेचे निराशेचे उद्गार ऐकायला मी अद्याप जिवंत आहें हेंच मला मोठं आश्चर्य वाटतं !

मं०—[ दुःखानें ] भाऊजी, आतां असले भलते सलते विचार तुमच्या मनांत येऊं लागतील म्हणूनच त्यांचं तुम्हाला असं सांगणं आहे. [ ‘ सांडुनिया सुविचार ’ हें पद म्हणते. ]

व०—पुरे ! पुरे ! एकाएकीं माझं चित्त अस्वस्थ झाल्यामुळं मी गेलों असं माधवरावांस सांगा.

म०—अगबाई असा काय घाबरेपणा ! [ वसंताच्या बावरलेल्या मुद्रेकडे पाहून स्वगत ] हें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं. त्यांना इकडे पाठवून द्यावं हं वरं. [जाते.]

व०—काय—चांगली वस्तु या जगांत फार दिवस

टिकतच का नाहीं ? सगळ्यांना चटका लावून ही जाणार ना? सुभद्रेच्या शेवटल्या प्रेमळ पण मर्मभेदी शब्दांनीं माझं हृदय विदीर्ण होतं आहे !

पद्य—चाल—प्रभुजी प्रभुजी०

**विधि या समया अतिघोर, तया ॥ वाटत**
**नाहीं लेशहि माया ॥ त्यास विनविणें गमतें**
**वायां ॥ ध्रु० ॥ मम नयनयुगुलसौख्यनिधानें ॥**
**अस्तापविजे कां या शशिनें ॥ घोरतमीं मम**
**नष्ट दशा, भ्रमपूर्ण तनुक्रम, कर्ण बाधिरतम**
**होउनियां यम मज नेउं लया ॥**

धर्माच्या नांवावर विकणाऱ्या निंद्य रूढीला सुभद्रे-सारखं स्त्रीरत्न आतां बळी पडणार ना ? शिव ! शिव !

पद्य—चाल—लावणी०

**रूढि देवते गे पाव तृप्तते ॥ धर्मचर्मपिहित-**
**घोरपातकैकसंगते ॥ क्रूर मती अजुनि तरी**
**जाउ नष्टते ॥ ध्रु० ॥ आजवरी त्वां असंख्य**
**घेतले बळी ॥ तद्रुधिरें पूर्ति तुझी कीं न जा-**
**हली ॥ म्हणवुनि हे रम्य मूर्ति भक्षुं इच्छिली ॥**
**दुष्ट हेतु सोड सोड विनवितों तुतें ॥ १ ॥**

अजूनही ती बरी होईल का ? छे ! छे ! सुभद्रेच्या अंतर्वेदना माझ्यानं मुळींच पाहवणार नाहींत ! आतां या स्थलाचाच काय–पण या निर्दय समाजाचा संपर्कच नको ! तूर्त रेवातीरीं दूर निघून जावं झालं ! विश्वास—

वि०—[ प्रवेश करून ] म्हाराज,

**व०—विश्वास–**

वि०—म्हाराज, [ जोडा पुढें ठेवितो. ]

**व०**—[ जोडा घालीत असतां ] चल. तयारी कर. फार लांब जायचं आहे. आटप लवकर.

**वि०**—सरकारची आज्ञा. पन—

**व०**—[ त्रासानें ] पण बिण कांहीं नाहीं. लवकर तयारी कर. [ जातो. ]

**वि०**—सुभद्राबाईसाहेबांची तर ही दशा ! आन् ह्येंची तर कुट दूर जान्याची तयारी दिसतीया ! ह्ये तरी काय! चेहरा तर इलक्षान दिसतुया ! पन् कुटं का जाइनात?—मी संग असल्यावर यजमानास्नी कसलीबी धास्ती नग म्हना ! [ धाईनें जातो. ]

## प्रवेश ७ वा.

**स्थळ**—सार्वजनिक रस्ता.

**विश्वास**—थोर थोर पुन्यवान् माणसांच्या मागंबी दुःख पाठीस लागतं तवा नशिबाचा सपाटा इलक्षनच म्हनायचा ! आमचं यजमान म्हंजी जनु देवाचाच अवतार ! लहानपनापून बगतुया त्येंची वृत्तीच काई न्यारी ! डाक्तरची परक्सा पास झाल्यापून तर परूपकार करन्याचा जनु इडाच उचलला हाय ! गोरगरीबांपायीं तर लईच घस खात्याती ! आम्हीं जवळचीं मानसं कंटाळतुया—पन् त्येंच्या जिवाला कंटाळा असा ठावाच न्हाई ! लहान थोर समद त्येन्ला रोज दुवा देत्याती.—पन असा थोर मनाचा मानुस असुनशानी नशीबानं कशी उलट खाल्ली बगा ! कालपासुनशानीं सुभद्राबाईंच्यापायीं सवारी जनु येडीच बनली हाये ! [ ऐकलेंसें करून ] नवाचा ठोका पडतुया ! ठेसनावर आतां बिगी बिगी जायला हावं. तत जाऊनशानी उंद्या पोचायाच हावं. [लवकर चालूं लागतो.]

**आ०**—[ प्रवेश करून ] विश्वास, अरे विश्वास—

**वि०**—[ हात जोडून ] म्हाराज—

**आ०**—अरे यजमानाला सोडून तूं इथें कसा?

**वि०**—काल यजमानासंगतीच मी जायचा म्हाराज. पन यजमान लई घाईनं गेलं, तवा मला थोडी आटपा-आटपी करून आज निघायला सांगितलं हाये!

**आ०**—तुझे यजमान नर्मदाकांठीं आपल्या इनाम गांवीं गेले आहेत ना? अशा वेळीं एकदम इतक्या लांब स्वारी गेली म्हणून माधवरावाकडील सगळ्या मंडळीला आश्चर्य वाटतं! आणखी वाईटही वाटतं!

**वि०**-.-जी व्हय. आपनासनी समदं माहिती हायेच. एक दिसाचीच चुकामूक झाली! आपन जर काल हितं असता तर आपन त्यांना जाऊं दिलं नसतं!

**आ०**—चुकामूक झाली खरीच! बरं पण विश्वास, तुला सांगावं असं नाहीं! तूं इमानीच आहेस! पण लहानपणापासून वसंतावर माझं फारच प्रेम म्हणून—

**वि०**—गुरूम्हाराजांचा काय हुकूम हाये?

**आ०**—हें बघ—त्याचं मन स्वस्थ नाहीं! सुभद्रेच्या विपरीत स्थितीमुळें त्याचं हल्लीं देहभान नाहीसं झालं आहे असं समजतं.—यांत कांहीं नवल नाहीं.—कारण तुला ठाऊकच आहे! तेव्हां त्या प्रदेशीं त्याच्या जिवाला विशेष जपत जा! शिवाय त्याला विशेष मायेचं असं कुणीच नाहीं! आत्येनं त्याला वाढविलं ती तर हल्लीं काशीसच राहते! म्हणून त्याला अगदीं विसंबूं नकोस! एवढंच! स्वामीनिष्ठेचं बहुत पुण्य आहे! तुझ्या निष्ठेचं फळ तुला मिळाल्याशिवाय राहयचं नाहीं! जा आतां.

**वि०**—आपला आशिर्वाद असला मंजी मला कायबी कमती नाहीं! घ्येतो रजा तर—

आ०—जा. सुखानं जा! तुझं कल्याण असो. [ विश्वास मुजरा करून जातो. ] वसंताला पत्र पाठवून त्याचं समाधान केलं पाहिजे. नाहीं तर तो रेवातीरीं पुरूरव्याप्रमाणं रानोमाळ भटकूं लागेल! [ दोन पावलें चालून ] सगळं खरं! पण—माझे एवढे परिश्रम विशेषेंकरून जिच्याकरितां चालले आहेत ती सुभद्रा तर मृत्युमुखीं उभी आहे! प्रभूची इच्छा असेल ती खरी!

पद्य—चाल—किति जगति०

**नर चिंति एक रीतीनें ॥ परि इतरा प्रभुतें माने ॥ बहु करितां यत्न नरानें ॥ यश न मिळे त्या नेमानें ॥ हें योग्य एक अर्थानें ॥ बहु अनर्थ टळाति अशानें ॥ पूर्णज्ञानी सर्वशक्तिधर ॥ धरि करीं सकल सूत्रांतें ॥ घडवी स्वेच्छेतें ॥ नचि दोष तया मनुजानें ॥ देइजे अल्पबुद्धीनें ॥**

पण असं असलं तरी मानवानं अखेरपर्यंत प्रयत्न केलेच पाहिजेत. नाहीं तर तो ईश्वराचा अपराधी होईल! ईश्वर मनुष्यांवर दुर्धर प्रसंग आणतो ते त्याचं बरं करण्याकरितांच! पण हें त्याला मात्र समजत नाहीं! [ विचार करून ] आतां कसं बरं करावं! [ कांहीं पावलें चालून ]-हें इथें काय आहे? [ चाचपून ] हं! प्रवासांतील औषधाची डबी! चुकून अशीच राहिली! [ उघडून कांहीं औषधें बाहेर काढून ] ही मुळी कसली बरं? अहाहा! कशी अवचित सांपडली! प्रभो, दयाघना, तुझी लीला अगाध आहे! एका क्षणापूर्वी मी किती हताश झालों होतो! पण आतां किती तरी उमेद आली आहे! अहाहा! हीच ती मुळी!

गुरूनीं दिलेल्या ह्या अमोल्य वनस्पतीचं आतां चीज होणार ! दोन रोगांवर ही चालते. सुभद्रेचाही त्यपैकींच एक आहे. सत्कृत्याला ईश्वराचं नेहमीं साहाय्य असतं हेंच खरं ! आतां विलंब कशाला ?

**साकी.**

**दैहिक पीडा महौषधीनें दूर करोनी आधीं ॥**
**योजिन मग सदुपाय हराया तीचा मानस-**
**आधी ॥ कृपांचि सद्गुरुची ॥ अंतीं दात्री**
**सुयशाची ॥ १ ॥** [ जातो. ]

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—माधवरावाच्या वाड्यापुढील सार्वजनिक रस्ता.

( गांवांतील टारगी मंडळी ज्याच्या पाठीस लागली आहेत असा वेडापिसा लटपटभट विचित्र वेषानें डोक्या-वर एक पाटी घेऊन प्रवेश करितो. )

**ल०**—[ पोरांस ] थांब !—पैसा ? मारीन ! चोर !

**मंडळी**—ओ हो ! हो ! वेडा ! वेडा रे वेडा ! [ असें म्हणत त्याच्या मागें लागतात. त्याला खिजवितात. तो वेडा वांकडा नाचून त्यांच्या अंगावर धांवतो—इतक्यांत ]

**आ०**—[ प्रवेश करून ] अरे ! काय हें ! तो तर वेडाच बनला आहे ! पण तुम्हीही वेडे होऊं पाहतां काय ? जाऊं द्या त्याला. [ मंडळी पसार होते. ]

**ल०**—[ आचार्यांस ] ध्या पैसा ! कोण तुम्ही ? [ हंसतो व नाचतो ]

**आ**०—शिव! शिव ! काय ही स्थिति! भटजी, तुमची अशी दशा व्हावी आँ! अथवा झाली यांत काय नवल ? द्रव्यलोभ ! पैशामुळें.—

**ल**०—पैसा–आँ! [ असें म्हणून हातानें उकरून चहूंकडे विचित्र मुद्रेनें पाहून आचार्यांस ] तूंच चोर-लास !—चोर !—पैसा !

**आ**०—इहजन्मीचं आपल्या कर्माचं प्रायश्चित्त भो-गीत आहेस ! हर ! हर ! आवडीचा—

**ल**०—आवडी, आवडी कुठें आहे ? पैसा, गोंदा ! [ हंसून व रडून ] काकू, काकू ये–आवडे ये, [ आचार्यांस मिठी मारावयास धांवतो. ]

**आ**०—दूर ! आतां काय तुला बोलायचं ? तेव्हां द्रव्यलोभानं अंध झालास ! असो ! पण आतां–[ इतक्यांत वेडा लटपटभट धांवत निघून जातो व माधव प्रवेश करितो. ]

**माधव**— आचार्य, कोण हा वेडा ? रस्त्यावर एवढा कोलाहल कसला चालला आहे तें पाहयला आलों !

**आ**०—अरे, हा लटपटभट !

**माधव**—[पाहून] आँ! तो का हा ! अरेरे! अशांचा असाच परिणाम व्हायचा ! चला, आंत जाऊं !

**आ**०—याच्या संबंधानं कांहीं खटपट केली पाहिजे.

**मा**०—आचार्य, आपण आतां खटपट तरी कोणा-कोणाकारितां करणार ? धन्य आहे तुमच्या परिश्रमांची ! जाऊंद्या, त्या अधमाचं नांव नको !

**आ**०—असं पहा, शुद्धी असली तरच केल्या कर्माचा अनुताप होण्याचा संभव असतो. तेव्हां त्याला शुद्धीवर आणण्याचा यत्न करणं अवश्य !

**मा०**—ठीक आहे. वसंताकडून प्रयत्न करवून पाहूं. असल्या कामांत तो बराच प्रवीण झाला आहे.—या, इथेंच बसूं. रामा, [ पडद्यांत " जी " शब्द होतो. ] दोनखुर्च्या घेऊन ये. [ तो खुर्च्या घेऊन येतो. दोघे बसतात. ] जा रे, गोविंदाला म्हणावं, चहा घेऊन ये.

**आ०**—सुभद्रेची प्रकृती कशी आहे ?

**मा०**—चांगली सुधारत चालली आहे ! इतक्यांतच एवढा फरक पडेल असं मला वाटलं नव्हतं ! पण आपल्या मुळीचा गूणच कांहीं विलक्षण ! खरोखर सुभद्रेचा पुनर्जन्मच झाला ! [ इतक्यांत गोविंदा शागीर्द चहाचे पेले व खाण्याच्या दुसऱ्या कांहीं जिनसा पुढें ठेवून बाजूला मर्यादेनें उभा राहतो. ] घ्या. हें काय आहे आज !. हं ! [ आचार्यांस ] आपल्या आपासाहेबाकडून ही भेट आली आहे ! मस्कती फल फारच मधुर ! [ त्यांच्या पुढें ठेवितो. शागीर्द त्याच्या फोडी करितो. खाण्यास सुरवात होते. ]

**आ०**—वः! फारच रुचकर आहे ! पण काहो माधवराव, तुमचं हें चहाचं व्यसन अजून सुटत नाहीं ना ? या पेक्षां दुधाचं सेवन फारच हितकारी !

**मा०**—खरंच आचार्य, अजून सुटत नाहीं ! हा मुंबईचा सहवास !

**आ०**—त्या भागाला हें व्यसन फारच फैलावलं आहे ! मुंबईच्या आसपास लहान लहान खेड्यांतून सुद्धां कुणबीलोक साखर महाग म्हणून गुळाचाच चहा करतात ! तें तर फारच अहितकारी ! [ हंसत ] तुमच्या सहवासानं मला हें व्यसन जडतं कीं काय अशी धास्ती वाटूं लागली आहे !

**मा०**—छे !छे ! आपल्या सारख्यांना कसल्याच व्यसनाची धास्ती बाळगायला नको ! बरं पण आचार्य, ह्या वनस्पतीची आतां चोहोंकडे प्रसिद्धी केली पाहिजे! आणखीही आपल्याला ज्या माहीत असतील त्यांचीही झाली पाहिजे !

**आ०**—सर्वोत्तम ! आपल्या देशांत कांहीं कांहीं ठिकाणीं कित्येकांनां अपूर्व वनस्पती ठाऊक आहेत.—पण त्यांची प्रसिद्धी त्यांच्या हेकडपणामुळं उपलब्ध नाहीं ! प्रसिद्धी अवश्य असावी ! मानवी प्राण्याच्या सुखवृद्धिकडेच नेहमीं प्रवृत्ति पाहिजे !

**मा०**—बरं पण आतां पुढें कसं करायचं ? सुभद्रेची प्रकृति ठीक आहे खरी ! पण वसंत तर तिकडेच आहे !

**आ०**—अहाहा ! माधवा त्यावेळीं सुभद्रेची अत्यावस्था पाहून मी तर अगदींच निराश झालों ! लोकमत प्रचलित केलं त्याचं चीज होण्याची ही वेळ—आणखी प्रसंग पहावा तर हा भलताच ! उच्च कुळांतील एका पुढाऱ्याकडून पुनर्विवाह लावून समाजास वळण लावून द्यायचा माझा संकल्प अगदींच फुकट जाणार ! असे एक का दोन, अनेक विचार मनांत येऊन कांहीं सुचेनासं झालं! असो, प्रभूला काळजी!—विघ्न दूर झालं !

**मा०**—आचार्य, आपले लोकोत्तर परिश्रम, आमच्यावरील आपली प्रीति, लोकोपकाराची दीक्षा हें सर्व लक्षांत आलं म्हणजे आनंदाश्रूंचा पूर वाहूं लागतो ! ह्या उपकारांची आमच्याकडून फेड होणं अगदींच अशक्य !

**शा०**—आणखी फेड करून घेण्याची माझी इच्छाही नाहीं. अहो, आपण पामर किती यत्न करणार ! जगन्नियंत्याला अनन्य भावानं शरण गेलं म्हणजे तो कांहीं तरी युक्ति सुचवितो.

मा०—बरं, आतां पुढला योग कसा जुळवून आणायचा ?

आ०—त्या प्रदेशीं तुमचींही राहण्याचीं एकदोन स्थलें आहेतच. सुभद्रेला स्थलांतर करण्याकरतां तुम्हाला कुठें तरी पाठवायची आहेच.—तिकडेच पाठवा म्हणजे झालं. वसंताचं तिच्यावरील प्रेम आतां सुप्रसिद्ध झालंच आहे! तिचं त्याच्यावरचं प्रेम आजपर्यंत गुप्त होतं तेंही आतां तिनं कबूल केलं आहे. झालं—लोकमतही असल्या विवाहासंबंधानं अनुकूल असंच आहे. सर्व योग उत्तम जुळून आले आहेत! रेवातीरींच सुमुहूर्तावर मंगलविधि उरकूं म्हणजे झालं!

• मा०—ठीक आहे. पण मला तिकडे तिजबरोबर जायला व्हायचं नाहीं. हायकोर्टांत दोन तीन कज्जे फारच महत्वाचे असल्यामुळं मला वारंवार मुंबईस जाणं भाग आहे!—आपण श्रम घ्याल तर—नाहीं तर दिवाणजींना देऊं बरोबर.

आ०—मलाही आतां त्याच प्रदेशीं जायचं आहे. पण अजून थोडी अवधि आहे. कारण कारागृहांत जाऊन मंडळीला कांहीं पश्चात्ताप झाला आहे कीं नाहीं तें पाहयचं आहे. पश्चात्तापाशिवाय झालेली शिक्षा व्यर्थ!—कांहीं हरकत नाहीं. यंदा आवर्षण असल्यामुळें तिकडे फार दुर्भिक्ष आहे. दंगेधोपे मधून मधून होतात.—तरी फारसं भिण्याचं कारण नाहीं. बंदोबस्तानं गेलं म्हणजे झालं.—शिवाय वसंताचं वास्तव्य संनिध आहेच! ही मंडळी जाताहेत तों मी जाऊन पोहोंचतोच! पण तुम्ही बरोबर जाल तर बरं.

मा०—ठीक आहे. [ इतक्यांत टपालचा शिपाई पत्र टाकून जातो. ] आज बरंच टपाल आहे.—

आ०—कुठलीं आहेत ?

मा०—[ छाप वाचून एकेक पत्र वाचतो. ] हीं सर्व खटल्यांच्या कामांचीं हें–हो–श्रीमती अवलोकिताबाईचं.

आ०—हं ! मद्रपुरींतील सुप्रसिद्ध विदुषी ! आजन्म ब्रह्मचारिणी राहून देशसेवा करायची असा तिनं निश्चय केला आहे. असो, तोही एक मार्ग आहे ! बरं पण— माझ्या वसंताचं नाहींच का ? ऑं ! [ पाहून ] तें अक्षर त्याच्यासारखंच दिसतं !—

मा०—[ आनंदानें ] त्याचंच !

आ०—[ आनंदानं ] वाचा, वाचा—मोठी उत्कंठा लागली आहे !

मा०—[ वाचून ] विशेष कांहीं नाहीं. पण त्यांत एक वाक्य मोठं खुबीदार आहे.—‘ सुभद्रेच्या प्रकृतीला चांगला आराम पडला आहे ’ हें वाक्य केवळ माझ्या समाधानाकरतांच नसावं अशी जगन्नियंत्याला माझी सविनय प्रार्थना आहे.

आ०—त्याला तसं वाटणं हेंही साहजिकच आहे !

मा०—बरं आहे. वर जाऊन पुढले सर्व बेत ठरवूं.

आ०—चला तर ! [ जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ—तुरुंग.

आ०—[ प्रवेश करून ] ही भूमि इहलोकची यम-पुरीच ! कारागृह म्हणजे पातकाचं आगरच ! जीवन-

कलहाच्या दुष्परिणामाचा हा एक मासलाच आहे! [पाहून] हे सगळे बंदिवान् शृंखळांनीं जखडले असतांही आनंदीच दिसतात! छे! छे! शासनाचा मूळ उद्देश अशानं कसा सिद्धीस जावा! या पद्धतीनं शरीराला कांहीं त्रास होत असेल.–पण मनाला झाला तर खरा! पश्चात्ताप हेंच खरं शासन! पश्चात्ताप करविणं हीच खरी शासन-पद्धति! नियमसूत्रकारांनीं नेहमीं लक्षांत ठेवलं पाहिजे तें हेंच!

पद्य—राग—झिंजोटी,

**शक्य नुरो पाप भावी नियमांचें तत्व तें ॥**
**मितकारें भ्रूणहत्या कशि नाशा पावते ॥**
**लौकिक हा बंधनाचा वाढवितो पाप तें ॥**
**आकळिती जनसमाजा नीतीचे बंध ते ॥ १ ॥**

आमच्या समाजाची स्थिति कांहीं चमत्कारिकच झाली आहे! समाजसूत्रांचं आकलन एकाकडे आणखी नियम-सूत्रांचं भलत्याचकडे! असो, ज्या कार्याला आलों तें अगोदर उरकलं पाहिजे. [अक्कडरावाजवळ जाऊन] हा परिणाम कशाचा?

**अक्क०**—आपल्या उपदेशाकडे त्यावेळीं दुर्लक्ष केलं त्याचा! [लज्जायुक्त] मला मोठा पश्चात्ताप झाला आहे!–पण आतां काय उपयोग? आचार्य, आपल्या पवित्र दर्शनानं मी पावन झालों! माझ्यावर अनुग्रह करावा.

**आ०**—अरे, खरोखरीच तुला पश्चात्ताप झाला असेल तर तूं शृंखलानिगडित असूनही मुक्तच आहेस. हा मित कारावास संपल्यावर तुझी जीवनवृत्ति कोणत्या प्रकारची असणार?

**अक्रू०**—आतां आपण सांगाल त्याच मार्गानं जायचं असा पुरा निश्चय झाला आहे.

**आ०**—तुझा मित्र गोविंदराव—त्यालाही असाच पश्चात्ताप झाला आहे. ठीक आहे. [ नापिकाकडे वळून ] अरे नापिका, आपला निरुपद्रवी धंदा सोडून असला नीच धंदा पतकरण्यास कां प्रवृत्त झालास ?

**नापिक**—खरं सांगतों म्हाराज, माजी संमदी गिराइकी काय ती तसल्या—

**आ०**—बरं, समजलों. पुढें ?

**नापिक**—काय सांगूं म्हाराज ! आपन बामन ! बामन जातीची निंदा करूं नये.—लई पाप ! पन इचारतां म्हून खरं सांगावं लागतया.

**आ०**—अरे जी गोष्ट सत्य आहे ती झांकून थोडीच राहते !

**ना०**—ती पल्याड बसली हाये न्हव का. ती बगा लइ वस्ताद ! तिनं मला मदाच बोट लावलं अन् मगशी मलाबी पाना फुटून या ओखदाच्या धंद्यामधीं पल्डो बगा. मंग काय इचारतां ! माझ्या घरीं अक्षी झिम्मड उडून ग्येली. रुपयावर रुपया ठणकूं लागला. अक्षी चैन झाली. आम्हा अडान्यास्नी काय त्येोच धंदा ब्येस वाटूं लागला. आतां रडूनशानी काय व्हतं ! द्येव म्हंगाला भोग त्येका कर्माचा फळ !

**आ०**—मग शिक्षा पुरी झाल्यावर पुन्हां तूं आपला धंदा सुरू ठेवणार तर !

**ना०**—नांव कशाला म्हाराज ! आता तर अक्षी निश्चो क्येला हाये कीं मदोबिगर आतां धंदाच करायचा नाहीं. पैस कमी मिळल तरिबी ब्येहत्तर !

**आ०**—हा निश्चय कांहीं शवगा नाहीं. सर्वोत्कृष्ट ! दुसरं असं पहा, गर्भपातासारखं भयंकर पातकच नाहीं ! बाबांनो, सर्व प्राण्यांत मानवी प्राणी श्रेष्ठ ! हा देह देवानं आपल्याला असलीं पातकं करायला का दिला आहे ! अरे, पैशाला काय घेऊन चाटायचं आहे! द्रव्यलोभ फार वाईट! लटपट भटाची काय दशा झाली आहे तें आहे ना ठाऊक ?

**अक्क**—खरं आहे महाराज!

**आ०**—आपला जो धंदा असेल तो प्रामाणिकपणानं करावा. त्यांतच आपल्याला ईश्वर यश देतो. कोणाचा घातपात इच्छूं नये. निढळच्या घामानं मिळविलेल्या भाकरीवर आपला आत्मा शांत करणारा व सदाचरणी असा प्राणी दरिद्री असला तरी तो राजापेक्षांही श्रेष्ठ आहे! बाबांनो, मनाचा थोरपणा पाहिजे ! द्रव्याचा थोरपणा काय कामाचा ? [ नापिकास ] फार लांब कशाला—तूं न्हावी आहेस ना ? तूं आपलं आचरण शुद्ध ठेव, प्रामाणिकपणानं वाग, ईश्वराच्या ठिकाणीं पूज्य भावना असूं दे, म्हणजे तूं झालास थोर ! मग आम्हालाच तुला नमलं पाहिजे. [ नापिक व अक्कडराव आचार्यचरणीं लीन होतात. ] उठा ! उठा ! अरे जातीवर काय आहे? प्रभूच्या न्यायमंदिरांत सर्व प्राणी सारखेच ! ज्याचं मन मोठं तोच मोठा ! मनाची शुद्धि हीच खरी पवित्रता ! हें नेहमीं लक्षांत ठेवा म्हणजे तुमचं कल्याण होईल !

**ना०**—ध्येतं म्होरलं ! पन झाल्या पापाबद्दल काइबि त्रिलाज सांगा कि म्हाराज.

**आ०**—अरे, कांहीं तरी प्रायश्चित्त सांगून दक्षिणा उपटणारा मी भिक्षुक नव्हे !

**अक०**—तसं नाहीं. पण—

**आ०**—ऐका. बंदींत असलांत म्हणून काय झालं ! सदोदित प्रभूचं चिंतन करीत जा. अनुताप हेंच खरं प्रायश्चित्त ! अरे, आपण सद्भावानं प्रभूला शरण गेलों म्हणजे त्या दयाघनाला करुणा आलीच ! जा. तूर्त हेंच. तुमचं कल्याण असो. [ दोघेजण आचार्यांस वंदन करून जातात. ] आतां त्या दुर्दैवी स्त्रीकडे जावं. [ गांवकाकू जात्याजवळ येऊन बसते. एक शिपाई तिच्यापुढें दाणे ठेवून व लवकर दळण्यास खूण करून निघून जातो. गांवकाकू दीर्घश्वास सोडून व कपाळावर हात मारून दळूं लागते. ]

[ पाहून ] शिव ! शिव ! अशी स्थिति पाहून ज्याचं अंतःकरण द्रवत नाहीं तो मनुष्यच नव्हे ! भरतखंडाच्या प्राचीन आणि अर्वाचीन समाजस्थितींत हें किती महत् अंतर !

**दिंडी.**

**स्त्रिया भोगिति कारांत निवासातें ॥**
**रूढिवशतेचें चित्र पूर्ण होतें ॥**
**आर्यवनितामान्यता नष्ट झाली ॥**
**आर्यभूतें ही दशा कशी आली ॥ १ ॥**

[ तिच्या जवळ जाऊन ] हे हतभागिनी स्त्रिये, मला तूं ओळखलंस का ?

**गांवकाकू०**—मी सगळ्यांना ओळखून आहे ! आपलं काय म्हणणं आहे ?

**आ०**—[ स्वगत ] हा कांहीं निराळाच रंग दिसतो! बरं, असो. [ उघड ] ही स्थिति तुला सुखाची वाटते का !

**गां०**—अगदीं सुखाची , बरं ! इथें पोटाला तरी मिळतं आहे ! कसं का असेना ?–पण मिळतं आहे ! इथून सुटल्यावर त्याची व्यवस्था काय करायची हीच मला आतां काळजी पडली आहे.

**आ०**—बंदमुक्त झाल्यावर पुन्हा पहिलाच क्रम सुरू ठेवणार तर !

**गां०**—ठेवलाच पाहिजे ! सुखानं का ठेवायचा? करायचं कसं ? एकदां घसरलें–पण पुन्हा नाहीं हो फसायची ! तुमच्या डोळ्यांत चांगली धूळ टाकीन ! करायचं काय ? ही पोटाची बखळ भरली पाहिजे ना ? उपदेश करायला काय होतं ? समाज समाज म्हणून नेहमीं ओरडतां–पण त्या समाजानं माझ्यासारख्या अनाथ विधवांच्या पोटापाण्याची कांहीं व्यवस्था केली आहे का ?

**आ०**—पोट भरण्याला निरूपद्रवी असा मार्गच का नाहीं ?

**गां०**—समजलें ! येऊन जाऊन पोळपाट लाटणं हातीं घ्यायला तुम्ही मला सांगणार ना ? उपदेश करणं सोपं ! 'जावे त्याच्या वंशा तेव्हां कळे.' अहाहा ! काय तुमच्या चाली ! काय तुमचा न्याय ! देवा, आम्हा बायकांनां जन्माला तरी कशाला घालतोस ! बरं ! नशीबीं आलेलं भोगायला हवं ! [ दळूं लागते. ]

**आ०**—[ स्वगत ] ही म्हणते असा प्रकार आहे खराच ! सर्वस्वी निराधार ! पण—दुराचरण हिच्या अंगीं अगदीं खिळलेलं दिसतं ! हिला केलेल्या कुकर्मांचा अनुताप व्हावा तसा अजून झालेला दिसत नाहीं ! ह्याचं कारण तरी रूढिवशताच ! असो, पुन्हा एकदां प्रयत्न करून पाहूं. आतां कुठें जावं बरं ? हो, असंच !—

साकी.

प्रयाण करुनी रेवातीरीं प्रणयकलहनवलातें ॥
अवलोकोनी वधूवरांच्या साधावें कार्यातें ॥
प्रगतीची करणी ॥ होवो सुखकर अनुकरणी ॥१॥

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—अरण्य.

[ प्रवासी वेषानं वसंत प्रवेश करितो. ]

**वसंत**—अहाहा ! प्रभातकाल रमणीय तर खराच ! ह्या नटलेल्या सृष्टिसुंदरीला पाहून मला माझ्या सुंदरीची आठवण होते! उषःकालीं निरोगी मनुष्याची मुद्रा सहजच प्रसन्न असते ! माझा हृद्रोग आतां नष्ट झाल्यामुळें माझंही मन यावेळीं प्रसन्नच आहे ! [ आनंदानें ] सुभद्रेला ह्या रेवातटाकीं पाठविण्याची योजना आचार्यांचीच असावी ! त्या महाभागाचा मनोदय पूर्ण होवो ! सुभद्रेच्या समागमसुखाविषयीं माझं मन किती आतुर झालं आहे ! प्रेमाचा प्रभावच तसा आहे !

पद्य—चाल—पुष्पपराग.

**प्रेमरसायन एक मला प्रिय, इतरीं मन भाव न आदरी ॥ हेंचि एकटें संसाराची, क्षम करूं यात्रा साजिरी ॥ध्रु०॥ विरहनिराशाप्रभृति-कटूद्रव हेंचि सुधोपम. भूवरी ॥ १ ॥ कोण जगातें या समर्थ आहे, वर्णू याची माधुरी ॥ २ ॥**

पृथ्वीला स्वर्गाची उपमा कशानं येते ? प्रेमानं ! प्रेम प्रेमळ आहे ! मोहनी आहे ! एक का दोन ? प्रेम म्हणतात

तें हें असं दाखवितांच येत नाहीं! ही मध आणखी ही मधाची गोडी अशीं दोन्ही व्यक्त करून दाखवितां येतील का? [विचार करून] भाषालंकारांत जशी स्वभावोक्ति तशीच ती सृष्टीच्या अलंकारांत म्हणजे स्त्रीजनांत शोभते! माझ्या प्रियेकडे अवलोकन केलं पुरे कीं हृदयांत निर्मल प्रेम, अव्याहत औदार्य अशा अनेक विकारांचा पूर यायचाच ! अहाहा !

पद्य—चाल—रामको अधार.

**प्रेम मूर्तिमंत गमे प्राणवल्लभा मला ॥ ध्रु० ॥**
**स्मरणमननदर्शनादिभावगम्यनिर्मला ॥**
**विधुवदना उभवि मनीं प्रेमसागरोर्मिला ॥ १ ॥**
**श्वसितहसितचलनवलनकांतरूप पावला ॥**
**प्रत्यवयविं गमत इच्या प्रेमभाव बिंबला ॥ २ ॥**

[ शिळा ऐकूं येतात. ]

**वसंत**—[ साशंक ] कांहीं तरी दगा आहे ! [ शस्त्रे सावरून ] विश्वास,—

**विश्वास**—[ प्रवेश करून ] म्हाराज,—

**व०**—कायरे ह्या शिळा कसल्या होत आहेत ! भिल्लांच्या तर नव्हेत ना ?

[ पुन्हा शिळा ऐकूं येतात. ]

**वि०**—म्हाराज, खास त्येंच्याच ! ही एकमेकांना पहिली इसारत झालिया ! आंखी अर्ध्या तासानं कुठं तरी हल्ला व्हनार ! ह्या जंगलांतली ही जागा लई बिकट हये. आतां हितनं जरा हुशारीनंच चाललं पाहिजे.

**व०**—ॐ: ! त्यांत काय आहे ? असल्या प्रसंगाची तर मला मोठी हौस ! मागली बाजू संभाळ म्हणजे झालं.

बरं, माधवाचा तळ पडला आहे ती जागा इथून किती बरं लांब असावी!

वि०—लांब कुठली सर्कार! ती पल्याड झाडी दिसती नव्ह का तिच्या म्होर वाइच ग्येल की आलीच नगा.

व०—बरं, आपले पाहरेवाले शिपाई बंदोबस्ताकरितां बसविले आहेत ते त्या गर्द झाडीच्या पलीकडेच नाहीं का!

वि०—जी व्हय. आतां कुट बि थांबतां कामा न्हाइ. बिगीनच ग्येल पाहिजे.

व०—चला. आमच्याकडून तयारीच आहे! हें स्थल रमणीय दिसलं म्हणून थोडावेळ इथें उभा राहिलों! चार तास एकसारखी चाल झाल्यामुळें आपल्या बत्ताशालाही क्षणभर विसावा मिळाला. आतां त्याला सोडून पुढें आण. [ विश्वास जातो. ] [ घोड्याचें खेंकाळणें ऐकून ] अरे वा! हाही तयारच आहे! [ दोन पावलें चालून. ]

पद्य—चाल—स्वातिची०

**विधिराया सुभग तव लीला किति तरी ॥ध्रु०॥**
**अरक्तपातें अरातिवारण, वीरश्रीचें सौम्य निदर्शन, प्रियजनकोमलहृदयोल्लासन, साधूं साह्य करीं ॥**

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—विश्रामबागेच्या आसमंतांतील प्रदेश.

**आ०**—[प्रवेश करून] हा मार्ग कुठं जातो? नाहीं—पण त्याच दिशेनं जावं! आतां पूर्वेलाच वळलं पाहिजे. इथून माधवाचा मुक्काम जवळच असावा! आमचा अनमास

चुकायचा नाहीं ! यंदा अवर्षणामुळं या प्रांताची काय दुर्दशा झाली आहे ! सर्वत्र दरवडयाच्या हुली ऐकूं येतच आहेत ! काय करावं ! माधवरावाला या देशीं येण्याचं सुचविलं खरं ! पण असं कांहीं संकट त्याजवर न येवो म्हणजे झालं ! असो, हा आसमंतात् भाग वसंताच्या जहागिरी मुलखाचाच आहे तेव्हां फारशी धास्ती नको ! पण न जाणो, काय प्रसंग येईल हें कुणी सांगावं ! [ कांहीं पावलें चालून ] अरे ! नदीतटाकीं हा सुंदर बगीचा कुणाचा बरं ? [ पाहून ] बरं, हा कोण ? खास-वसंताचा विश्वासच ! अरे वा ! मी अगदीं मुक्कामाजवळ ठेपलों तर ! बरं, हा आपल्याशींच कांहीं गुणगुणत आहे. तेव्हां जरा आड व्हावं !

त्रि०—[ प्रवेश करून ]

लावणी.

भरमदेवॉचं काम येकवार जलम घेयाचं ।
घेतो परानी जलम त्येचा शेर न्येमॉयचं ॥
म्हॉर जलंभर 'चीभन अक्शी काळ्जि परा-
न्याची । करूनशेनी कोरडचॉस भाकूरी त्येस्नी
घेन्याची ॥ रातूदी पंचाइत करनं तरकिब्
इश्नूची । सगून अव्तार घेतो इश्नू रूप
धन्याचं ॥ धनी त्योच येॉक देव समजनं.
त्येंची चाकुरीं करनं । इमान राखूनशेनी
त्येच्या पायीं जिव् वाहूनं ॥ हर्दिन् त्येस्नी
जपनं सवरनं लइ खुस् मोजीनं । ह्योच चाकु-
रॉचा धरम् त्येमंदी सार्थक जल्माचं ॥

बानं सांगितल्या परमानं यजमानाची नौकरी अशी काल बजावली !

**आ०**—[ स्वगत ] याच्या बोलण्यावरून माधवावर कांहीं तरी संकट आलं होतं हें खास ! आतां विचारलंच पाहिजे. [ उघड ] विश्वास,—

**वि०**—[ लवून मुजरा करून ] म्हाराज,—

**आ०**—अरे, माधवरावाचा विश्रामबाग अजून किती लांब आहे ?

**वि०**—अन् ह्योच कि म्हाराज.

**आ०**—हाच का ! बरं, वसंत येऊन त्यांना मिळाला वाटतं ?

**वि०**—जी व्हय ! काल पहाटसच ! पण—अक्शी येळेवर ! एक घटका का उशीर व्हता तर कहारच झाला असता बगा !

**आ०**—तो कोणता बाबा ?

**वि०**—काय सांगावं म्हाराज ! दरवडखोर बागला येढून टाकताहेत इक्त्यामंदी येजमानांची सवारी येऊन थडाकली ! मारे--आरडाओरड चाललीया. पहारवाल्यांची आनखी चोरट्यांची आतां झटपट व्हनार इक्त्यांत म्हाराजांच्या परवानगीची वाट बि पाह्यली न्हाई; अन काम-गिरीची अक्षी वेळ हीच असं पाहूनशेनी येक म्होटी आरोळी दिलीन् इचारता काय ? चित्त्यासारखा गर्दीत घुसलों म्हन—पन लक्ष अक्शी ठिवलं बगा यजमानांच्या हालचालीवर—

**आ०**—शाबास ! पण मला अगोदर एवढं सांग सर्व सुखरूप आहेत ना ?

**वि०**—आपल्या कुर्पनं सगळं सुखरूप हायती.

[ आचार्यास ] बागत चलावं म्हाराज. तिथं आपल्याला समदं समजल. कालच्यापून समदी मानसं आपली फार आठवन काढीत हयेति. आपण अजून आला न्हाई म्हनून शानी समद्यांना लई काळजी लागली हाये.

**आ०**—अरे, आमची नको काळजी. आमच्या सारख्या विरक्त अवधूतांनां दरवड्याची अगर दुसरी कसली भीति नाहीं. चल, चल, त्यांना केव्हां पाहीन असं झालं आहे. [ जातात. ]

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—रैवतटाकावरील माधवाचा विश्रामबाग.

[ सुभद्रा पत्र वाचीत बसली आहे ]

**सुभद्रा**—

पद्य—चाल—तुजविण मी०

**शांतिरसैकनिवास, सखये, गुणनिचये, सदये, दे दर्शन शुभ निज ॥ ध्रु० ॥ होती निराशा मनिं, परि मम सुकृतें, होय नष्ट ते, फिरुनि उभवते अंतरिं आस । तुझा मुखेंदू कधीं विलोकूं, जडे मना हा ध्यास, तृषितें, नयने, तुजला, बघण्या, विरही ॥ १ ॥ छायाग्रहानें तुज, खचित गिळियलें, चित्तिं भासलें, तिमिर उरविलें या जीवास, । दया प्रभूची म्हणूनि चांद्री कळा पवे मोक्षास, निववीं सुखवी रिझवीं नयना मम या ॥ २ ॥**

मला बाई हें पत्र पुन्हा पुन्हा वाचावंसं वाटतं ! काय हें प्रेम ! [ पत्र वाचते इतक्यांत मनोरमा प्रवेश करिते. ]

अनुक्रम
विभाग
क्रमांक

**आ०**—झालं ! आतां सांग सगळं !

**वि०**—म्हाराज, त्यावेळची आमच्या यजमानांची मुद्रा अक्शी पघन्यासारखी व्हती ! इक्तं रागावलेलं असं मी त्येनां कालच पगितलं वगा !

**आ०**—हं ! पिढीजाद क्षात्रतेज चमकूं लागलं वाटतं !

**वि०**—म्हाराज, पुरंच चमकलं असतं—पन आम्हाला भिल्लांनीं तव्हाच वळाखलं ! मग काय—म्हाराजांना पाहिल्याबरोबर—समदे त्यांचेच खेडू ! लगे समदे हात जोडूनशेनी उभं राहिलं.—पोटापायीं ह्या धंद्यांत पल्डों.—दया करा, दया करा म्हनून गयावया करूं लागलं.

**आ०**—बरं मग,—

**व०**—मग काय ! म्हाराज जिक्त शूर तिक्तच दयाळू ! समद्यांना सोडून दिलं झालं—इक्तंसुद्धां रगत पडन्याचं कारन उरलं न्हाई !

**आ०**—वाहवा ! मोठ्याच आनंदाची गोष्ट ! अरे हा काल शब्दानंच काम करून घेण्याचा आहे ! रक्तपाताचा काल केव्हांच निघून गेला. माझ्या उदार वसंतानं आपल्या खेडूंची व्यवस्था चांगलीच लावली असेल !

**वि०**—जी व्हय. सारं दान माफ केलं. गुरं चारण्याकरितां समदं जंगल म्हाराजांनीं खुलं करन्याची परवानगी दिली. गोरगरिबांनांबी मायंदाळ दान दिलं.

**आ०**—अहाहा ! माझ्या उपदेशाप्रमाणं माझ्या प्रिय वसंताचं वर्तन ऐकून मला किती आनंद होत आहे !

**वि०**—ह्ये चाललया इक्त्यामंदी पोलीससुपरींटंड साबांची सवारी येऊन थडकली· त्या साहेबांचा आनखी येजमानाचा लई भलेपना. मग काय लई मौजच झाली. [ पडद्यांतून कोणी हाक मारतें त्यास ] आलों, आलों.

**मनोरमा**—[ स्वगत ]

पद्य—चाल—ज्यावरि मी०

**मातापितरें स्वीय मनानें, दांपत्याच्या करिति योजने । अभिमानें वा धनलोभानें, नेणाति फळ भावी ॥ ध्रु० ॥ विवाह आधीं मग सहवासें, प्रीती येइल मानिति ऐसें । दुष्परिणाति परि शतशां भासें, या ऐशा कृतिची ॥ १ ॥ एकीमेकीं परस्परांतें पूर्वी जाणुनि, दांपत्यातें । करितां, सुख परिणामीं होते संगति उभयांची ॥२॥**

[ उघड ] का वन्सं, कुणाचं तें पत्र ? वसंत भाऊजींचं का ? अगबाई ! आतां बागेंतल्या बागेंत पत्रव्यवहार होऊं लागले वाटतं !

**सुभद्रा०**—वहिनी, अगोदर नीट पहा आणखी मग चालूं दे तुझं तर्कशास्त्र.

**म०**—[ पाहून ] हें भाऊजींचं जुनं पत्र ! पण वन्सं, ह्याच्या आवृत्त्या तरी किती करायच्या ?

**सु०**—थोड्या तरी आवृत्त्या करण्यासारखं आहे एवढं निष्पन्न झालं म्हणायचं !

**म०**—[ बसून ] बरं पण वन्सं, शेवटीं तुम्ही विकारवश झालां ना? तुमचा तो ठराविक हट्ट चट् गेला ना ?

**सु०**—वहिनी, मी समजलें. तूं हें मुद्दाम विचारित आहेस. माझ्या हट्टाचा मूळ हेतू थोडा तरी साध्य झाला नाहीं का ? आचार्यांच्या वादविवादानं, दादाच्या आणखी—[ लाजते. ]

**म०**—आतां इतकं कांहीं लाजायला नको. आणखी भाऊजींच्या काय ?

**सु०**—लाजण्याबद्दल नाहीं ग.–पण तूं म्हणशील एव्हांपासूनच लागली आपली स्तुति करायला. हें बघ सगळ्यांच्या खटपटीनं लोकमत निदान बालविधवांच्या पुनर्विवाहाला अनुकूल असंच नाहीं का झालं? अग ज्या लोकांत आपल्याला वागायचं त्यांनीं मग माझ्याकडे पाहून नाकं मुरडूं नयेत.

**म०**—वन्सं, मी आपली उगीच थट्टेनं बोललें. हो! एक सांगायचं राहिलंच!

**सु०**—[ उत्कंठेनें ] काय बाई?

**म०**—आचार्यांची स्वारी आतांच आली आहे. [ सुभद्रेची मुद्रा आनंदित होते. ] असे सगळे योग जुळवून आणिले तरी जुळायचे नाहींत. खरंच, वन्सं, काल सकाळपासून ज्या ज्या गोष्टी घडून येत आहेत त्या तुमच्या आयुष्यांत सदैव संस्मरणीय अशाच राहतील नाहीं?

**सु०**—यांत काय संशय? सुखं काय आणखी दुःखं काय एकदां येऊं लागलीं म्हणजे एकसारखीं लागोपाठ येतात असं म्हणतात किनई त्याचा अनुभव आला बाई!

**म०**—खरंच वन्सं, या सगळ्याचा गोड शेवट आतां लवकरच व्हायचा आहे

**सु०**—ता कोणचा बाई!

**म०**—जसं कांहीं खरच समजलं नाहीं! पण वन्सं, माझ्या पुन्हा पुन्हा असं मनांत येतं कीं, तुम्ही आपलं वळण घालून देऊन तो कित्ता इतरांना गिरवायला लावून आम्हांला केव्हांच सुखी करायला हवं होतं!

**सु०**—वहिनी, असल्या गोष्टी घाईनं होत नाहींत! दुसरं असं, पुष्कळ आयास सोसून जें सुख मिळतं तेंच खरं यशस्वी! आणखी असं, प्रेमाच्या कसोटीला जें

वररत्न उतरलं तेंच खरं रत्न! रत्नपारख्याचं काम थोडसं यायलाच हवं! प्रेमाची कसोटी लावलीच पाहिजे! असं नाहीं का?

**म०**—[ हंसून ] तस्संच! तें पहा—कसोटीला पुरं उतरलेलं रत्न इकडेच चमकत येत आहे! संभाळा बरं, नाहीं तर डोळे दिपतील!

**सु०**—[ साश्चर्य ] म्हणजे कुणी आलं कीं काय?

**म०**—हो! भाऊजीच इकडे येत आहेत! [ पडद्याकडे पाहून ] अगबाई, कुमार कशाला मला हाका मारीत आहे? वन्सं आलेंच बरं का? [ जावयास निघते. ]

**सु०**—अग, तो येईल इकडे. जायला नको कांहीं. [ लाजून ] मी एकटीच काय बोलूं?

**म०**—अगबाई! हीं सगळीं सोंगं मला समजतात हो! आणखी त्यांतून मी लवकरच येतें! [ जातां जातां ] मला तर लवकरच आलं पाहिजे! कारण माझंच इथें मुख्य काम आहे! [ जाते व वसंत प्रवेश करितो. ]

**वसंत**—[ स्वगत ] ह्या चारुगात्रीचा हा वक्र दृष्टिपात कुणाचं काळीज हिरावून नेणार नाहीं? असल्या सप्रेम नेत्रकटाक्षांचा ज्यांच्यावर वर्षाव होतो ते धन्य!

पद्य—चाल—तेवि पुरुष०

**धन्य खचित मी लोकीं ॥ सचकित या अवलोकीं ॥ ध्रु० ॥ विपिनचरणकामुकी कुरंगी॥ वाहे कातरता निज अंगीं॥ निरीक्षिते मज चलितापांगी ॥ परि मज रमवी कीं ॥ १ ॥ रजत रज्जुगण नेत्रांनीं ॥ निघुनी मजला परिवेष्टूनी ॥ सुंदरिसंन्निध नेइ ओढुनी ॥ अवश करुनि टाकी ॥ २ ॥**

माझ्या प्रियेच्या संचारानं हें उपवन भूलोकीचं नंदनवनच भासत आहे! [ जवळ जाऊन ] सुभद्रे, हे दिवस तुला मोठ्या बहारीचे वाटत असतील नाही बरं?

**सु०**—[ हंसत ] हो! वसंताचा उदय झाल्यामुळें सृष्टिरमणी प्रफुल्लित झाली आहे खरीच! मला एक विचारावंसं वाटतं! [ लज्जायुक्त ] पण विचारूं का?

**व०**—हो, हो! खुशाल विचार.

**सु०**—माझ्या जीविताची निराशा झाली त्या वेळीं वहिनीबरोबर पाठविलेल्या निरोपाबद्दल आपल्याला काय वाटलं? तसंच माझ्या प्रकृतीची सुवार्ता कळेपर्यंत त्या निरोपाचा काय विचार झाला?

**व०**—मला काय वाटलं तें निवेदन करायला माझी वाणी असमर्थ आहे! सुभद्रे, काय सांगूं!

**साकी.**

**नष्टाशेच्या प्रथमाघातें देहबंध जणु तुटले ॥**
**प्रबल गाढतम तमीं कलेवर जाउनि पडतें गमलें॥**
**अधिक न आठवतें ॥ स्मरणीं मूढचि मन होतें॥**

तुझ्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर हेंच!

पद्य—चाल—सुलभ न जें०

**करुण तुझें वाक्य परिसोनी ॥ द्विविध मूढ हो मम मन भांबावोनी ॥ ध्रु० ॥ आत्मवधाची त्यजुनि कल्पना ॥ तव आज्ञेतें द्यावें माना ॥ क्षणभरि मी मनिं आणीं ॥ १ ॥ पुनरपि वाटे प्रेमशून्य मन ॥ असतां कैचें विवाहबंधन ॥ अधमपणें फसवोनी । स्त्रियांना ।२।**

**सु०**—[ आनंदानें ] एकून प्रेमबंधनाची अगदीं निर्गांठ पडली आहे वाटतं!

**व०**—यांत काय संशय? ती तोडायला समर्थ असा एक कृतांतच!

**सु०**—मला वाटतं आपण याचा पुन्हा एकदां नीट विचार करावा. कारण, लोकमत जरी अनुकूल आहे तरी ह्या करणीनं बरोबरीच्या सरदारवर्गाकडून आपला घडो-घडीं अपमान होईल! या हतभागिनीकरितां आपला असा अपमान होणं हें मनांत आलं म्हणजे फार वाईट वाटतं. [ गहिंवरते. ]

**व०**—प्रिये सुभद्रे,

पद्य—राग देस, ताल त्रिवट.

**नयनजलधारा ही, मंगलसमयिं अजि, गे,**
**खरतम अशनीचा, मजवरि करि मारा ॥ध्रु०॥**
**भीतिस लव निज मनांत सखि देईं न थारा,**
**पुसें अश्रु तव लोचनांतरीं प्रियतम तुजसम**
**मज न इतर तूंचि होशी जीव मम सारा गे ॥१॥**
**निंदु सकलहि मम थोर गणगोतपसारा,**
**व्रती आजवरि एकनिश्चयें वसुनि सततं मनिं**
**तुजसि धरित नेई मज सुखनिधिपारा गे ॥२॥**

**सु०**—अहाहा! काय हें प्रेम! अजूनही तसंच अखंड आहे! ह्या प्रेमाची मी कशी उतराई होईन!

**व०**—तें तूं जाणून आहेस!–पण अजून कांहीं शंका आहेत का? झाली का संशयनिवृत्ति?

**सु०**—अजूनही झाली नाहीं तर कृतघ्नच म्हणाय-ची! हा देह या चरणीं केव्हांच अर्पण केला आहे. [लज्जेनें] जनरीतीप्रमाणं स्वीकार करणं आपल्याकडे आहे.

**व०**—अहाहा! धन्य आहे मी! सुभद्रे, या प्रदोषसमयीं तूं सौभाग्यालंकार स्वीकारावास असा माझा हेतू आहे!

म०—[ एकदम प्रवेश करून ] मी अगदीं वेळेवरच आलें म्हणायचीं! [ सुभद्रा लाजून जरा दूर उभी राहते. ] वत्सं, इतकं लाजायला नको! हा चंद्रमा आणखी ही रोहिणी कशीं बरं उभीं आहेत ?

सु०—वहिनी, आतां तुझ्या थट्टेला ऊतच येईल!

व०—[ आनंदानें ] आचार्यही इकडेच येत आहेत.

[ आचार्य, माधव व कुमार प्रवेश करितात. ]

म०—[ आचार्यांस उद्देशून ] आपण येण्याचीच वाट पहात होतें. [ कुंकवाचा करंडा उघडून ] वत्सं,

पद्य—चाल—अंकित पदांबुजाची.

कुंकुमटिळा धरा हा भाळीं ॥ सुखद हो
तुम्हां चिरकाळिं ॥ ध्रु० ॥ नासा भूषण चिर
अंतरलें ॥ गलमंगल चिर वियुक्त झालें ॥
उभयाहि सेवा तुम्हि या वेळे ॥ ईशकृपेनें
लाधलीं ॥ हो ॥

आ०—वसंता, रूढीला निःसत्व करून निश्चयपूर्वक सामाजिक हित साधलंस ! कृतार्थ झालास !

पद्य—राग भैरवी.

समाज रूढिशृंखलानिबद्ध जाहला अती ॥
विपाक घोर होति त्यांपरी न लोक मानिती ॥
तमोमयीं तदंतरीं सुधारणारविद्युती ॥
शिरावयास हेतुभूत होउ-ही तुझी कृती ॥

व०—हें सर्व आपल्या उपदेशाचं आणखी अश्रांत परिश्रमाचं फल !

मा० —

पद्य—चाल—तुम्हि प्राणाहुनि मला, बावा०

किति वानूं धन्यता ॥ मित्रा ॥ भगिनी-
कर हा अर्पित मी तुज, होईं आदरिता ॥

आ०—अभिनंदुनि तुज अतिहर्षानें, धन्य
होउ जग तव अनुकृतिनें,

व०—भवदाशिर्वच मज बहु मानें, प्रसाद
घेतों भवदुपकृतिचा ॥ हा सर्वथा ॥ प्राण-
मयी देवता, कांता, मित्रप्रेमसुधामय मूर्ती,
मनिं चिर अभिलषिता ॥

मा०—किति वानूं धन्यता ॥

कु०—[ सुभद्रेजवळ जाऊन ] आत्या, ए आत्या तुला मी आतां आत्या म्हणूं का काकू म्हणूं?

सु०—[ कौतुकानें ] दोन्ही म्हण बरं बाळा !

आ०—वसंता, आतां मी लवकरच गुर्वाश्रमीं योगसाधनार्थ जाणार आहें. लोकमत प्रगतीकडे बरंच प्रचलित झालं आहे ! गुर्वाज्ञेप्रमाणं माझं कार्य झालं ! आतां जगच्चालकानं तुमचं आणखी कोणतं इष्ट करावं ?

वसंत—प्रस्तुत असं होवो !—

पद्य—राग, भैरवी—ताल, त्रिवट.

स्पष्ट अनर्थ टळावे ॥ उपाय लोकां त्वरित
कळावे ॥ ध्रु० ॥ अल्प शिशूंची विवाहरीती ॥
जरठां अर्पण करणें युवती ॥ कन्याविक्रय
धनलोभांतीं ॥ दुष्परिणातिकर हें उमजावें ॥१॥
अनघवयाच्या कोमल बाला ॥ विपतिकतेच्या

विपत्तिजाला ॥ त्विर वश होणें या अन-
याला ॥ बुधजनिं सत्वर दूर करावें ॥ २ ॥
आ०—तथास्तु !

[ पडदा पडतो. ]

---

## ईशप्रार्थना.

पद्य—राग, भैरवी—ताल, त्रिवट.

इतरमतिवशता मन नाचि धरो, स्ववश तें
मूढरूढिनिबिडनिगड विसरो, जनहृदयीं
नयधी पसरो, दुरित सरो, चिर सुखकर
विहित महित चरित जन सदा वरो ॥ ध्रु० ॥
प्रभुवर तुज वर असा वरों, विकसलिया
नरहृदयामधिं अवला महिलांविषयीं चिरही
करुणाधिषणा विचरो, निजसमपणाहि अन-
सूय, सतत तयां वितरुनियां, जन सर्व सुवि-
व सदा प्रगतिस पत्नु, नाचि फिरो ॥ १ ॥

समाप्त.

ग्रंथालय शाखा
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# परिशिष्ट.

खालीं लिहिलेल्या पद्यांचा योग्य स्थळीं उपयोग केला असतां चालेल.

## अंक ३ रा.

वसंत — [ पद्यार्थाचें भाषण आहे तेथें ]

तरणा. राग, गारा. ताल, त्रिवट.

विधि मला गमत किति तरि सुचतुर । निपजवी परम रुचिर नारीत्वमिपधर मणिवर । अनुपम रुचियुत सुमणि हा नयनविकसवि सुखकर ॥ स्ववश न मम मन हें निरखुनि इस । सदा चिंति तिस । परेशवरकृति । अपार गुणतति । मनांत ठसविति । अशिस धरिल करिं । कवण पुरुष तरि । नाचि कळे मजसि मिळविल सुखभर ॥ १ ॥ आजवरी धरिलें बहु दृढपण । मनीं करुनि पण । परी तयाप्रति । त्यजावया मति । प्रवृत्त हो अति । विमल विधूपम । मुखास करिं मम । परत तो वितरु सुतिलक शिवकर ॥ २ ॥

# अंक ५ वा.

**आचार्य**—[ ' ह्याचं कारण तरी रूढिवशताच ! ' असें म्हटल्यावर ] खरोखर—

पद्य—चाल—पिया पिया०

**स्त्रीजनिं अवनति हे किती ॥ व्यभिचारादिक अनीतिबोधीं शंका किमपि न मानि ॥ध्रु० ॥ पुरुषगणातें सदुपदेशकर। मंदोदर्यादिक विदुषीवर। सांप्रत दुर्लभ या धरणीवर। स्त्रीगण होउनि नरपशुकिंकर। स्वयेंचि वनला पापमती ॥ १ ॥ दुष्कमाच्या सहवासानें। पातकरीती आदरिल्यानें। अंतीं कारावासहि मानें। दूषणभूषण सम होती ॥ २ ॥**

अनुक्रम ९४२६०९
विभाग ओ
क्रमांक ८०१५०
नों. दि. ३/५/६३

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | शुद्ध. | अशुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | १९ | पुरुषजाती | पुरुष जाती |
| ४ | १२ | असति | असती |
| २१ | १९ | वर्तन | वतन |
| २४ | १७ | हि | ही |
| २७ | ४ | केवळ | कवळ |
| ३० | १८ | हो | हे |
| ३५ | ३ | येतों | येतो |
| ३९ | २१ | कुटला | कठला |
| ४२ | ३ | असं | अस्तं |
| ४३ | १३ | बुद्धि | बुद्धे |
| ४८ | पृष्ठांक | ४८ | ३८ |
| ५८ | १६ | भ्रमिष्ट | भ्रमिष्ट |
| ६३ | ६ | पण | मण |
| ६७ | २३ | लव तूं | लव |
| ६९ | २२ | तुमच्या | तुतच्या |
| १०१ | १९ | केली पाहिजे | केला पाहिजे |
| ११४ | ८ | गुंगींत | गुंगीत |
| ११५ | १० | एकसारखीं | पकसारखी |
| ११८ | ७ | माझा | माज्ञा |
| ११८ | ९ | लोंचनी | लोंचनी |
| १२१ | २६ | हें बरं | ह बरं |
| १२९ | ४ | पाहिजे | माहिजे |
| १४२ | ९ | सुखपरिणामी | सुख परिणामी |